मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका


मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र


मूल्य : १ रु.

युगवाणी



नाटककार वीर वामनराव जोशी

विदर्भातील त्यावेळच्या तरुण साहित्यिकांसह श्री. कृ. कोल्हटकरांचे एक दुर्मिळ छायाचित्र



मागील रांग (डावीकडून उजवीकडे)—१ श्री. पंडित, कवी व काव्यसमीक्षक पदव्युत्तरविभाग, नागपूर. २ डॉ. कोलते, महानुभावीय संशोधक, कुलगुरु नागपूर विद्यापीठ. ३ श्री. श्रौती, कवी, नागपूर. ४ श्री. अडावदकर, कवी व लेखक, सेवानिवृत्त शाळानिरीक्षक, खामगाव. ५ श्री. मांजरेकर, लघुकथा लेखक, वकील, छिंदवाडा.

पुढील रांग (बसलेले)—६ श्री. महाजन, लेखक, वकील, दर्यापूर. ७ श्री. ब्रह्म, लेखक व कवी, वकील, खामगाव. ८ कै. तात्यासाहेब कोल्हटकर. ९ कै. अच्युतराव साठे. १० कै. तायडे, कवी, चित्रकार व गायक, न्यायखाते.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ–पुरस्कृत
विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

यु ग वा णी

संपादक
मा. नी. गलगलीकर

संपादक मंडळ

श्री. बाळासाहेब ढवळे   श्री. वसंत वऱ्हाडपांडे
सा. भू. तु. ना. काटकर   श्री. श्रीकान्त राय
श्री. व्यं. नी. पंडित   प्रा. पुंडरीक धुमाळे

वर्ष २२]   जून १९६७   [अंक २

वैशाखी पौर्णिमा

वैशाखी पौर्णिमे
वैशाखी पौर्णिमे
आश्विनातल्या प्रसन्नतेला तू गे पारखी !
पूर्णकलांच्या तारारमणाला बघून ते वेळा
जनार्णवाला उधाण भरती !
चंद्रकुंभातून तारका गळून थेंबाथेंबाने
अमृत सिंचन. आणिक तुषार उडून तयांचे
होतसे चांदणे. करी वृद्धिंगत 'कोजागरीचा,'
नि ज्येष्ठ पुत्राच्या जन्मोत्सवाचा 'आसनि'चा पण
अमाप उत्साह !
तशी कार्तिकाची त्रिपुरी पौर्णिमा !
मदनांतकानं जाळून त्रिपुर दैत्यवधाचे रचिले स्मारक.
पिढ्यापिढ्यांना त्याचे स्मरण, स्मृति चिरंतन
असावी म्हणून प्राकृत पुराण पितांबराला
घृतात घोळून राऊळ कळसा देती गुंडाळून
देती पेटवून.
टिपूर चांदणे,   टिपूर चांदणे
जणु उच्छ्वासाने   देई पेटवून
काकड आरती   भक्तगणांची.
हिमकाळातल्या   ह्या दोन पौर्णिमा
निवांत सुखाला–संचारी   सुखाला–नि सहवासाला
घालून भुरळ–मंत्रून ठेविती सारा आसमंत.

तरुण जीवांच्या मनाची कवाडे देता उघडून
सुखाच्या शोधाची   देऊनि हिंमत !
परी तुझ्या ठायीं   वैशाखी पौर्णिमे
कशाचा आढळ ?
पेटते आकाश,   अंगास पोळती   जाती चाटून
घेती माजून   अदृश्य ज्वालांचे   उच्छ्वास ऊन
चंद्रमा वरून   अग्निपरागांची   अग्नितुषारांची
करी बरसात !
जीर्ण वाड्याच्या   भितीमधल्या झरोक्यामधून
पाझरणाऱ्या   प्राकृत   जिवाला कसा गे
व्हायचा आढळ   तुझिया सुंदरतेचा
सुभगतेचा वैशाखी पौर्णिमे !
जयांकारणे त्याने रचावे स्मारक आगळे ?
वाहत्या धारेत   वाहून जाणाऱ्या
प्राकृत मनाला   कोठून व्हायचे यथार्थ दर्शन
चिमून जे जाई   संसारसुखात–संसारदुःखात
नित्यव्यवहार तुपातेलाचा साखरमिठाचा
माल किराण्याच्या देवघेवीचा बडा रोजगार
त्यातून कशी ती व्हावी गे निर्वृत्ति
जियेच्या प्रभावी अमृताची शेती
होईल जीवनी ?
श्रद्धा शुद्ध बीज   तपाचरणाचे वरून वर्षण
जोम बलीवर्द   सत्य खुरपण

प्रज्ञेचा नांगर   हाताशी धरून
पापाच्या लाजेनं   मनाला जुंपून
स्मृतीच्या फाळानं   जीवनक्षेत्राची
व्हावी लागवड.
जशी बागाइत   सम्बुद्ध देवाने करून नाही का
अमृताचे फळ   दुःख निर्वृति
स्वतः मिळविली   इच्छुका वाटली !
वैशाखी पौर्णिमे   अहो भाग्य ते
तुझिया गुणाचे ?
पुण्यश्लोक त्या सम्बुद्ध देवाचा पुण्यावताराचा
बुद्धत्व प्राप्तीचा आणिक तसाच महानिर्वाणाचा
समय तुवां गे पूर्णानुभवाला स्वतः पाहीला
लुंबिनीच्या त्या पंचक्रोशीला तुवाच
नाही का आधी उजळले आणि कळविले
वायूच्या वारूवर बुद्धजन्माचे शुद्ध रहस्य
कपिलवस्तूला. स्वतःच्या नेत्रांनी
जो पाहिला तेथील सोहळा त्याची
यथार्थता अवर्णनीय !
तशी अनन्य
तू धन्यधन्य
वैशाखी पौर्णिमे !
जन्मसुखाहून   आणिक आगळा
आनंद लुटला   तुवां पौर्णिमे !
पूर्वत्वप्राप्तीचा   अभिसंबुद्धत्वाचा
तथागताचा   नवा आविष्कार
तुवाचि देखिला.   त्याच्या आनंदाची
तूच साक्षिदार !

तुझ्याच साक्षीने   बोधिवृक्षातून
सद्धर्म चक्राचे   महाप्रवर्तन
तथागताने   चालू ठेविले.
त्या जीर्ण खोडाला   आजच्या तिथीला
विचारशी ना   विश्रंभालापांनी
पुनःप्रत्ययाचा   सेवण्या आनंद ?
कसा बुद्धदेव   ज्ञान संपादून
आनंदे डुलून   डोलून बैसला
त्याच्या छायेत   ध्यानस्थ सोडून ?
तुझी धन्यता   त्रिवार धन्य
वैशाखी पौर्णिमे !
जन्म जयाचा   जेथ जाहला
नाश तयाचा   तेथच ठेला
सरस सौंदर्ये   ललित लावण्ये   तरल तारुण्ये
बघ जराधर्मी   बघ व्याधिधर्मी   आणिक शेवटी
मरणधर्मी.   म्हणून जन हो   सद्धर्म आचरा
व्हा शीलधर्मी !
तथागताच्या   दिव्य संदेशाची
सारी उभारणी   तुझ्याच ठिकाणी.
तुझ्याच पासून चालत निघाला बुद्ध भगवान
तुझ्याच ठिकाणी परत येऊन प्राप्त जाहले
महानिर्वाण.
वैशाखी पौर्णिमे तू धन्य धन्य !

ये धम्मा हेतुप्पभवा हेतुं तेसं तथागतो आह
तेसं च यो निरोधो एवं वादी महासमणो ।
ॐ नमो भगवतो अर्हतो सम्मासम्बुद्धस्स ।

—यक्ष

श्रीपाद कृष्णांची पुण्यस्मृती

—प्रा. भवानीशंकर श्रीधर पंडित

फेब्रुवारी १९६६ च्या 'सत्यकथे'त प्रा. गो. म. कुलकर्णी यांचा 'कोल्हटकर आणि गडकरी' हा विचिकित्सक व विवेचक लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यात त्यांनी कोल्हटकरांचे एक मूळ पत्र दिले आहे. ते नाट्यवाङ्मयाच्या अभ्यासकास उपकारक व उपयुक्त आहे. कुलकर्णी यांचा लेख वाचून श्रीपाद कृष्ण ऊर्फ तात्यासाहेब कोल्हटकर यांच्या संबंधींच्या माझ्या-काही स्मृतींना उजळा मिळाला. त्यांची अभ्यासका-साठी नोंद करीत आहे. बाविसाव्या पृष्ठावर कुलकर्णी गडकऱ्यांच्या प्रेमसंन्यासातील अर्पणपत्रिकेचा, भाव-बंधनाचा, कोल्हटकरांनी रचलेल्या त्यातील पदांचा आणि गडकऱ्यांच्या अपूर्ण राहिलेल्या महाराष्ट्र गीताचा उल्लेख करतात; आणि प्रेमसंन्यासातील अर्पण-पत्रिकेतले व महाराष्ट्रगीतातले काही अंश तळटीपांत उद्धृत करतात. परंतु भावबंधनाच्या पहिल्या आवृत्तीला कोल्हटकरांनी जी प्रस्तावना जोडली आहे, आणि गडकऱ्यांनी जी नांदीची पदे रचली आहेत, त्यांकडे नजरचुकीने त्यांचे लक्ष जात नाही. एखाद्या पोरक्या पुतण्याला त्याच्या वडिलांच्या पश्चात् एका प्रेमळ चुलत्याने त्याची उपासमार होऊ नये या हेतूने अपचन होई तो जेऊ घातले, आणि दुसऱ्या मायाळू चुलत्याने त्याला अपचन होईल या धास्तीने त्याची उपासमार केली, तरी त्या पोरक्या पोराची जी आबाळ व्हावयाची ती होतेच, तशीच गडकऱ्यांच्या अपमृत्यूमुळे त्यांच्या एकच प्याला व भावबंधन नाटकांची स्थिती शोचनीय झाली आहे, या आशयाचे एक विधान त्या प्रस्तावनेत आहे. गडकरी हयात असते तर ही नाटके आहेत त्याहून अधिक सुंदर झाली असती हा जो त्या विधानातून सूर निघतो, त्यावरून कोल्हटकरांच्या मनात गडकऱ्यांविषयी आणि त्यांच्या वाङ्मयाविषयी किती प्रेमादर होता ते उघड होते. गडकऱ्यांनीही नांदीतल्या दिंडीत व साकीत महाराष्ट्रीय रसिकांविषयी व आपल्या लेखनगुरूविषयी कृतज्ञता व्यक्त केली आहे–

> स्वजनकृतिचे गुरुदोष झाकुनीया
> घेति गुणलव जे गोड मानुनीयां
> कृतज्ञत्वें त्यां नमन अष्टअंगीं
> महाराष्ट्राच्या रसिकजनांलागीं
>
> कृपाच ज्याची कारण केवळ मम पामर वचना तें
> वंदुनि त्या श्रीपादपदांप्रति याया यश कार्यातें–
> नवनाटकरचना। सादर करितो रसिकजनां

कुलकर्ण्यांनी एकविसाव्या व बाविसाव्या पृष्ठांवर माडखोलकरांच्या 'दोन तपां'तील एका विधानाचा आधार घेऊन कोल्हटकर व गडकरी यांच्या गुरु-शिष्यसंबंधावर शक्य तितका प्रकाश पाडण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. तात्यासाहेबांच्या स्वभावात एक फार मोठा गुण होता. तो म्हणजे ते माणुसकी नसणारे माणूस नव्हते. कितीही श्रेष्ठ आणि प्रतिष्ठित साहित्यिक झाला, तरी अगोदर तो एक माणूस आहे याची त्यांना सदैव जाणीव असे. म्हणून एखादा साहित्यिक कोणत्याही वयाचा किंवा कोणत्याही वर्गातला असो, ते त्याला दुजाभाव जाणवू देत नसत. त्याच्या-बद्दल त्यांना आस्था व आपुलकी असे. साहित्यिकांच्या कुठल्याही मेळाव्यात ते मिळत मिसळत व मनमुराद हसत खिदळत; आणि एखाद्याने त्यांच्या मार्गदर्शनाची अपेक्षा केल्यास ते आनंदाने ते कार्य बिनबोभाट करीत. गडकरी, लेले, खांडेकर, खानोलकर, माड-

खोलकर, स. वा. जोशी व साठे इत्यादी निरनिराळ्या ठिकाणी पसरलेल्या साहित्यिकांशी त्यांनी सतत पत्रव्यवहार केला, आणि त्यांना आवश्यक तो सल्ला दिला, यात त्यांच्या मनाचा मोठेपणा दिसून येतो. पत्रांना उत्तरे पाठविण्याची त्यांनी टाळंटाळ केली नाही हे लक्षात घेण्यासारखे आहे.

एकोणिसशे सत्ताविसच्या जुलैत किंवा ऑगष्ट-मध्ये तात्यासाहेब नागपुरास आले होते, आणि आपले मित्र हरिभाऊ मुंजे, डिस्ट्रिक्ट ऍंड सेशन्स जज्ज, यांच्या बंगल्यावर धनतोलीत उतरले होते. हरिभाऊ तात्यासाहेबांच्या नाटकांचे चाहते होते. तात्यासाहेब पदे म्हणत व हरिभाऊ सतार वाजवत. तात्यासाहेबांनी मॉरिस कॉलेजातील आमच्या शारदा मंडळात व्याख्यान द्यावे यासाठी मी व माझे सहाध्यायी स्नेही विष्णु भिकाजी कोलते मुंजांच्या बंगल्यावर पोचलो. त्यावेळी तात्यासाहेब कमरेभोवती लांबरुंद टर्किश टॉवेल गुंडाळून न्हाणीघरात स्नानाच्या तयारीत होते. बाहेर दिवाणखान्यात त्यांना भेटण्यासाठी त्यांचे मेहुणे डॉ. मोडक आणि सुप्रसिद्ध साहित्यसेवक अच्युत सीताराम साठे, डिस्ट्रिक्ट ऍंड सेशन्स जज्ज हे येऊन बसले होते व हरिभाऊ मुंजांशी गप्पा करीत होते. इतक्यात न्हाणीघरात तात्यासाहेबांच्या कानावर दोघे विद्यार्थी आल्याची वर्दी गेली. तात्या तसेच बाहेर पडवीत आले. कोलत्यांची व त्यांची खामगावची पूर्वीची ओळख होती. कोलत्यांनी माझी ओळख करून दिली. नंतर आम्ही तात्यासाहेबांची वाट पाहात दिवाणखान्यात बसलो. तात्यांच्या तोंडावरून वाताचा ओझरता झटका गेला होता. तेव्हा त्यांनी व्याख्यानासाठी जाऊ नये असे डॉ. मोडक यांचे म्हणणे पडले. त्यामुळे माझी आणि कोलत्यांची फार निराशा झाली. पण तात्या साहित्य-संस्थांचे अभिमानी आणि सभा-संमेलनांचे पुरस्कर्ते होते. त्यांनी त्या अडचणीतून मार्ग काढला: अच्युतराव साठे पट्टीचे वक्ते होते. त्यांनी व्याख्यान द्यावे व तात्यांनी ते ऐकावे असे ठरले. तात्यांनी व्याख्यान अध्यक्षाच्या खुर्चीवर वसून ऐकावे असे आम्ही सुचवले, आणि त्याला सर्वांनी मान्यता दिली. ठरल्या प्रमाणे अच्युतरावांचे अतिशय रसाळ व्याख्यान झाले. पण ते होण्यापूर्वी अध्यक्ष यानात्याने तात्या 'दोन शब्द' बोलले. ते म्हणाले;–"शारदा म्हणजे वाणी. आपण सर्व शारदेचे भक्त आहोत: माझी वाणी सध्या वाकडी झाली आहे. यांचा अर्थ मी 'वक्रतुंड' आहे असा नाही. परंतु मी वाकड्या मुखाने बोललो तर ते शारदेला वाकोल्या दाखविल्यासारखे होईल. भक्ताने देवतेचा अपमान केल्यासारखे होईल. तेव्हा मी हे दोन 'वेडेवाकडे' शब्द बोलून तिला वंदन करतो. तात्या-साहेबांच्या नागपुरच्या भेटीचा फायदा घेऊन मॉरिस कॉलेजातील शारदा मंडळाच्या आणि हिस्लॉप कॉलेजा-तील महाराष्ट्रभाषा संवर्धक मंडळाच्या काही सदस्यांनी त्यांच्या समवेत एक फोटो काढून घेण्याचे ठर-विले. त्या फोटोत साठे असावेत असा तात्यांचा आग्रह पडला. तेव्हा आम्ही दुसरे दिवशी फोटोसाठी येण्याची साठ्यांना विनंती केली. साठे घरी परतण्याच्या घाईत होते. ते म्हणाले, 'मी नक्की काय ते हरीभाऊंना चिठीने कळवितो.' तात्यांप्रमाणे हरि-भाऊ मोठे विनोदी होते. ते तात्यांना म्हणाले, "अच्युत सीताराम साठे यांनी चिठी खुशाल पाठवावी. मात्र तिच्यावर खाली 'इनिशिअल्स' करू नयेत. पूर्ण सही करावी." तात्यासाहेब आणि त्यांचे मित्रमंडळ मनो-विनोदनात आणि आमोदा प्रमोदात कसे रमत त्याचा हा एक नमुना आहे. आम्हा तरुण विद्यार्थ्यांच्या मेळा-व्यात बसलेला तात्यासाहेबांचा आणि अच्युतरावांचा फोटो मी माझ्या अभ्यासिकेत भितीवर टांगून ठेवला आहे. त्याकडे लक्ष गेले म्हणजे मागला चाळीस वर्षांचा काळ डोळ्यांपुढे दत्त म्हणून उभा राहतो. त्यावेळी मी, कोलते, मांजरेकर आदी मित्र विद्यार्थी होतो. अच्युतराव साठे हे विविधज्ञानविस्तारा सारख्या प्रौढ व भारदस्त मासिकाचे कर्ते व लेखक होते. मोगऱ्यांच्या फुलांच्या चौथ्या गुच्छाला त्यांची प्रस्तावना आहे. त्यांनी देवनाथ व दयाळनाथ या वैदर्भीय कवींच्या कवितेचे संपादन केले आहे. तात्यांनी त्यावेळी नुकतेच महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या पुणे येथील बाराव्या अधिवेशनाचे अध्यक्षपद मंडित केले होते. आमच्या फोटोत तात्यासाहेव व अच्युतराव पुढे खुर्च्यांवर बसले आहेत व आम्हा आठ मित्रांचे मंडळ त्यांच्या मागे उभे आहे किंवा बसले आहे. तात्यासाहेबांचा एक ठराविक वेष असे. ते अंगात बंद गळ्याचा पारशी कोट घालत, जुन्या पद्धतीने पुढे खोचलेले स्वच्छ धोतर नेसत, पायात मोजे व बूट घालत, डोक्याला जरीकाठी पांढरा रुमाल बांधत आणि गळ्याभोवती उपरणे गुंडाळून त्याचा एक पदर डाव्या खांद्यावरून

अनुक्रमणिका

पाठीवर व दुसरा समोर सोडत. ते हातात नेहमी छत्री घेत. फोटोत तोंडाचा किंचित् वाकडेपणा लक्षात येऊ नये यासाठी ते डाव्या तळहातावर उपरण्याचा थोडासा भाग घेऊन त्यावर तोंडवळा रेलल्यासारखा ठेवत. तात्यासाहेबांच्या या विनोदी स्वभावामुळे व स्नेहशीलतेमुळे ते सर्वांना हवेहवेसे वाटत.

मला वाटते, याच वर्षी पुढे दिवाळी व नाताळ यांच्यामध्ये केव्हा तरी, तात्यासाहेब पुन्हा नागपुरात शारदा मंडळाच्या संमेलनाचे अध्यक्ष म्हणून आले. या खेपेस त्यांची प्रकृती उत्तम होती. या वेळी सुप्रसिद्ध गायक जी. एन्. जोशी हे शारदा मंडळाच्या 'साहित्य-संग्रह' या हस्तलिखिताचे संपादक होते ते व ना. घ. देशपांडे एकमेकांचे जीवश्च कंठश्च मित्र होते. ना. घ. देशपांडे यांनी 'शीळ' ही आपली कविता पुढे मॉरिस कॉलेजात असतानाच लिहिली आणि गोविंदराव जोशी यांनी ती गाऊन हिज मास्टर्स व्हॉइसच्या रेकॉर्डद्वारे उभ्या महाराष्ट्रात लोकप्रिय केली. तात्यासाहेबांना संगीताचा नाद होता. तात्यासाहेब व जोशी दोघेही खामगावचे, आणि त्यांचा आप्तसंबंधही होता. तेव्हा या खेपेस तात्यांनी संमेलनानंतर निवडक विद्यार्थ्यांच्या मेळाव्यात 'प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा' हे गीत गाऊन दाखवले, आणि ते कसे म्हणावे याचे गोविंद-रावांना प्रात्यक्षिक दिले. या कार्यक्रमाकरिता गोविंद-रावांनी बुटीवाड्यातून पायपेटी आणली होती, आणि तात्यांना साथ केली होती. तात्यांनी 'महाराष्ट्र गीता' शिवाय आपल्या नाटकांतील इतरही काही पदे गाऊन दाखविली. मला नक्की आठवते की, 'वेषाचे सार्थक किती नामि जाहले' हे एक पद त्यांपैकी होते. 'महाराष्ट्र गीत' निरनिराळ्या चालीवर म्हणण्यात येते हे तात्यांना पसंत नव्हते. यासाठी त्यांनी डिसेंबर १९२७ च्या 'मासिक मनोरंजनांत' त्या गीताचे स्वरलेखन प्रसिद्ध केले. त्यावरील टीपेत ते लिहितात– 'महाराष्ट्र गीत प्रसिद्ध झाल्यापासून ते आपल्या शाळांत सुरू करण्याचे अनेक शिक्षण संस्थांनी ठरविले आहे. पण त्यास ज्या चाली लावण्यात येत आहेत, त्या मूळ चालीहून व परस्परांपासून भिन्न असून, मूळ चाली इतक्या सरसही नाहीत. सबब ते सर्वत्र मूळ चालीवरच म्हणण्यात आले पाहिजे व त्याकरिता त्याचे स्वरलेखन (Notation) प्रसिद्ध झाले पाहिजे, अशी अनेकांकडून सूचना झाल्यावरून त्याचे स्वरलेखन श्रीयुत रामचंद्र सखाराम टोकरे, शिक्षक, मराठी शाळा, जळगांव (वऱ्हाड), यांच्या साहाय्याने तयार करून खाली देत आहे." (श्री. कृ. कोल्हटकर.)

तेविसाव्या पृष्ठावर प्रा. कुलकर्णी कोल्हट-करांच्या नव्या शैलीचे विशेष सांगताना 'काव्य = अलं-कार; शास्त्र=सामाजिक विचार; विनोद=कोटिबाज-पणा; कथारचना=रहस्यमय गुंतागुंत' अशी समीकरणे मांडतात. त्यांपैकी वरील एका आठवणीत कोटीबाज-पणाचे दर्शन आहे. मला वाटते, 'काव्य' 'विनोद' व 'कथारचना' या तिघांचाही अंतर्भाव 'कल्पकता' या एका व्यापक संज्ञेत करता येईल. 'कल्पकता' हे कलेचे आवश्यक अंग आहे. गडकरी, कोल्हटकरांच्या वाणीला 'कलावती' हे विशेषण लावतात. कोल्हट-करांना साहित्याप्रमाणे संगीताचीही आवड होती हे वर दिलेल्या दुसऱ्या आठवणीवरून स्पष्ट होईल. साहित्य आणि संगीत या दोन्ही कला त्यांच्या जीवनाच्या सहभागी होत्या. त्यांनी 'महाराष्ट्रगीत' प्रथम लिहिले त्यावेळी त्यात पुढील पाठ होते.—

मर्यादा पौरुषासि जेथ दुःसहा

आणि,

नारीची कूस जिथें नृमणिखनि ठरे

हे पाठ पुढे त्यांनी पुढीलप्रमाणे बदलले.—

पौरुषासि अटक गमे जेथ दुःसहा

आणि,

रमणीची कूस जिथे नृमणि खनि ठरे

या सुधारलेल्या पाठात 'अटक' या द्व्यर्थी शब्दाची योजना करताच 'मराठ्यांचे घोडे अटकेवर पाणी प्याले' आणि 'मराठ्यांचे झेंडे अटकेवर रोवले' हा दोनशे वर्षांपूर्वीचा मराठ्यांच्या पराक्रमाचा इतिहास एकदम साकार झाला; आणि 'नारी'च्या जागी 'रमणी' या शब्दाची योजना करताच पुढला 'नृमणि' हा शब्द नाद व अर्थ या दोन्ही दृष्टींनी सार्थ झाला. तात्यासाहेब हे सौंदर्यवादी साहित्यिक होते. सौंदर्याच्या आराधनेत, साधनेत आणि विचक्षणेत त्यांना परा-काष्ठेचा आनंद व्हावयाचा.

यानंतर तात्यासाहेब बहुवा एकोणिसशे तीस साली आपले कनिष्ठ बंधु दिगंबर कृष्ण ऊर्फ अण्णा-साहेब कोल्हटकर यांच्याकडे राहाण्यास आले. या वेळी ते जवळ जवळ पंगु बनले होते. तरी साहित्यविषयीची त्यांची रुची कोणत्याही तऱ्हेने कमी झाली नव्हती. या वेळी त्यांची भेट घेण्यासाठी विष्णु सखाराम खांडेकर हे शिरोड्याहून नागपुरास मुद्दाम आले होते.

त्या दोघांची भेट व्हावी म्हणून मी व कोलते अण्णासाहेबांच्या बंगल्यावर गेलो, तोच माडखोलकरांनी खुणावल्यावरून नानासाहेब बेहेरे पुढे आले, आणि त्यांनी तात्यासाहेब भेटण्याच्या स्थितीत नसल्याचे आम्हांला सांगितले. परंतु तात्यांना आम्ही आल्याची वार्ता समजताच त्यांनी आम्हांला आत बोलावले, आणि खांडेकरांचे व्याख्यान आयोजित करण्याचे सुचविले. त्या वेळी येथील सायन्स कॉलेजची इमारत नुकतीच बांधण्यात आली होती. तिच्यात 'लेक्चर हॉल' वरच्या मजल्यावर आहे. त्यात खांडेकरांचे व्याख्यान झाले. पण गम्मत अशी की, डॉक्टरांचा आणि घरच्या मंडळीचा विरोध असतानाही तात्यासाहेब मोटारीतून व्याख्यानास आले. आरामखुर्चीत बसून, विद्यार्थ्यांनी ती उचलल्यावर, वरच्या मजल्यावर गेले, आणि खांडेकरांच्या व्याख्यानंतर, सभेचा सर्व समारंभ आटोपून, मग घरी परतले. खांडेकर वयाने लहान आहेत किंवा आपले शिष्य आहेत म्हणून तात्यांनी त्यांचे व्याख्यान ऐकण्याचे टाळले नाही. वास्तविक ते या वेळी पाय पंगु व दृष्टि अधु असल्यामुळे घराबाहेर पडण्याच्या स्थितीत नव्हते.

तात्या जितके मार्मिक तितकेच रसिक होते. त्यांना काव्यातील 'अलंकार' व 'रस' दोन्ही प्रिय असत. एकदा कोलते पाचलेगावकर महाराजांबरोबर तात्यांकडे गेले होते. तेथे त्यांनी तात्यांना 'रत्नाकरा'त नुकतीच प्रसिद्ध झालेली माझी 'कृष्णे ! तुला प्रार्थना' ही कविता वाचून दाखविली. तिच्यातील हा श्लोक ऐकून तात्यांनी आनंदाने मान डोलवली.–

नोहे हा सलिलौघ–हा दिसतसे शालू निळा साजिरा
हा पाहून तुझ्या तनूवर पिसें लागेल रत्नाकरा,
या वीचीवरवीचि उंच उठती, जाती पुन्हा खालती,
शालूचे सळ हे सलील अथवा वाऱ्यामुळे हालती !

या श्लोकांतील 'अपन्हुती'ने तात्या प्रसन्न झाले. कोलत्यांनी मला ही हकीगत सांगितली तोपर्यंत 'अपन्हुति' म्हणजे काय याची मला स्वतःला कल्पना नव्हती.

तात्यांचे शेवटचे लेखन शिशुकथेच्या स्वरूपाचे आहे. आमचे मित्र प्राचार्य यादव मुकुंद पाठक यांनी 'विहंगम' या नावाचे एक सर्वांगसुंदर मासिक सुरू केले होते. या वेळी तात्या पाठकांच्या बंगल्याजवळ आपले बंधु अण्णासाहेब यांच्याकडे आले होते. पाठकांनी 'विहंगमा'साठी तात्यासाहेबांचा आशीर्वाद आणि लेख मागितला. तेव्हा तात्यांनी आशीर्वाद दिला आणि 'मोत्याचा पापा' ही गोष्ट दिली. जुलै १९३३ च्या 'विहंगमां'त त्या आशीर्वादाचा ब्लाक छापला आहे, आणि 'मोत्याचा पापा' ही गोष्ट सचित्र दिली आहे. मोत्याला गाल नसतात तेव्हा त्याचा पापा कसा घ्यावयाचा हा छोटया बेबीला प्रश्न पडतो. पण मोत्याला गाल नसले, तरी मनीला नाक आणि मिशा असतात या शोधाने तिला आणि तिच्या मित्रमंडळीला आनंद होतो. या गोष्टीत वात्सल्य असले, तरी तात्यांना अत्यंत प्रिय असणारी 'कल्पना' आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे.

एकविसाव्या पृष्ठावर कुळकर्णी म्हणतात त्याप्रमाणे आजच्या वाचकाला कोल्हटकर साहित्यात कोणताच प्रभाव विशेषत्वाने प्रतीत होत नाही हे खरे आहे. याला कारण कोल्हटकर ही व्यक्ती स्वतः सहृदय असली, तरी तिचे सारे साहित्य बौद्धिक चमत्कृतींतून निर्माण झाले आहे. तेविसाव्या पृष्ठावर कुळकर्ण्यांनी कोल्हटकरांना प्राचीन परंपरांपेक्षा किंवा इतिहासपुराणांतील सनातन आशयापेक्षा आधुनिक वळणाचा सामाजिक सुधारणावाद स्वीकरणीय वाटत होता. वास्तवतावादावर अद्भुततेचे कलम करण्याचा तिचा विचार होता' असे एक विधान केले आहे. ते अगदी बरोबर आहे. पण त्यामुळेच कोल्हटकरांच्या साहित्याचा प्रभाव प्रतीत होत नाही हे सांगण्यास ते विसरले आहेत. कोल्हटकरांनी आरंभी आरंभी बौद्धिक चमत्कृतींतून जे साहित्य निर्माण केले त्याचा प्रभाव काही काळ टिकला. पुढे तो नष्ट झाला. आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांनी 'शिवपावित्र्य' हे ऐतिहासिक नाटक लिहिले, आणि 'महाराष्ट्र गीत' हे स्फूर्तिप्रद काव्य आळविले. या काव्यात महाराष्ट्राचा इतिहास व त्याची परंपरा यांचा उर्जस्वल आविष्कार आहे म्हणूनच 'आजच्या महाराष्ट्रा'ला त्याचा प्रभाव विशेषत्वाने प्रतीत होत आहे. सॉक्रेटिसाचा एकही ग्रंथ नाही, तरी प्लेटो, ॲरिस्टॉटल इत्यादी त्याच्या शिष्य प्रशिष्यांच्या परंपरेमुळें आजही त्याचे नाव विख्यात आहे. कोल्हटकरांचे साहित्य विस्मृत झाले, तरी त्यांच्या शिष्यपरंपरेमुळे त्यांचे नाव कायम राहील.

बबन काळबांडे आणि आत्महत्या वगैरे....

—गिरीश राठी

"आयुष्यात तू कधी आत्महत्या केली आहेस काय ?"

एरवी हा प्रश्न माझा तत्वज्ञानी प्राध्यापक मित्र बबन काळबांडे उर्फ बब्याने मला अन्यत्र कोठे आणि केव्हाही विचारला असता तरी मी विशेष दचकलो नसतो. किमान आताच्यासारखा शहारून निघालो नसतो. कारण आजपर्यंत त्याच्या अनेक भयंकर आणि विलक्षण प्रश्नांना मीच पुरून उरलो आहे. आपल्या प्रत्येक भेटीत बबनने मला एखादा तरी नवीन बुचकळ्यात पाडणारा प्रश्न टाकला नाही असे क्वचितच घडून आले आहे. दोन दिवसांपूर्वीच त्याने मला 'माणूस हा जन्मावा लागतो' हे गहन निष्कर्षात्मक विधान ऐकवून मग 'काळाच्या वाहत्या प्रवाहाबरोबर माणसाचे वय का वाढत असावे ?' ह्या प्रश्नावरील आपले विचार ऐकवण्यात त्याने माझ्या आयुष्यातील तीन चार तास कमी केले होते.

तसे म्हटले तर काळबांडेच काय आज कोणत्याही व्यक्तीने कुणाला कोठल्याही प्रकारचा प्रश्न केला तर मला फारसे आश्चर्य वाटत नाही. मुलगी पहायला गेलेल्या एखाद्या शहाण्या तरुणाने मुलीला "ह्यापूर्वी तुमचे कधी लग्न झाल्याचे तुम्हाला स्मरते काय ?" असा प्रश्न विचारल्याचे मला कळले तर मला त्यात काही विशेष वाटणार नाही. तसेच त्या मुलीने "माझ्या आठवणीप्रमाणे एवढ्यात किंवा पूर्वीही माझे लग्न झाल्याचे मला फारसे आठवत नाही" असे उत्तर प्रश्नकर्त्याला दिल्याची माहिती मला मिळाली तर त्याबद्दलही मला मुळीच अचंबा वाटणार नाही. उलट अशा मनमोकळ्या प्रश्नोत्तरांबद्दल त्यांचे कौतुकच करावेसे वाटेल.

वास्तविक आजच्या घडीला जगात, विशेषतः लोकशाही भारतात, त्यातल्या त्यात महाराष्ट्रात तरी कोणी कुणाला कोणता प्रश्न केव्हा विचारावा ह्याला किंचितही धरबंद राहीलेला नाही. प्रत्येकजण प्रश्नकर्त्याच्या भूमिकेत आज वावरत असतो. वाटेल तो प्रश्न वाटेल त्याला स्वतःच्या सोयीनुसार खडसावून विचारणे हा प्रत्येकाचा जन्मसिद्ध हक्कच झालेला आहे. माझ्या शेजारच्या एका विद्यार्थ्याने एका जाहीर सभेत जाऊन प्रमुख वक्त्याचे भाषण सुरू होण्यापूर्वी त्याला "भाषणात तुम्हाला सडकी अंडी आवडतील की शिळे आलुबोंडे ?" असा प्रश्न चक्क सर्वांसमोर विचारला होता. डॉक्टर मंडळी पेशंटला कोठला प्रश्न विचारतील ह्याचा अंदाज बांधणे हे मानवी कल्पनाशक्तीच्या ग्रॅन्ड सर्कसचे मासलेवाईक खेळच ठरतील. साधी तपासणी करवून घेताना डॉक्टरने विचारलेल्या प्रश्नांचा धसका घेऊन लांब मुदतीच्या आजाराने खाटले धरलेले काही पेशंट्स मला ऐकून ठाऊक आहेत. काही डॉक्टरलोकांनाही ह्याची जाणीव असावीशी वाटते. कारण असे न व्हावे ह्यासाठी तपासणीपूर्व सुरक्षितता म्हणून माझे एक डॉक्टरस्नेही त्यांच्याकडे येणाऱ्या अतिशय दुर्बल रोग्याला तपासणीविषयक प्रश्न विचारण्यापूर्वी ग्लुकोजच्या पाच इंजेक्शन्सचा कोर्स त्याला देतात. ऑफिसातील जरठ हेडक्लार्कला "तुमच्या बायकोने तुमच्यावर प्रेम केले असल्यास त्याची कारणे कोणती ?" हा प्रश्न नुकत्याच नोकरीला लागलेल्या कु. पुष्पा

नवाथेने विचारल्याची घटना माझ्या डोळ्यांसमोर अगदी ताजीच आहे. पत्रकारांच्या प्रश्नांना तर प्रत्यक्ष परमेश्वरही घाबरतो म्हणतात. (न पेक्षा विश्वासमोर निरनिराळी संकटे आलेल्या आजच्या कठीण समयी परमेश्वराने एखादी प्रेस कॉन्फरन्स बोलावली नसती काय ?) देशापुढील समस्या सोडविती तो उत्कृष्ट व जाणकार पुढारी ही विचारसरणी राजकारणात आता मागे पडली असून पत्रकारांच्या प्रश्नांना पुरून उरतो तोच श्रेष्ठ मुत्सद्दी ही बावनकशी नेतृत्वाची नवीन कसोटी प्रचलित काळात मान्य होऊ लागली आहे.

त्यामुळे एखाद्याने 'आयुष्यात मी कधीतरी मरून पाहिले आहे काय ?' असा सवाल मला केला तर मला त्यात मनाला लावून घेण्यासारखे काय असणार ! विशेषतः बबन काळबांडेने "आयुष्यात तू आत्महत्येचा अनुभव कधीतरी घेतला आहेस काय ?" असे मलाच नव्हे तर कुणालाही विचारणे ह्यात त्याच्या दृष्टीने काही गैर नाही. किंबहुना विश्वाचे रहस्य सामान्य लोकांना उलगडून दाखवून जगाची गती कायम ठेवण्याची नैतिक आणि ईश्वरदत्त जबाबदारी ज्या तत्वचिंतकांवर असते त्यांना तर अशा दडून बसलेल्या निरनिराळ्या प्रश्नांच्या शोधातच आपले आयुष्य हरवून बसावे लागते. त्यांच्या मतानुसार 'रामायण आधी, मग झाले राम–जानकीवर' ह्या सिद्धांताने विश्वातील निरनिराळी रहस्ये आणि विविध समस्या अगोदर निर्माण झाल्या व नंतर ही सारी रहस्ये आणि समस्या हवेत तशाच लोंबकळत राहू नयेत म्हणून त्यांना आधार देण्यासाठी मागाहून विश्वाचा जन्म झाला.

बबन काळबांडेही नवीन पिढीतील एक उदयोन्मुख तत्त्वज्ञ ! अर्थात विश्व आणि विश्वाची रहस्ये याबाबतचा उपरोक्त सिद्धांत त्याला मान्यच आहे. आता हा सिद्धांत आकर्षक वाटल्यामुळे तो स्वतःला तत्त्वज्ञ समजू लागला की तत्वज्ञ होण्याची हौस असल्यामुळे वरील सिद्धांत त्याला वळजबरीने मान्य करून घ्यावा लागला हा मतभेदाचा मुद्दा असल्यामुळे अलाहिदा. बबन काळबांडे तत्त्वज्ञ आहे येवढाच मुद्दा येथे लक्षात ठेवायला हवा. स्वतःला तत्त्वज्ञानी म्हणवून घेणे बबनला आवडते. लोकांनी आपणाला तत्त्वज्ञानी म्हणावे हे त्याचे एक महत्वाकांक्षी स्वप्न आहे. त्यासाठी त्याने प्रयत्नांची पराकाष्ठा केली आहे. तत्त्वज्ञानी म्हणून लोकांच्या नजरेत स्वतःची प्रतिमा उभी करण्यासाठी बबन काळबांडेला अनेक वर्षे साधना करावी लागली. ही साधना पुस्तकी तशीच व्यावहारिक अशा दोन्ही प्रकारची होती. जगातल्या निरनिराळ्या देशांतील महान तत्वज्ञांची क्लिष्ट नावे लक्षात ठेवणे, त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांची नावे परिचितांच्या तोंडावर फेकून मारण्यासाठी पाठ करणे, काही थोर तत्त्वचिंतकांना छायाचित्राच्या रूपाने स्वतःच्या अभ्यासिकेत (?) ओळीने टांगून ठेवणे, त्यांच्या पुस्तकांतील सहजतेने उच्चारता येण्यासारख्या वाक्यांची चळत वारंवार जिभेवर उभारून त्यांचे रवंथ करणे, काही प्रमुख तत्त्वज्ञान्यांच्या विक्षिप्त शारीरिक संवयींची स्वतःमध्ये अभ्यासपूर्वक लागवड करणे, पुस्तकांतून पाठ केलेली (त्यातल्या त्यात सोपी वाक्ये) कारण नसताना संभाषणात हजर करणे, तत्त्वज्ञानावरील कोणता तरी एखादा जाडजूड ग्रंथोवा नेहमी काखोटीला ठेवणे इ. इ. प्रकारची ही साधना बबन काळबांडेला करावी लागली. प्रारंभी काही वर्षे ही महान आणि तापदायक साधना करूनही समाजाने बबनला अपेक्षित असा रिस्पॉन्स दिला नाही. त्यावेळी बबन मनानेच काय पण शरीरानेही खचू लागला होता, हवालदिल झाला होता. इतकी तपश्चर्या करूनही अपेक्षित फळ आपल्याला मिळू नये; डोके ताळ्यावर असलेल्या चार शहाण्या आणि सामान्य माणसांप्रमाणेच जगाने आपल्याशी व्यवहार करावा हे लक्षात येऊन बबन काळबांडे निराश झाला. रडकुंडीला आला. असहाय, अगतिक झाल्याप्रमाणे मग तो गावभर इतस्ततः भटकू लागला. दारुण अपेक्षाभंगापायी खराखुरा विक्षिप्तपणा त्याच्या अंगी येऊ लागला. वाटेल तेव्हा वाटेल ते करू लागला. म्हणजेच नाही तिथे नको ते करू लागला. डोक्यात बिघाड झाल्याप्रमाणे समाजाला अद्वातद्वा बोलू लागला. जगाला शिव्या देऊ लागला. इतिहासातील थोरामोठ्यांना तुच्छ लेखू लागला. इतकेच काय, परवापरवापर्यंत ज्या

तत्त्वज्ञान्यांना त्याने आदरस्थानी बसवून त्यांची पूजा आरंभिली होती त्या सर्वांना त्याने मूर्खात काढले. आयुष्याचा अर्थच त्यांना आकलन झाला नाही, विश्वाचा आवाका त्यांना उमगला नाही, आनंदमय जीवनरसाच्या उगमापर्यंत ते पोचू शकले नाहीत, वगैरे वगैरे. आणि असेच काहीबाही वैतागाने बोलून तो बिचाऱ्या थोरामोठ्यांना धोपटू लागला.

ह्याचा व्हायचा तोच परिणाम नेमका झाला !

लहान मुले त्याला हसू लागलीत. समवयस्क त्याला बिचकू लागले. प्रौढ मंडळी त्याची टर उडवू लागली. सारांश, समाजाने पटकन तत्त्वज्ञ म्हणून त्याचा स्वीकार केला. तत्त्वज्ञानी म्हणून झपाट्याने त्याचे नाव गावात सर्वतोमुखी झाले. काळबांडे किंवा बबनराव अथवा बबन म्हणून कोणीही त्याला हाक न मारता (फिलॉसॉफर) ह्या संबोधनाने सर्व त्याचा उद्धार करू लागले.

कसे का होईना बबन काळबांडेच्या तपश्चर्येला फळ आले; 'याचि देही याचि डोळा' बबनला ते पहायला मिळाले. बबननेही ते मोकळ्या मनाने पण हळुवार (विश्वासात घेऊन म्हणतात की काय तशा) आवाजात मजजवळ कबूल केले. त्यावेळी मी बबनला विचारले होते, "बबन, आता तुला समाधान वाटत असेल, होय ना ?" पण बबनने लगेच स्वतःला सावरले. आपण आता लोकमान्य तत्त्वज्ञ आहोत. आणि तत्त्वज्ञ हा सामान्यापेक्षा वेगळा असतो, नव्हे त्याने तसेच असायला हवे, ही जाणीव तावडतोब त्याला झाली. सावधपणे तो उत्तरला, "समाधान ? हुं ! अरे, समाधानी राहणे ही तर तत्त्वज्ञानाची पहिली शिडी होय. आयुष्याचा गुंता का अस्वस्थ होऊन सोडविता येतो ? सुख आणि दुःख, जय आणि पराजय, हास्य आणि अश्रू ह्या साऱ्यांचा जीवनाशी संबंध नाही असे नाही. परंतु जीवन म्हटले म्हणजे क्रोचेने म्हटल्याप्रमाणे.... "

बबन काळबांडे माणसातून पूर्णपणे उठला आहे, आता तो पुन्हा माणसाळणे शक्य नाही ही खात्री मला तेव्हाच झाली.

ही समाजमान्यता मिळाल्यावर बबन गावात शरीर आणि शब्द घेऊन मुक्त संचार करू लागला. वाटेल त्यावर मनमानी प्रतिक्रिया व्यक्त करण्याची मुभा त्याने जणू मिळवून घेतली होती. असे तो करीत असताना एक निरुपद्रवी प्राणी म्हणून त्याची दखल घेण्याचे लोकांनी टाळले. बबनने ह्याचा अर्थ स्वतःला अनुकूल असाच करून घेतला. जगातील प्रत्येक बाबीवर अभिप्राय देण्याची संधी तो सहसा दवडीत नसे. 'समाज हा कुत्र्याच्या शेपटासारखा आहे' असे म्हणण्यापासून 'मुंगीचा आश्रय घेण्यातच मानवी कर्तव्याची खरी इतिश्री आहे. कारण मुंगीच विश्वाच्या इतिहासात खरी प्रेरक ठरली आहे.' असे मोठमोठे सिद्धांत वेळी अवेळी मांडून एकंदर विश्वाची सूत्रेच हाती असल्यासारखा तो त्यांचे समर्थन करू लागला.

अशा ह्या बबन काळबांडेने मला माझ्या आत्महत्येविषयी विचारावे हे त्याच्या व्यक्तिमत्वाला पोषकच नाही काय ? तरी पण काळबांडेच्या ह्या नवीन व्यक्तिमत्वाची पुरेशी ओळख असूनही मी त्याच्या प्रश्नाने दचकलो. दचकलो कसचा, हादरलोच ! त्याच्या प्रश्नाचा पुरता अर्थ माझ्या लक्षात येताच मी शहारून निघालो.

वास्तविक कालची संध्याकाळ बबनने माझ्याकडे मनसोक्त खाण्यापिण्यात आणि नंतर पूर्वरात्र जेवताना यथेच्छ हात मारण्यात घालवल्यावर केवळ दहाबारा तासांनी माझी आजची सुंदर सकाळ आपल्या अभद्र प्रश्नाने बिघडवून टाकण्याचे त्याला काही कारण होते काय ? आज सुटीचा दिवस असल्यामुळे जाग येऊनही मी बिछान्यावर तसाच लोळत पडलो होतो. कोणी आपणाकडे येण्यापूर्वीच आपण घरातून बाहेर पडून निरनिराळ्या मित्रांकडे खाण्यापिण्यात दिवस घालवावा की, घरीच काही तरी चमचमीत बनवायला सांगून अजून काही तास आपण मस्तपैकी लोळण्यात घालवावे ह्या सुखद विचारांनी मी पडल्या पडल्याच उत्साही झालो होतो. कुणाला तरी रेडिओ लावायला सांगून बिस्मिल्लाचे मधुर सनईवादन ऐकण्याची इच्छा नुकतीच कोठे मनात डोकावू लागली होती.

अनुक्रमणिका

अन् एकाएकी सकाळी सकाळी काळबांडे आला आणि आपल्या आगमनाने सकाळचे सारे आल्हादकारक वातावरण त्याने गढूळ करून टाकले. माझी कोणतीही शारीरिक अवस्था, मूड किंवा वेळ ध्यानात न घेता माझ्याच कॉटवर बसून त्याने मला प्रश्न केला, " तू आयुष्यात कधी आत्महत्या केली आहेस ? "

काळबांडेचा मला अतिशय राग आला. ह्या मूर्खाचे आता काय करावे ? " शुभ बोल रे नाऱ्या तर नाऱ्या म्हणे... " छे छे ! संतापाची एक तीक्ष्ण तिडीक माझ्या डोक्यात सडकून निघाली. प्रत्यक्ष आत्महत्येच्या विचारानेही माझा मूड कदाचित इतका बिघडला नसता. कारण मला आत्महत्या करण्याचे जराही कष्ट न देता त्यापासून होणारे माझे सर्व हाल बबन मला फुकटात पुरवू लागला.

कॉटवर उठून बसत सात्त्विक संतापाने उसळून मी म्हटले, " बबन्या, मूर्खा ! अरे तुझ्या जिभेला काही हाड ! माझ्या मरण्याची चौकशी करण्यासाठी ह्यापेक्षा योग्य वेळ तुला सापडली नसती ना ? माझा मित्र म्हणवून घेतोस आणि माझ्याच भरल्या संसारात सकाळी सकाळी माझ्या मरणाच्या गोष्टी बोलतोस... बबन्या, गाढवा, छान डाव साधलास ! "

मी पुरता रागवल्यामुळे पुढे काय बोलावे ते मला कळेना. बबन मात्र शांत होता. निर्विकार होता. झकासपैकी स्वस्थ होता. माझे शब्द ऐकून कोठल्याही प्रकारची चलविचलता त्याचे ठिकाणी निर्माण झाली नव्हती. चुकलेपणाचा भाव त्याच्या चेहऱ्यावर औषधालाही फिरकला नाही. उलट माझे बोलणे संपल्यावर त्याच्या चेहऱ्यावर निराळेच स्मित दिसू लागले. स्वतःचा कोणता तरी अंदाज खरा ठरल्याचे समाधान नव्याने डोळ्यात खेळू लागले काही क्षण तसेच जाऊ दिल्यावर योग्याच्या क्षमाशील प्रसन्नतेने तो बोलू लागला " वाटलंच होतं मला असं काही तू करशील म्हणून ! ह्यात तुझा दोष नाही. समाजाचाही नाही. सामान्य आणि परंपरागत संकुचिततेतून वर यायला वैश्विक प्रसरणशीलतेच्या कक्षांचा कयास बांधावा लागतो. आवाका लक्षात घ्यावा लागतो. मात्र एक गोष्ट खरी. माणसाच्या वैचारिक मर्यादांची उकल ही अशासारख्याच प्रसंगावरून करावी लागते. असो. तुझ्या बालिश प्रतिक्रियेचे मी वाईट वाटून घेणार नाही. बोललेले शब्द तूही विसरून जा. तुझी भावनाप्रधानता मी जाणतो. अपशब्द बोलल्याबद्दल तू मुळीही पस्तावू नकोस. शेवटी चुका ह्या माणसाच्याच हातून होणार····"

बबन काळबांडेचे बोलणे एकदाचे संपले आणि मी कोणाच्या कचाट्यात सापडलो आहे ह्याची मला जाणीव झाली. माझा राग कोठल्या कोठे उडून गेला. कोणीतरी धाडकन खाली फेकावे तसे मला वाटले. एकदम असहाय वाटू लागले. माणसे जगात आत्महत्या का करीत असतील ह्याबद्दल अस्पष्टशी कल्पना मला त्यावेळी आली. मघा मी रागाने बबनला बोललो ही माझी भयंकर चूक होती हे तात्काळ माझ्या लक्षात आले. राग, लोभ, लाभ अथवा हानी ह्यांचा कसलाही परिणाम बबनवर सहजासहजी होत नाही ह्याची मला तात्काळ आठवण झाली. काही वेळ बबन तसाच बोलत राहिला असता तर कदाचित मला आत्महत्या करण्याचीही आवश्यकता पडली नसती. स्वतःची सुटका करून घेणे ही त्यावेळची माझी प्राथमिक गरज असल्याचे मला जाणवले.

लगेच नरमाईच्या सुरात मी म्हटले, " बबन, सॉरी हं. मी माझे शब्द परत घेतो. तुला काही टाकून बोलण्याचा माझा उद्देश नव्हता. पण···पण बबन, जरा विचार कर. मी धडधडीत जिवंत असूनही मला असं काही विचारावंस···जरा स्पष्ट बोलतो हं. आय फिल इट व्हेरी मच. हे आत्महत्येचं मलतंच काय डोक्यात घेऊन बसलास सकाळी सकाळी ?

" दॅट्स ऑल राईट. नाऊ यू आर नॉर्मल " माझ्या खांद्यावर थोपटीत तो म्हणाला. " पण कृपा करून गैरसमज करून घेऊ नकोस. आत्महत्येला भलतंच म्हणणं योग्य नव्हे. आत्महत्या हा आपण समजतो तसा फक्त शब्दकोषातला, केवळ अक्षरी शब्द नाही, तर ती एक सक्रिय विचारसरणी आहे. मानवी संस्कृतीच्या विकासाचा आणि आत्महत्येचा घनिष्ठ संबंध आहे. संस्कृतीचा विकास दाखविणारी ती एक प्राणमय

परंपरा आहे. प्राणवाहक परंपरा आहे. जीवनावरील आत्यंतिक प्रेमाभिव्यक्तीची ती पताका आहे."

माझे चकरावत जाणारे डोके काबूत राहावे म्हणून मी डोक्याला जोरदार झटका मारला. आतापर्यंत आत्महत्या म्हणजे मरणे, स्वतःच स्वतःला मारणे, स्वतःच स्वतःचा खून करणे वगैरे इतकाच त्याचा अर्थ मला माहीत होता. जास्तीत जास्त आत्मनाश, आत्मघात सारखे पर्यायी शब्दही त्यासाठी वापरतात येथपर्यंतच माझे त्या विषयीचे ज्ञान होते. परीक्षेत नापास झाल्यास, प्रेमभंग पडल्यास, प्रेम कोठेच न जुळल्यास, व्यवसायात नुकसान आल्यास आपल्या मुलामुलींनी आपल्या मनाविरुद्ध लग्ने केल्यास, निवडणुकीत डिपॉझिट जप्त झाल्यास, सत्ताधारी पक्षाचे तिकिट न मिळाल्यास निवडून आल्यावर मंत्रिपद न दिल्यास अथवा पूर्वीचे काढून घेतल्यास, सत्तेवर राहूनही विदेशात जायला न मिळाल्यास किंवा लोकांनी शांततेने भाषण ऐकून न घेतल्यास किंवा जनतेने स्वयंस्फूर्तीने आपला जन्मदिवस साजरा न केल्यास (अथवा थैली अर्पण न करता नुसत्या गौरवपर भाषणांनी साजरा केल्यास), टीकाकारांनी कवितेवर जीवघेऊ टीकेची झोड उठविल्यास, स्वतःच्या नवीन नाटकाने पहिल्याच प्रयोगाला 'हापटी' खाल्ल्यास संपादकानें मोबदला न दिल्यास अथवा अंक न पाठविल्यास, मुलीचे टोपण नाव घेऊनही संपादकांनी प्रेमपत्रे न पाठविल्यास म्हणजे ऐकूणच जीवनाचा कंटाळा अथवा आयुष्याविषयी वैताग येऊन लोक साधारणतः आत्महत्या करून टाकतात, एवढेंच मला माहीत होते. तशा अजून दुसऱ्या काही कारणासाठीही आत्महत्या झालेल्या माझ्या ऐकण्यात आहेत. एका उदयोन्मुख प्रस्तावनाकारानें म्हणे त्याने न पाठविलेली कथा संपादकानें त्याच्या नावावर साभार परत केली म्हणून आत्महत्या करून टाकली. माझ्या एका मित्राच्या मित्राचा दूरचा नातलग अन्नधान्याच्या दुर्भिक्ष्याला कंटाळून आत्महत्या करण्याच्या इराद्याने गाडीच्या रुळावर जाऊन झोपला, परंतु नेमकी त्याच दिवशी गाडी संपूर्ण चोवीस तास उशीरा आली. इकडे गाडीची वाट पाहून पाहून हा अत्यंत कासावीस झाला. शेवटी तर पडल्या पडल्या भुकेनेच त्याचे प्राण जायची वेळ आली. तसे होऊ नये म्हणून रागारागाने घरी जाऊन आगगाड्यांच्या अनियमितपणाचा निषेध म्हणून त्याने घरीच आत्महत्या उरकून टाकली. प्रेमप्रकरणांचा आणि आत्महत्येचा तर स्मशान आणि प्रेताइतका जवळचा संबंध आहे. एका प्रेयसीने तर आपल्या प्रियकराच्या प्रेमाची परीक्षा घेण्यासाठी म्हणे त्याच्याजवळ त्याच्या आत्महत्येचीच मागणी केली होती. अमेरिकेतील एका श्रीमंत माणसाला, तर "दोन दिवसात आत्महत्या करून टाकावी. न पेक्षा पुढे तुमचा खून करण्यात येईल" अशा अर्थाचे विनासहीचे पत्रच आले म्हणतात. फॅशन अथवा हॉबी म्हणून ही आजकाल आत्महत्या क्वचित ठिकाणी वापरात आहे. उलट, समाजातील आत्महत्येचे खूळ नष्ट करण्यासाठी, लोकांना लहानसहान कारणांसाठी आत्महत्येच्या विचारांपासून परावृत्त करण्यासाठी एका समाजाभिमुख हृदयपरिवर्तनवादी कार्यकर्त्याने काही दिवसांपूर्वी आत्महत्याविरोधी विविध घोषणा करीत भर रस्त्यावर, स्वतःवर तेल ओतून जाळून घेतले असल्याचेही मी ऐकले आहे. तात्पर्य: आत्महत्येविषयी मी साधारणतः येथपर्यंतच जाणत होतो.

परंतु आत्महत्येचा आणि मानवी संस्कृतीचा, तिच्या विकासाचा अथवा जीवनावरील परमोच्च प्रेमाचा अर्थाअर्थी काही संबंध असेल असे मला कधी चुकूनही वाटले नाही. बबन काळबांडे तसा बोलू लागताच मला म्हणूनच अतिशय आश्चर्य वाटले. हे सारे माझ्यासाठी अगदीच नवीन होते. आत्महत्येत मानवी संस्कृतीची प्राणवाहक परंपरा आहे वगैरे शब्द बबनच्या तोंडून ऐकताना मला साहजिकच कुतूहल वाटले. बबनविषयीच्या कौतुकाचा हलकासा झोका मनात येऊन गेला. त्याचबरोबर शहाणा म्हणवून घेणाऱ्या मला ह्यापैकी आतापर्यंत काहीच कसे कळले नाही हा एक खेदजनक विचारही मनाला चाटून गेला.

बबनचे पुढचे बोलणे ऐकायला मी काहीसा उतावीळ झालो होतो. म्हणूनच 'कृष्णा सांग कसा

बोले राहे आणि फिरे कसा' ह्या अर्जुनटाईप उत्सुकतेने मी बबनला विचारले "पण बबन, हे सारे तुला कसे कळले ? केव्हा कळले ?" ("की तूच आत्महत्या करून हा अनुभव मिळविलास ?" पण हा प्रश्न मी संयमाने दाबून टाकला.)

"हं ! ते सध्याच विचारू नकोस. कारण त्यासाठी तुला माझ्या बरोबर फार दूरवर यावे लागेल···"

"म्हणजे" दंश झाल्याप्रमाणे मी एकदम ओरडलो ! मला आता कोठे घेऊन जाणार आहेस बाबा तू ?" तो मला आता कोठे घेऊन जाण्याविषयी बोलणार ह्या विचाराने माझी छाती धडधडली. "फनी चॅप !" माझ्या खांद्यावर पुन्हा थोपटत तो म्हणाला, "अरे, दूर म्हणजे दुसऱ्या गावी जाण्याविषयी नाही म्हटले मी."

"मग ?"

"दूर म्हणजे खोलात. इन डीप. विषयाच्या दृष्टीने डीपमध्ये. पण ते सारेच तुला मी आताच समजावून सांगणार नाही. फक्त इतकीच माहिती असू दे की आत्महत्येविषयी काही अतिशय मौलिक धागे रात्री विचार करताना एकदम माझ्या लक्षात आले."

"रात्री ?" मी मध्येच विचारले. "हो रात्रीच. म्हणजे असे की रात्री मला आत्महत्या करण्याचा मूड आला. असे होते कधी कधी. विश्वाविषयीच्या आणि मानवी जीवनाबद्दलच्या अतिचिंतनाने अधून मधून ही वैचारिक अवस्था प्राप्त होते. जागतिक कीर्तीच्या काही फिलॉसॉफर्सची चरित्रे वाचल्यास त्यांच्याही आयुष्यात असे क्षण वारंवार येऊन गेल्याचे तुला कळेल. मीच त्याला अपवाद कसा राहणार ? रात्रीही तसा क्षण येताच त्याच्या शक्यतेविषयी मी विचार करू लागलो आणि एकदम माझ्या लक्षात आले..."

"काय ?"—

"की आत्महत्या करण्यापेक्षा न करण्यामध्येच मानवी प्रगतीची गुरुकिल्ली आहे. माणसाच्या वाढत्या वयाचे आणि शरिराचे रहस्य आहे. विचारांचा हाच धागा धरून ठेवून मी अजून पुढे जाण्याचा प्रयत्न केला तेव्हा ह्या विषयावरील चिंतनासाठी, संशोधनासाठी तेथे खूप व्हास्ट स्कोप असल्याचे मला स्पष्ट कळून चुकले. आता मी काय करणार हे माहीत आहे का ?"

"काय? काय करणार आहेस बरे तू बबन?" बबनच्या कर्तृत्वाची नवी दिशा लक्षात येण्यासाठी मी प्रामाणिकपणे विचारले.

"मी त्यावर आता खूप चिंतन करून, संशोधन करून तत्वज्ञानविषयक नवीन सिद्धांत ग्रंथरूपाने मांडणार आहे. बघशील तू, तत्वज्ञानाचा आतापर्यंतचा चेहरामोहराच बदलवून टाकतील माझे सिद्धांत. तत्वज्ञानाच्या ऐतिहासिक विचार–प्रक्रियेत भयंकर क्रांती खळबळ घडवून आणतील ते."

एखाद्या पहात असलेल्या स्वप्नाची रनिंग कॉमेंट्री करावी तसा बबन बोलत होता. त्याचे नवीन रूप मी लक्षपूर्वक न्याहाळू लागलो. काय नेम, हाच बबन उद्या चुकून जगाच्या बोकांडी बसला तर घ्या काय ! बिचाऱ्या बबनला (दुर्लभ अशा) मारतात (अतिसुलभ अशा मानवाचा) जन्म घ्यायला भाग पाडून परमेश्वराने त्याच्यावर खचितच अन्याय केला आहे, ह्या विचाराने माझ्या डोक्यात भयंकर खळबळ उडाली.

"पण मला राहून राहून ह्याचे आश्चर्य······" बबन अचानक बोलला.

"कशाचे ?"

"जगात एवढे मोठमोठे तत्वज्ञ होऊन गेले पण कुणाच्याही लक्षात मला सुचलेले विचार कसे आले नाहीत ?"

"आलेच नसतील असे नाही. पण विषयाच्या दृष्टीने त्यांना त्याचे महत्व वाटले नसेल. काहीतरी बोलावे म्हणून मी बोलून गेलो."

"यू कॉट दी पॉईन्ट. पण नेमक्या ह्याच गोष्टीमुळे शेकडो वर्षांपासून तत्वज्ञान जेथल्या तेथे स्वतः-भोवतीच फिरत आहे. त्याची गतीच जणू कोणीतरी रोखून धरली आहे. आत्महत्याविषयक मला सुचलेले

विचार म्हणजे जणू तत्वज्ञानाचा गाभाच. मी जगासमोर मांडणाऱ्या माझ्या नवीन सिद्धांतामुळे तत्वज्ञान एकदम पाचशे ते हजार वर्षे पुढे जाणार."

बोलता बोलता बबन एकदम उठून उभा राहिला तसाच माझ्याकडे वळून मला गदगदा हलवीत तो म्हणाला, " मित्रा, माय गुड फ्रेंड, मला आज किती आनंद होत आहे म्हणून सांगू? तो कसा व्यक्त करावा ते मला कळत नाही."

तत्वज्ञानाला एका रात्रीतून हजार वर्षे पुढे नेणारा बबन काळबांडे हा सामान्य माणूस नसून कोण्या तरी महान दिव्य शक्तीने त्याच्या रूपाने जन्म घेतलेला आहे असा भास काही क्षण मला झाला. अशा ह्या महान शक्तीच्या सान्निध्यात, इतक्या निकट केवळ बबन काळबांडेच्यामुळे आपण येऊ शकलो हे माझे केवढे भाग्य ह्या विचाराने क्षणकाल का होईना भारावून जावेसे मला वाटले. परंतु प्रत्यक्षात मात्र तसे काही न करता तत्वज्ञानाला हजार वर्षे पुढे नेऊन गति देणारा, आत्महत्येचे गूढ विश्लेषण करणारा ग्रंथ बबनने लवकरात लवकर लिहायला घेऊन मानव-जातीचे कल्याण त्याने साधावे अशी माझी उत्कट इच्छाच मी त्याला तूर्त बोलून दाखविली.

आता बबन काळबांडे त्याच्या नियोजित ग्रंथ-लेखनाच्या तयारीला लागला आहे. "मानवी संस्कृतीचा महाप्राण: आत्महत्या" हे त्याच्या ग्रंथाचे नाव योजिले असल्याचे त्याने मला सांगितले आहे. आजकाल तो त्याच्या आत्महत्याविषयक संशोधनाला भरीव स्वरूप देण्यासाठी विविध क्षेत्रांतील थोरामोठ्या विचारवंत आणि विद्वान लोकांच्या मुलाखती घेण्याचा विचार करीत आहे. जगातील पहिली आत्महत्या केव्हा झाली असावी, तिचा वेगवेगळ्या देशात निरनिराळ्या काळी कसकसा विकास झाला असावा, आत्म-हत्या आणि मृत्यू ह्यांचा काही परस्पर संबंध असेल का, यशस्वी आत्महत्या कशाला म्हणावे, आत्महत्या वारंवार केल्या जाऊ शकते काय, आत्महत्येचे मृत्युपूर्व आणि मृत्योत्तर असे दोन भाग संभवतात का, प्रौढां-प्रमाणेच लहान मुलांत आत्महत्येचे प्रमाण काय असावे, नुकतीच जन्माला आलेली बालके आत्महत्या करू शकत असतील का, वगैरे मौलिक प्रश्नांवर तो चर्चा करणार आहे.

बबन काळबांडेच्या ह्या (स्तुत्य ?) उपक्रमावर सध्याच अधिक काय बोलावे ?

निरोप

फक्त एकदा साठवून घेऊ दे
रूप तुझे डोळ्यात माझ्या
पुढला प्रवास इतका खडतर आहे
की मी शिल्लकच उरणार नाही कदाचित
दूर जाणाऱ्या धाग्यांना थोपविण्याचे सामर्थ्य
तुझ्या किंवा माझ्या हातात
आता मुळीच नाही.
भगवे क्षितिज केव्हाचे हाकारते आहे मला !
किती विलक्षण माया आहे त्याची माझ्यावर !
अन् ही हिरवी झाडे कशाला
बरे आसवे गाळत आहेत ?
तुझ्या डोळ्यातील मेघांनाही
का बरं फुटतोय पान्हा ?
आवर...आवर ना ग हे सारे
मला थोडेही बघवत नाही यातले काही
जरा फुलव ना हासू ओठावर
अन् दे मला शेवटचा निरोप
त्यावरच तर पाय फाटेपर्यन्त
चालायचे आहे मला यापुढे !

—कुसुमानंद

अनुक्रमणिका

कविता

जीवन

माझे जीवन सोडून दिले आहे मी वाऱ्यावर
दोरी तुटलेल्या पतंगासारखे...
त्याचे भरारणे देखील केवळ भासच
आहे मृगजळाचा...
खाली काटेरी बांसाने होणाऱ्या
कपाळमोक्षाचीच भीती वाटत असते त्याला
हुंदाडणारे हातही कमी करीत नाही अशा वेळेला
प्राणांचे टवके उसविण्याला
वाऱ्याच्या अधांतरी गलबतात
चालला असतो एक अनिश्चित प्रवास...
त्याची मंजिल त्याला ठाऊक नसते
खोल दरी ?... डोंगरमाथा ?... निबीड अरण्य ?
काही काही ठाऊक नसते
वाऱ्याला पाठ दाखवायची नाही
एवढेच फक्त त्याला ठाऊक असते.

गार काळा पाऊस

विलक्षण अस्वस्थतेच्या
वादळात सापडलेले खिन्न उदास मन
ग्रीष्मात सुकलेल्या नदीगत
रक्ताचे प्रवाह चैतन्यहीन...निर्जिव
दूर कुठे तरी प्रवास करणारे डोळे
अगम्य हुरहूर साठवून असलेले
अनाकलनीय वेदनेचा अदृश्य धागा
गूढ मनात खोल खोल रुतलेला
साऱ्या वृत्ती बधिरलेल्या ओंडक्याप्रमाणे
एक आठवण जाग येऊन
चाळवाचाळव करणारी
पाळण्यातल्या जाग्या झालेल्या बाळासारखी
गडद अंधाराचा कोसळणारा गार पाऊस
नसानसात शिरणारा
खोल खाचांना गती देणारा.

अंतिम क्षण

कणन्‌कण व्यापलेला
अमावस्येच्या विचित्र भयाण तांडवाने
गरगरणारे आर्त प्राण
सुन्न बुबुळात उभे आहेत
अंतिम श्वास मोजत
गर्द काळोखाची घनिष्ट
मैत्री केलेले जीर्ण झाड
बर्फाच्या पावसाने केलेल्या विद्रूप
जखमा अंगांगावर लेवून उभे आहे
नाकारलेले आहे वाऱ्यानेही
आसवांचा शोक करण्याचे काम
दूर दूर गेली आहेत
रक्ताने बांधलेली पाने—
उपकाराच्या विस्मरणाचा
चष्मा डोळ्यांवर चढवून
मातीचाही लळा लुप्त झालाय्
युगांच्या ओझ्यामुळे प्रेतांग वाहण्यास
ती तयार नाही
सारेच वाहून गेलेय्
माझे महापुरात
या अंतिम क्षणाला
कुणी कुणी उरले नाही
माझे आता !

—कुसुमानंद

अश्लीलता म्हणजे काय ?

—भास्कर जनार्दन कविमंडन

१

'अभिरुची' ने अश्लीलता या कल्पनेचा ऊहापोह करणारा एक विशेषांक काढून फार महत्त्वाचे कार्य पार पाडले आहे. ('अभिरुचि' फेब्रु–मार्च–६७, अर्थात या चर्चेची दखल सुबुद्ध महाराष्ट्राने घेतली पाहिजे, ही एक मोठी अट आहे. व ती पूर्ण होणार नाही अशी रास्त शंका मनात डोकावल्यानंतर मात्र अशा प्रयत्नांच्या विफल परिणामांकडे पाहून मन उद्विग्न होते.

'मराठा' कारांच्या अग्रलेखांची आम्ही मोठ्या चवीने दखल घेतो. अर्थात यात वाईट वाटण्याचे कारण नाही. पण यातील एक गोष्ट चिंताजनक आहे, की महाराष्ट्रात एखाद्या मुद्याला वाचकांच्या पुढे जर रेटायचे असेल व त्याची मोठ्या प्रमाणात दखल घेतली जावी अशी इच्छा असेल तर मराठाकारांच्या अग्रलेखीय पातळीवर उतरणे आवश्यक आहे ! ही पातळी फार खालच्या दर्जाची आहे, हीन आहे, असा यातून अर्थ काढू नये. अर्थ एवढाच की, शास्त्रीय व गंभीर चर्चेसाठी मराठा-कारांची पातळी अत्यंत अयोग्य आहे. अशास्त्रीय पातळीवरून मांडलेल्या मुद्यांच्या सहाय्याने गंभीर कल्पनांबद्दलच्या आमच्या तथाकथित शास्त्रीय समजुती घडतात, ही बाब चिंताजनक आहे.

'अभिरुची' ने हा विशेषांक काढून आमची चिंता दूर केली असे मुळीच नाही. पण ज्या कोणाला अश्लीलतेच्या कल्पनेबद्दल शांत व सर्व बाजूंनी विचार करणे आवश्यक वाटेल, त्याला 'अभिरुची' ने योग्य विचारांच्या विविध वाटा दाखविल्या आहेत व हे एक मोठेच कार्य आहे. अर्थात अश्लीलता ही कल्पना ज्यांना विशेष महत्त्वाची वाटत नाही, त्यांना हा विशेषांक टाळणे सहज शक्य आहे. अशा प्रामाणिक अनिच्छेने जर हा अंक टाळला तर आपल्या वाङ्मयीन समाजामध्ये काही फट निर्माण होईल असेही वाटत नाही. अश्लीलता हा एक 'Literary Concept' किंवा 'Philosophical value' जर मानला नाही तर अशी चर्चा पूर्णपणे टाळणे धोक्याचे मुळीच ठरत नाही. याच अंकात william james चे एक वचन दिले आहे.—"अश्लीलतेबद्दलच्या चर्चा अत्यंत कंटाळवाण्या असतात···तासन तास हवेत पक्षांची पिसे टाकून ती कशी व कुठे पडतात हे बघत बसण्यासारखे हे कंटाळवाणे असते ?" असा कंटाळा वाटणे अगदी शक्य आहे. पण जर अश्लीलतेबद्दची चर्चा करण्याची आमची इच्छाच असेल (खरे म्हणजे आमच्यात ही खुमखुमी असते !) तर 'अभिरुची' चा अंक टाळणे निश्चितच धोक्याचे आहे.

'अभिरुची' ने अश्लीलतेबद्दलची एक प्रश्नावली तयार करून शंभर विचार करणाऱ्यांकडे (?) पाठवून दिली ! यानंतर जे व्हायचे तेच झाले, म्हणजे कोणीही विचार केला नाही ! फक्त चार-पाच लोकांनी उत्तरे दिली आहेत. इतरांचे काय ? हे इतर वुइल्यम जेम्स याच्या पंथाचे व प्रगल्भतेचे आहेत की काय ? मुळीच नाही. आम्हाला कोणत्याही शास्त्रीय विचाराचा केवळ कंटाळाच नव्हे तर तिटकारा वाटतो व त्यापेक्षा अपघातानेच बनलेले आमचे पूर्वग्रह कवटाळणे आम्हाला सोईस्कर वाटते व फार प्रिय असते; हे त्याचे खरे

कारण आहे. हा कंटाळा किंवा तिटकारा नाहीसा करण्यास 'अभिरुची' चा हा विशेषांक काही हातभार लावील असेही वाटत नाही. तरीही या प्रयत्नाचे मोल मोठे आहेच.

हा अंक संपूर्ण वाचल्यानंतर काही प्राथमिक प्रतिक्रिया मला इथे नोंदाव्याशा वाटतात. महत्त्वाच्या प्रतिक्रिया ज्याच्या त्याने बनवाव्यात !

अश्लीलतेबद्दल प्रत्यक्ष चर्चा करणे आज तरी अशक्य आहे. याचा मी पुष्कळदा अनुभव घेतला आहे. ही चर्चा वादाने सुरू होते व भांडणाने संपते ! असे का होते याचा थोडा खुलासा आवश्यक आहे.

अश्लीलतेबद्दलची भांडणे चांगल्या सूज्ञ व समजदार माणसांतही निर्माण झालेली दिसतात. यात दोन पक्ष पडतात. एक अश्लीलता विरोधकांचा व दुसरा पक्ष अश्लीलता ही कल्पना नाकारणाऱ्यांचा. चुकीने आपण असे मानतो की दुसरा पक्ष अश्लीलतेच्या समर्थकांचा आहे. अश्लीलतेचे – म्हणजे – गाळीव फालतूपणाचे — समर्थन कोणालाही करावयाचे नसते. दुसऱ्या पक्षाला फक्त एवढेच म्हणावयाचे असते की कलेच्या संदर्भात अश्लीलता ही एक मोंडाळ व उपरी कल्पना आहे. पण या दोन पक्षांचा प्रामाणिकपणाने जरी वाद सुरू झाला तरी नंतर भांडण का उद्‌भवते ? या प्रश्नाच्या उत्तरानेच अश्लीलता या कल्पनेचे अनिश्चित स्वरूप स्पष्ट होते असे म्हणता येईल.

अश्लीलतेचा प्रामाणिक व पोटतिडीकेने विरोध करणारी काही माणसे असू शकतात. अश्लीलता ही कल्पना केव्हा निर्माण होते, याविषयी हे विरोधक व दुसरा पक्ष यांच्यात जवळजवळ एकमत आहे ! लैंगिक उल्लेख आले की अश्लीलतेचा वास येऊ लागतो. पण लैंगिक उल्लेख व क्रिया केवळ कलेतच असतात का ? अर्थात् नाही. इतरत्र फार मोठ्या प्रमाणात लैंगिक-वातावरण असू शकते. असे उल्लेख व क्रिया इतरत्र चालू असतानाही त्यांना का विरोध होत नाही ? त्याचे कारण साधारणपणे असे की, इतर क्षेत्रांतील या उल्लेखांचा व क्रियांचा परिणाम हा सामाजिक स्वरूपाचा कधीच नसतो. कलेच्या बाबतीत तो सामाजिक परिणामासह असतो. म्हणून समाजाला कीड लागू नये यासाठी हे विरोधक कलेतील अश्लीलतेला हुडकून झोडपीत असतात. म्हणजे अश्लीलता विरोधकांची पोटतिडीक ही वाङ्मयी किंवा कलांतर्गत नसून त्या कलेच्या संभाव्य सामाजिक परिणामांनी निर्माण केलेली असते. एखाद्या लेखकाने अश्लील लिखाण जर प्रसिद्ध केले नाही तर या प्रामाणिक विरोधकांचा विरोध मुळातच नाहीसा होतो. म्हणजे त्यांचा विरोध मुख्यतः सामाजिक कारणांमुळे निर्माण झालेला असतो.

उलट अश्लीलता ही कल्पना नाकारणारा पक्ष भांडणाला का सज्ज होतो ? ही कल्पना नाकारणारे सारे लेखक लैंगिक क्रियांचा जप आपल्या वैयक्तिक जीवनात करतात असे नाही. तरी अश्लीलता या कल्पनेला ते कडक नकार देतात. याचे कारण साधारणपणे असे—अश्लीलता ही कल्पना जर मानली तर तिचे वर्णन करता येईल, शिकता येईल व तिच्याबद्दल काही कायदा करता येईल, असे झाल्यास साप म्हणून भुई धोपटण्याचे प्रकार वाढतील. मोठ्या कलावंतांचे प्रत्यक्ष किंवा मानसिक बळी दिले जातील व कलावंतांच्या स्वातंत्र्यावर घाला येईल. पण कलावंतांचे स्वातंत्र्य ही कल्पना देखील मुख्यतः सामाजिक स्वरूपाचीच असून, सामाजिक संदर्भातच तिला काही अर्थ आहे. म्हणजे अश्लीलतेचे विरोधक व तथाकथित 'समर्थक' आपला विरोध व 'समर्थन' केवळ सामाजिक भूमिकेतूनच करतात. प्रत्यक्ष कलेला सामाजिक अंग असले तरी कलेचे ते उत्तमांग मानले जात नाही. कलेचे खरे व्यक्तित्व स्वयंभू असल्याने, केवळ सामाजिक परिणामांचा विचार कलेच्या बाबतीत अपुरा ठरतो. एका मोठ्या क्षेत्रातील चर्चा लहान क्षेत्रातील विविध ताणामुळे भडकते आणि नंतर भांडणे निर्माण होतात. एक व्यावहारिक उदाहरण देतो म्हणजे क्षेत्र बदलताच, गंभीर चर्चेचा लोप होऊन भांडण कसे उद्‌भवते हे स्पष्ट होईल.

आपल्या विद्यापीठांमध्ये निरनिराळ्या प्रकारच्या भांडणांना तोटा नाही. तत्त्व कमी आणि व्यवहार फार व चर्चा कमी, भांडणे फार, अशा प्रकारचे हे क्षेत्र ! कॉलेजांमधील विद्यार्थ्यांच्या वर्गाचे उदाहरण घेऊ. या वर्गात शंभर पेक्षाही संख्या कमी असावी काय, यावर समजा चर्चा सुरू झाली. दोन पक्ष पडतात. एक म्हणतो, संख्या कमी नसावी व दुसरा पक्ष म्हणतो, संख्या कमी असावी. हे जे दोन पक्ष

पडतात त्यांना फार मोठी तात्त्विक भूमिका असते, असे नाही. साधी कारणे असतात व ती विद्यापीठीय तात्त्विक क्षेत्राच्या बाहेरची असतात. ही कारणे असतात साधी आर्थिक ! वर्ग जर लहान केले तर तुकड्या वाढतील व प्राध्यापकांची संख्या वाढू शकेल, म्हणून वर्ग मोठेच पाहिजे ! तसेच वर्ग मोठे केल्यास तुकड्या कमी होतील व काम कमी झाल्याने आपल्या पोटावर पाय पडेल ही प्राध्यापकांची भीती व म्हणून वर्ग अगदी लहान पाहिजे ! अर्थात ही साधी कारणे कोणी उघड कबूल करीत नाही. विनाकारण तत्त्वांची व युक्तिवादांची पांघरुणे आंथरली जातात ! कॉलेजचा वर्ग पन्नास किंवा शंभराचाच का, यावर जर केवळ तात्त्विक चर्चा केली तर भांडणाचा प्रसंग उद्भवण्याचे कारण नाही. अर्थात ही भांडणे टाळणे फार कठीण आहे.

हे असे कठीण काम 'अभिरुचीने' बऱ्याच यशस्वीपणे पार पाडले आहे. या अंकाचा दर्जा व स्वरूप मुख्यत: सैद्धांतिक राखण्यात 'अभिरुची,'ने यश मिळविले आहे. मधून मधून विधानांना भांडणाचा सूर लागला आहे, पण तरीही अंकाचा तोल गेला नाही. याला अपवाद एकच आहे व तो प्रसिद्ध लेखकाचा आहे. प्रा. श्री. के. क्षीरसागरांची उत्तरे (कदाचित प्रामाणिक प्रतिक्रिया असेलही) पुरेशी चिडखोरपणाची व अशास्त्रीय आहेत.

अश्लील लिखाण आणि अश्लील साहित्य यात फरक केला पाहिजे; असा योग्य मुद्दा दि. के. बेडेकरांनी सुचविला आहे. अश्लील लिखाण हे सामाजिक क्षेत्रात केवळ व्यापारी धोरणांनी प्रसारित केले जाते. व त्याचा समाचार त्याच व्यावहारिक पातळीवर घेणे उचित ठरेल. खरा प्रश्न आहे तो अश्लील साहित्याचा. अश्लील–साहित्य किंवा अश्लील–कला हा एक वदतोव्याघाताचा प्रकार आहे; खरे साहित्य हे अश्लील असूच शकत नाही, असे काहींचे म्हणणे असते. पण हे बरोबर नाही. "अश्लीलता ही जास्तीत जास्त चांगल्या कलाकृतीचे शरीर पसंत करते" हे शेप या लेखकाचे मत व त्याची चर्चा बरीचशी योग्य आहे. अश्लीलतेची व्याख्या करण्याचा बाका प्रसंग 'अभिरुची'ने प्रश्नावलीच्या निमित्ताने, लेखकांवर आणला आहे ! या प्रश्नावलीची दोनच उत्तरे या अंकात छापली आहेत. व त्या दोन्ही उत्तरात अश्लीलतेची योग्य व्याख्या दिलेली नाही. (अश्लीलता हे एक अ–व्याख्येय पद मानून मोकळे व्हावे !)

अश्लीलता ही दुर्गंधीसारखी असते असे क्षीरसागरांचे मत आहे ! पण ही व्याख्या नाही ! व्याख्या देताना क्षीरसागरांची मोठीच धांदल उडाली आहे ! 'Outraging our sense of decency', हे क्षीरसागरांनी अश्लीलतेचे व्यवच्छेदक लक्षण मानले आहे. मला वाटते 'decency' किंवा 'सभ्यता' या कल्पनेपेक्षा अधिक बिनबुडाची कल्पना या संबंधात वापरणे कोणालाही शक्य नाही ! 'सभ्यतेच्या भावनेचा भंग म्हणजेच अश्लीलता' ही मासलेवाईक व्याख्या करून क्षीरसागरांनी एक संदिग्ध व्याख्येचा नमुना दिला आहे. याच अंकात चित्र्यांनी निराळ्या निमित्ताने सभ्यतेचा भंग करणारे प्रकार आज आपल्या समाजात कसे विपुल आहेत व त्यांनाही अश्लील का म्हणू नये, हा मार्मिक प्रश्न उपस्थित केला आहे. अन्नान्नदशा असलेल्या या आमच्या 'संस्कृती–संपन्न' देशात गोंडस शब्दांबरोबर सुग्रास भोजन करणे किंवा त्याचे वर्णन करणे हे सुद्धा अश्लील का मानू नये ? भुकेने हातपाय झाडणाऱ्या माणसासमोर तुपाची नाजूक–साजूक धार पिणे ही परमावधीची असभ्यता आहे की नाही ? म्हणजे असभ्यतेची कल्पना अश्लीलतेच्या संदर्भात काहीही स्पष्ट करीत नसून, काहीही करणे व लिहिणे अशक्य करून सोडते. एवढी संकोच पावलेली व केवळ वैयक्तिक लहरींना तृप्त करणारी व्याख्या क्षीरसागरांनी का द्यावी, हे समजत नाही.

२

'अभिरुची'च्या या अंकात तीसच्या जवळपास लेख आहेत. त्यांपैकी आठ लेख पाश्चात्य किंवा महाराष्ट्रीयेतर लेखकांचे अनुवादित स्वरूपाचे असून इतरही लेखांत पाश्चात्यांचा भरपूर आधार घेण्यात आला आहे. संपादकीयात याचा स्पष्ट उल्लेख आहे. "अश्लीलता" या विषयावर शक्य तितक्या बाजूंनी गंभीरपणे मनाचा तोल राखून विवेचन करणे अगदीच अशक्य नाही; हे साहेब लोकांच्या मदतीने पट-

विता येईल. 'अर्थात असा आधार घेण्यात फारसे गैर काही नाही. पण साहेब लोकांचा आधार घेण्यात जो घोटाळा होण्याचा संभव आहे तोही लक्षात घेतला पाहिजे. त्याचा उल्लेख या लेखाच्या शेवटी मी करणार आहे. मनाचा तोल न बिघडू देता अश्लीलतेचे विवेचन करणे, या अंकातील इतर लेखकांना जमले आहे का ? याचे उत्तर सामान्यतः होकारार्थी द्यावे लागेल. क्षीर-सागर व दुर्गा भागवत या दोघांनी मोकळेपणाने भांड-खोर सूर पत्करला आहे ! (अर्थात दोन विरोधी पक्षाचे दोघे समर्थक आहेत) क्षीरसागरांनी आपल्या उत्तरात कसलेही विवेचन करण्याचे टाळले असून ठोक मते फक्त फेकली आहेत. अशी ठोक मते मांडण्याचे स्वातंत्र्य कोणालाही आहेच. "माझी मते अशीच आहेत." असे म्हटल्यावर चर्चा व विवेचन करण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. दुर्गाबाई पण अशाच सरसावल्या आहेत. (विरुद्ध बाजूने !) विवेचन थोडे व किस्से जादा, हे त्यांच्या लेखाचे स्वरूप आहे. त्यांनी दिलेले किस्से वाचतांना मजा वाटते. व काही बोध सुद्धा घेता येतो. पण अश्लीलतेच्या गंभीर विवेचनात या मनोरंजक किस्सेबाजीला शून्य किंमत आहे.

अशीच उदाहरणांची रेलचेल आणखी तीन चार लेखांत दिसते. गाजलेले खटले, चित्रपटांतील कामुकता, आवड-निवड, प्रश्न व चिन्हे, मते मतभेद, पिवळी पुस्तके, या विषयांच्या निमित्ताने अश्लीलतेच्या संद-र्भातील विविध व विपुल उदाहरणे वाचायला मिळतात. (सामान्य वाचकाला आकर्षण !) पण अशी 'डाय-जेस्ट' पद्धतीच्या उदाहरणांनी या अंकाची जागा उगाच अडविली आहे, असे मला वाटते. या अंकातील दि. के. बेडेकर, गार्गी सरदेसाई यांचे लेख सामान्य पण उपयुक्त माहिती देणारे आहेत. अलिप्तपणे सामान्य मुद्यांची थोडी चर्चा या लेखात आली आहे. दिलीप चित्र्यांचे चार लेख व विश्वनाथ रघुनाथ पाटलांचे चार लेख या अंकात आहेत. त्यात बऱ्याच विविध मुद्यांना त्यांनी स्पर्श केला आहे.

चित्र्यांचे चारही लेख त्यांच्या नेहमीच्या प्रांजळ विक्षिप्तपणाने आणि काही स्वतंत्र कल्पनांनी भरपूर आहेत ! मात्र या चारही लेखांत अश्लीलतेबद्दलचे विशेष गंभीर व महत्वाचे विवेचन हाती लागते असे म्हणता येत नाही. 'सांस्कृतिक राजकारणातील डावपेच,' हा लेख तर मराठा-कारांच्या टीकेला बिन-तोड जबाब देण्याच्या इच्छेनेच लिहिला आहे. (त्याचा उपयोग अत्र्यांना होईल !) अत्र्यांना या निमित्ताने विश्वासपूर्ण व काही ठिकाणी त्यांच्याच पातळीवर जाऊन चित्र्यांनी उत्तरे दिली आहेत. ही अत्रे-चित्रे वादावादी वाचायला बरी आहे.

चित्र्यांचा वादग्रस्त जरी ठरला तरी खरा मह-त्वाचा लेख एकच आहे. व तो म्हणजे "अश्लीलता हे सांस्कृतिक व वाङमयीन मूल्य असू शकेल काय ?" अश्लीलतेच्या कल्पनेला प्रामाणिक विरोध करणाऱ्यांनी या लेखाचे खंडन केलेच पाहिजे, इतके महत्व या लेखाला आहे.

वि. र. पाटलांचे सहाय्य लाभल्यामुळेच 'अभि-रुची'चा हा अंक तयार होऊ शकला असे संपादकच म्हणतात. या पाटलांचे खरोखर आभार मानले पाहिजेत. पाश्चात्य विचारांचा त्यांनी केलेला अनुवाद जरी काही ठिकाणी लटपटता झाला असला तरी अश्लीलता या विषयाच्या विविध बाजू मराठी वाच-कांच्या निदर्शनाला आणण्याची त्यांची खटपट व वरेच मोठे यश मान्य केलेच पाहिजे. अश्लीलतेबद्दलची शास्त्रीय बैठक (पाश्चात्य विचारांच्या सहाय्याने का होईना) मांडण्याचे श्रेय त्यांना दिले पाहिजे.

अश्लीलतेच्या कायद्यासंबंधीचा आनंद दातार यांचा लेख फार माहितीपूर्ण उतरला आहे. या कायद्या-बद्दलची चर्चा दिलीप चित्र्यांनी व गीता साने यांनी सुद्धा केली आहे. ती चर्चा मात्र वरीचशी आवेशपूर्ण व म्हणून संशयास्पद ठरण्यासारखी आहे.

यानंतर या अंकातील शास्त्रीय पातळी व गांभीर्य राखून यशस्वीपणे पार पाडलेल्या विवेचनाचा उल्लेख करतो. पाश्चात्य लेखकांचे सर्वच लेख फार दर्जेदार जरी नसले तरी या चर्चेला आवश्यक असलेली अलिप्तता पाळणारे आहेत. हर्बर्टरीडचा "अश्लीलता मानसशास्त्र व शिक्षण" हा लेख या बाबतीतील उत्कृष्ट प्रतिपादनाचा एक नमुना म्हणून सांगता येईल. दुसरा लेख रा. भा. पाटणकरांचा आहे. ("वाङमयीत अश्लीलता") या लेखात परिचित विचार व अनुमाने सापडतात, पण हा पूर्ण लेख शांत व स्पष्ट विचारांचे एक चांगले उदाहरण आहे. तिसरा चांगला लेख म्हणजे 'शेष' या लेखकाचा आहे. प्रश्नावलीला उत्तरे देण्याच्या निमित्ताने काहीशी

अश्लीलताविरोधक भूमिका शेषांनी फार समर्थपणे मांडली आहे. (क्षीरसागरांची मते व शेषांची शास्त्रीय उत्तरे यातील फरक चटकन लक्षात येतो.) 'अश्लीलतासमर्थकांना' शेषांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरे देणे आवश्यक वाटले पाहिजे.

या अंकातील फसलेली एक चांगली योजना म्हणजे प्रश्नावलीची आहे. प्रश्नांची आखणी, अश्लीलता विरोधकाला कैचीत पकडण्याची आहे अशी तक्रार क्षीरसागरांनी केली आहे. कदाचित याच कारणासाठी अनेकांनी या प्रश्नावलीची उत्तरे पाठविली नसावी! पण प्रतिपक्षाला पेचात पकडण्याचे तंत्र अयोग्य का म्हणावे? अश्लीलता-विरोधक तर नेहमीच हे तंत्र वापरीत आले आहेत. आणि तुमची भूमिका पुरेशी मूलगामी व मक्कम विचारांनी तयार झाली असल्यास, या वैचारिक कैचीची भीती का म्हणून वाळगावी? या प्रश्नावलीला वुजून न जाता शेषांनी जी विश्वासपूर्ण उत्तरे दिली (अश्लीलता विरोधकाच्या भूमिकेवरून) ती पाहून, या प्रश्नावलीच्या स्वरूपाचे भय किंवा पूर्वग्रह, उत्तरे देण्याच्या आड येतात हे म्हणणे खरे वाटत नाही. तसे पाहिल्यास या संपूर्ण अंकाची योजना व आखणी, अश्लीलतेच्या उथळ व आळशी विरोधकांना कैचीत पकडण्याची आहे. पण यात गैर काही नाही. 'अभिरुची'ने या अंकाच्या सहाय्याने जो पेच टाकला आहे, तो सोडविण्याचे महत्वाचे कार्य, अश्लीलता-विरोधक-समित्यांनी आता करावे!

या अंकाचा अल्पसा परिचय वर दिल्यानंतर या अंकात जे महत्वाचे मुद्दे उपस्थित केले आहेत, त्यांची नोंद करून नंतर या अंकातील विचारांमध्ये जे दोष जाणवले त्यांचा स्थूल निर्देश करून हा परीक्षणवजा लेख पूर्ण करतो. अश्लीलता या कल्पनेची व्याख्या करा किंवा करू नका, एक गोष्ट निश्चित आहे की अश्लीलता म्हणजे, क्षीरसागर मानतात त्याप्रमाणे केवळ सभ्यतेच्या भावनेचा भंग नव्हे. परवाच माझ्या वाचनात डॉ. लवंदे या चमत्कारिक विद्वावाचा एक लेख आला. (ज्ञानदेव-प्लेटो-सोनोपंत, 'मराठा' १६ आणि १८ एप्रिल ६७) लेख फार मजेदार आहे! सोनोपंत दांडेकर (ह. भ. प.) या एका सज्जन माणसाला लवंद्यांनी पुढील विशेषणे बहाल केली आहेत··· "नालायक, मूर्ख, लुच्चे, बेवकूफ, बौद्धिक कुवत नसलेला गुंड, भुक्कड बेडूक···इत्यादि···" इतक्या शिव्या अगदी सहजपणे लवंद्यांनी दिलेल्या पाहून, मराठाकार मुद्धा पराभवाच्या भावनेने क्षणभर गळून गेले असतील! असभ्यतेचा हा वेग! हे सर्व वाचून लवंद्यांना एक अश्लील माणूस असे क्षीरसागर म्हणणार आहेत काय! लवंद्यांना पिसाटपणाचा झटका आला आहे, अशी काळजी जरी आपल्याला वाटली तरी पण ते गृहस्थ अश्लील आहेत असे आपण म्हणणार नाही, लवंद्यांनी Sense of decency 'चा उघड भंग केला आहे. तरीही हे लिखाण अश्लील नाही. (तरीही अश्लीलता विरोधक समितीने याची दखल घ्यावी!) अश्लीलता-कल्पनेशी सभ्यता-भंगाचा जो संबंध जुळतो तो केवळ अप्रत्यक्षपणाने. खरे महत्त्वाचे असे आहे की, अश्लील वर्णन तेव्हाच निर्माण होते की जेव्हा लैंगिक व तत्संबंधी उल्लेख केले जातात. प्रत्यक्ष लैंगिक कृती ही अत्यंत सार्वत्रिक आहे. व एक कृती या दृष्टीने अश्लील वगैरे काहीही नाही. सामाजिक संदर्भातच या कृतीला जे भिन्न अर्थ येतात, त्या निमित्ताने अश्लीलतेचा प्रश्न उद्‌भवतो. लैंगिक कृतींचे वस्तुनिष्ठ वर्णन सुद्धा अश्लील नसते. शास्त्रांत ते येतेच. या कृतींचे रूपांतर जेव्हा एका जटिल विकृतीत होते तेव्हाच अश्लीलता जाणवते. हा मुद्दा या विशेषांकात निरनिराळ्या ठिकाणी मांडला गेला आहे. व त्याचा खुलासाही झाला आहे. अश्लीलता आणि असभ्यता, अनैतिकता या कल्पनांत फार फरक आहे. हा फरक स्पष्ट करून विकृत क्रिया व त्यांची वर्णने यांच्या सहाय्याने अश्लीलता निर्माण होते असेही अनुमान या अंकात काढले आहे. अश्लीलतेबद्दलचा आजचा कायदा व त्यातील सुधारणांचे स्वरूप याची चर्चा या अंकात आहे. वाङमयातील अश्लीलता ही अनुभव-चित्रणाच्या over-simplification मधून निर्माण होते, केवळ लैंगिक उल्लेखांनी होत नाही, हा पाटणकरांचा मुद्दा आहे. लैंगिक समजल्या जाणाऱ्या गोष्टींना विशिष्ट चौकटीतच केवळ लैंगिक अर्थ असतो. चौकट मोठी केली की त्यांना वेगळा अर्थ प्राप्त होतो.

केवळ लैंगिक अनुभव असलेले वाङमय हे आपण त्याज्य का समजतो? याचे कारण सामाजिक आरोग्य नीट राहावे एवढेच आहे. पण जसे आरोग्य चांगले राखण्यासाठी कधी कधी माणसाला अल्प मात्रेत

बीष सुद्धा देतात, तसेच समाजाला धक्का देण्यास व अपेक्षित परिणाम घडवून आणण्यास, अश्लीलता हे एक वाङमयीन मूल्य (सौंदर्य या मूल्याप्रमाणे) मानावे हा चित्र्यांचा नवीन मुद्दा आहे. म्हणजे अश्लील वर्णनाच्या योजनेला वाङ्मयात निश्चित कार्य असते व एकूण परिणाम साधत असल्यास, ते कार्य अश्लील-तेला करू द्यावे.

चित्र्यांचा हा मुद्दा तसा योग्य व साधा वाटतो. पण त्याची उदाहरणे जी चित्र्यांनी दिली आहेत ती पाहून, हा मुद्दा प्रत्यक्षात येण्यासारखा नाही असे वाटू लागते. अश्लीलतेला एक सहाय्यभूत ठरणारे मूल्य म्हणून वापरणे खरोखर शक्य आहे का? या लैंगिक वर्णनाला एक कलापूर्ण साधन म्हणून हाताळणे अत्यंत कठीण असावे. त्यात अनेक भलते मोह निर्माण होऊन कलाकृती बिघडण्याचा संभव असतो. लॉरेन्सच्या कादंबऱ्यांत संभोगाची खुली वर्णने अनेकदा आली आहेत.. कशाला? धक्का देण्यास? सामाजिक सुस्तीला खडबडून देण्यास? पण एकदा असा धक्का दिलेला पुरत नाही का? की धक्क्यामागून धक्के द्यावे लागतात? एकदा लैंगिक वर्णन केले की त्याचे इतके पुनरावर्तन होऊ लागते, की या वर्णनाचे मूळ प्रयोजनच नाहीसे झाल्यासारखे होते. आणि वाचकांची काय स्थिती होते? असा एक धक्का बसताच ते धडपडतात पण नंतर वारंवार असे धक्के बसू लागताच त्यांना त्यांतच गंमत वाटते व कलाकृतीचा, तिच्या परिणामाचा कोणताही विचार शिल्लक राहत नाही. या लैंगिक वर्णनामुळे वाचकाचे एक चमत्कारिक औत्सुक्य व आकर्षण चाळवले जाते. ही वर्णने एक वाङ्मयीन मूल्य म्हणून वापरताना जर त्याचे प्रत्यक्ष कलात्मक कार्य बाजूला राहून, त्या वर्णनाने केवळ सामान्य जिज्ञासाच फक्त चाळवली गेली तर, कलात्मक परिणामाच्या ऐवजी वासनांची विकृत चाळवाचाळ करण्याचे पाप मात्र लेखकाच्या माथी बसायचे.

धार्मिक अश्लीलतेची चांगली चर्चा वि. र. पाटलांनी केली आहे. आस्तिकांची धार्मिक अश्लीलता विवाद्य हा एक विषय असून, त्यात वासना व भावना आणि त्यांच्या उदात्तीकरणाचे प्रयत्न, हे विषय येत असल्याने, त्यांची समग्र चर्चा करणे या अंकात शक्य नव्हतेच.

शेवटी या अंकातील महत्त्वाचे दोष नमूद करतो. हा अंक मुख्यतः पाश्चात्य विचारांवर आधारला आहे. अश्लीलतेची कल्पना ही स्थल–काल व संस्कृति–सापेक्ष आहे. तेव्हा अशा बाबतीत पाश्चात्यांची अनुमाने सर्रास आपल्याकडे आणणे योग्य होईल का?

या प्रश्नाचा खुलासा या अंकात नाही. गीता साने यांनी याचा केवळ उल्लेख केला आहे. दुसरा दोष असा की अश्लीलता ही कायद्याने दडपावी का, याची या अंकात जशी चर्चा आहे तशी साहित्यसभेच्या एखाद्या पोटसमितीने अश्लीलता हुडकीत बसावे का, याची चर्चा नाही. कायदा जसे दडपण आणतो तसेच प्रचार सुद्धा दडपण आणतोच.

अश्लीलता जी जाणवते ती वाङ्मय वाचल्यावरच, म्हणजे वाङ्मयाचा समग्र परिणाम जो होतो त्यात 'अश्लील' परिणाम हा एक भाग असू शकतो. म्हणून अश्लीलता व विवेचनात, वाङ्मयाचा परिणाम कोणावर, किती प्रमाणात व कशा स्वरूपाचा होतो, याचे मानसशास्त्रीय विवेचन असले पाहिजे. ही बाजू या अंकात दुर्लक्षित झाली आहे. आजच्या मराठी वाङ्मयाच्या संदर्भात, प्रत्यक्ष समीक्षात्मक (जसा वासूनाक्यावर 'आलोचने' त परिसंवाद प्रसिद्ध केला होता.) विवेचन या अंकात फारच थोडे आहे. (याशिवाय या अंकाची छपाई फार गचाळ आहे.)

असा हा 'अभिरुची'चा अश्लीलता विशेषांक! मराठीतील एका अत्यंत वादग्रस्त विषयावर अनेक बाजूंनी लिखाण एकत्र करण्याचा हा पहिलाच व व मोठ्या प्रमाणात यशस्वी झालेला हा प्रयत्न आहे. 'बुद्धिवादी महाराष्ट्राने' या प्रयत्नाचे स्वागत केले पाहिजे.

नाटककार वीर वामनराव जोशी

—श्री. वि. गुजर

प्रस्तावना

विदर्भातील राष्ट्रीय चळवळीचे एक अग्रगण्य पुढारी, स्वातंत्र्य संग्रामातील एक धुरंधर सेनापती, नामवंत साहित्यिक, तेजस्वी नाटककार, प्रभावशाली वक्ते व आदर्श पत्रकार वीर वामनराव जोशी यांचे नाव माहीत नाही अशी एक तरी व्यक्ती महाराष्ट्रात आढळेल काय ? स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सरकारने देशभक्तांचा गौरव करण्याच्या हेतूने मानधन देऊ केले असता "दारिद्र्य हे माझे जन्मजात भावंड आहे" असे सांगून ते नाकारणारे वीर वामनराव यांना कोण विसरणार आहे ?

जीवनदर्शन

आज वामनरावांबद्दल जे लिहावयाचे आहे ते मुख्यत्वेकरून त्यांच्या नाटकांबद्दल लिहावयाचे आहे, हे जरी खरे असले तरी नाटककाराची अस्मिता त्याच्या नाटकांहून श्रेष्ठ आहे. त्यामुळे त्यांच्या नाटकांबद्दल लिहिताना त्यांचे जीवनचरित्र पाहिल्यास काही वावगे होणार नाही. वामनराव यांच्या अस्मितेचा विचार केल्याशिवाय त्यांच्या नाट्यकलाकृतींबद्दल पूर्ण विचार करताना त्यांच्या पदवीचा पुष्कळच उपयोग होणार आहे. ते वीर वामनराव म्हणून ओळखले जातात.

वीररसप्रधान नाटके पुष्कळ नाटककारांनी लिहिली पण त्या सर्व नाटककारांमध्ये फक्त वामनराव जोशी यांनाच 'वीर' ही पदवी मिळालेली आहे. शिरवळकार व त्यापुढील जमान्यात खाडीलकर या नाटककारांनी वीररसप्रधान नाटके लिहिलेली आहेत. खाडीलकरांनी राजकारणातदेखील भाग घेतला. देशातील परिस्थितीचे चित्र नाटकांतील पात्रांच्या तोंडून वदविले, तरीदेखील त्यांना वीर ही पदवी मिळाली नाही. वीर ही पदवी एकट्या वामनराव जोशी यांच्याच वाट्यास आली. त्यांच्यानंतर अनेक लोकांना वीर पदवी देण्यात येऊन त्यांचा गौरव करण्यात आला, पण वामनरावांची सर कोणत्याही वीराला आली नाही; कारण असामान्य त्याग, निर्भय वृत्ती व निस्पृहता या अलौकिक गुणसमुच्चयाने तळपणाऱ्या वामनरावांच्या पासंगालाही इतर वीर पोहचू शकले नाहीत.

वामनरावांचा पंचाहात्तर वर्षांचा जीवनपथ ही एक उग्र तपश्चर्या आहे. त्यांनी देशाच्या स्वातंत्र्याकरिता घरदार, कुटुंब या कोणत्याही गोष्टीची पर्वा केली नाही. वऱ्हाडात कांग्रेसच्या स्थापनेपासून त्यांनी या संस्थेत भाग घेतला व कर्तबगार पित्याप्रमाणे कांग्रेस या कन्येकरिता हाडाची काडे केली.

इ. स. १९२० मध्ये वरिष्ठ अधिकाऱ्याशी न पटल्यामुळे त्यांनी सरकारी नोकरी सोडली आणि खाजगी शाळेत ते शिक्षक म्हणून राहिले. इ. स. १९०८ साली वामनराव ज्या खाजगी शाळेत नोकरी करीत होते ते हायस्कूल इंग्रज सरकारच्या अवकृपेमुळे बंद पडले, म्हणून त्यांना मुंबईला जावे लागले. तेथे त्यांनी 'राष्ट्रमत' या पत्राचे संपादन केले पण ते पत्र सरकारी रोषामुळे बंद पडले. नंतर वामनराव उमरावतीला आले. याचवेळी नटवर्य केशवराव भोसले हे नव्या नाटककाराच्या शोधात होते. वामनरावांची वीररसाने परिपूर्ण असलेली भाषणे त्यांनी मुंबईला ऐकली होती. तेव्हा त्यांनी वामनरावांची भेट घेतली व सतत दोन तपे रंगभूमी

अनुक्रमणिका

गाजवून हुकुमी पैसा देणारे " राक्षसी महत्वाकांक्षा " हे सुप्रसिद्ध नाटक वामनरावांनी १९१२ मध्ये लिहिले व १९१३ साली ते रंगभूमीवर आले. या नाटकाबद्दल अल्प मोबदला वामनरावांना मिळाला.

वामनरावांच्या ' रणदुंदुभि ' नाटकातील तेजस्विनीच्या म्हणण्याप्रमाणे जगातल्या वेड्यांच्या बाजारातील देशाच्या स्वातंत्र्याकरिता वेडे झालेल्यांपैकी वामनराव एक वेडेपीर बनले आणि त्यांनी ध्येय-सिद्धीच्या मार्गात येणाऱ्या अनंत अडचणींशी छाती-ठोकपणे मुकाबला केला.

राजकारण हा वामनरावांचा आत्मा होता, नाटक नव्हे. जेव्हा ते परिस्थितीने गांजले तेव्हा त्यांनी नाटके लिहून आपली पैशाची गरज भागविली. कित्येक राज-कारणी लोक आपल्या स्वार्थाकरिता राजकारणाचा उपयोग करून घेतात पण वामनरावांनी मात्र आपल्या राजकारणासाठी नाटकांचा उपयोग करून घेतला.

नाटके लिहिण्याचा उद्देश--

ज्वलंत स्वदेशाभिमान हा वामनराव जोशी यांचा मुख्य गुण आहे आणि त्यांच्या रंगभूमीवर आलेल्या " राक्षसी महत्त्वाकांक्षा " (१९१३), " रणदुंदुभि " १९२७ आणि " धर्मसिंहासन " (१९२९) ह्या तीनही नाटकांचा विषय स्वातंत्र्य हाच आहे. स्वातंत्र्याच्या जोडीला न्याय, धर्म, स्वाभि-मान ह्यांना त्यांच्या नाटकात महत्त्वाचे स्थान आहे. त्यांची ही तीनही नाटके तेजस्वी असून उदात्त तत्त्व-विशेषाच्या ऊर्जस्वल प्रचाराकरिता लिहिलेली आहेत.

वामनरावांनी एके ठिकाणी आपली भूमिका स्पष्ट केलेली आहे. त्यांनी नाटक लिहिण्यास लेखणी उचलली ती मुख्यत्वेकरून पोटासाठीच; कलेसाठी नाही, ही गोष्ट त्यांनी स्पष्ट केली आहे. त्याचप्रमाणे आपला देश परकीयांच्या गुलामगिरीत सडत पडला आहे, त्याला गुलामगिरीतून मुक्त करावयाचे असल्यास आपल्यापैकी काहींनी सर्वस्वत्यागाची तयारी केल्या-वाचून अन्य मार्ग नाही, हा वामनरावांचा जीवनाचा ध्येयवाद होता आणि तोच ध्येयवाद त्यांनी आपल्या नाटकातही उतरविला आहे. मराठी रंगभूमीवरील इतर नाटककार आणि वामनराव यांच्यामध्ये हा महत्त्वाचा फरक आहे. देशभक्तिमय त्यागाची दिव्य उदाहरणे ज्यात लोकांच्या डोळसमोर प्रत्यक्ष मांडता येतील, अशाच कथा वामनरावांनी रसिकांच्या सेवेस सादर केल्या आहेत. अशा प्रकारची भूमिका निर्माण करणारे वामनराव मराठी रंगभूमीवरील एकमेव नाटककार होत.

त्यांच्या नाटकांत स्वातंत्र्य, न्याय, धर्म व स्वाभिमान हे विषय उघडपणे मांडलेले आहेत त्यामुळे त्यांच्या नाटकांतील विषयांचा ध्वनी शोधावा लागत नाही. रूपकाचे अवगुंठन देखील त्यांनी घेतलेले नाही. इतक्या स्पष्टपणे ह्या सर्व तत्त्वांचा प्रचार अन्य नाटककारांनी फारच क्वचित् केलेला आढळतो. केवळ लेखनाच्या जोरावर जो काही प्रचार होईल तेवढा करून वामनराव थांबले नाहीत. त्यांनी प्रचार आणि प्रत्यक्ष कार्य ह्या दोन्ही गोष्टी प्रत्यक्ष केल्या. त्यामुळे ते अनेक नाटकांना जन्म देऊ शकले नाहीत. त्यांच्या नाटकांतील प्रचार उघडउघड व सरळपणे हृदयाशी भिडेल असा आहे.

नाटकांसंबंधी

आपल्या पहिल्याच नाटकाने अमाप लोकप्रियता मिळविणारे जे थोडे नाटककार मराठी रंगभूमीवर तळपले त्यांमध्ये वीर वामनराव यांचा क्रमांक लागतो. कै. किर्लोस्करांनंतर पहिल्याच नाटकाला प्रचंड यश मिळविणारे कै. वामनराव जोशी हे एकमेव नाटककार होते, असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. " संगीत राक्षसी महत्त्वाकांक्षा " हे वामनरावांचे पहिले नाटक " खूबसूरत बला " ह्या उर्दू नाटकावर आधारलेले आहे असे स्वत: नाटककारांनी या नाट-काच्या प्रस्तावनेत लिहिले आहे. मात्र मराठीत हे नाटक आणताना वीर वामनरावांनी त्याला तात्त्विक बैठक दिली आहे व मूळच्या नाटकापेक्षा कथानकात बरीच वाढ केलेली आहे. नावाप्रमाणेच ते नाटक प्रचंड आहे. प्रसिद्ध साहित्यिक वि. स. खांडेकर यांनी या नाटकाला तुफान दर्या म्हटले आहे. वामनरावांनी जरी हे एकच नाटक लिहिले असते तरी त्यांचे " नाटककार " हे मानाचे स्थान कायमच राहिले असते. परंतु वामनरावांनी त्यानंतर **" रणदुंदुभि "** **" धर्मसिंहासन "**, **" न्यायाचा दरबार "** आणि **" सुडाचा संदेश "** ही पाच नाटके लिहून मराठी रंगभूमीची सेवा केली आहे.

" राक्षसी महत्वाकांक्षा " या नाटकात स्वामिनिष्ठा विरुद्ध स्वामिद्रोह, " रणदुंदुभि " या नाटकात राजनिष्ठा विरुद्ध स्वार्थांधता, आणि " धर्मसिंहासन " या नाटकात लोकशाही विरुद्ध स्वयंभू राजसत्ता असे जोरदार संग्राम अत्यंत प्रभावी व भीषण स्वरूपात रंगविलेले आहेत. जेव्हा प्रेक्षक ही नाटके पाहतात तेव्हा त्यांची मने थरारून जातात. त्यांची उत्कंठा एकसारखी वाढत जाते, कारण त्या नाटकातील प्रसंगच उत्कंठा वाढविणारे आहेत. नाटकात निकराचे प्रसंग घडवून आणणाऱ्या भडक मनोवृत्तीच्या व्यक्ती या नाटकांत आहेत. त्या व्यक्तींच्या भाषणांतून व कृतींतून उदात्त भावनांचे स्फूर्तिदायक दर्शन होते.

ह्या तीनही नाटकांचा विषय राजकारण हाच आहे. ह्या तीनही नाटकांत असत्याचा व अन्यायाचा पराभव आणि सत्याचा व न्यायचा विजय झाल्याचे दाखविले आहे. ही तीनही नाटके तत्त्वप्रधान, वीररसप्रधान व राजकारणप्रधान आहेत. नाटकांतील भाषा दणदणीत, काही काही भाषणे वीर वामनरावांच्या सभेमधील भाषणांचे नमुने आहेत. नाटकांत भाषणाच्या दणदणीतपणाबरोबर अभिनयाला भरपूर वाव आहे. त्यामुळे प्रेक्षकवर्ग नेहमी जागृत असतो. ह्या तीन नाटकांत गुणसाधर्म्य असले तरी वस्तुवैचित्र्य आहे आणि त्यामुळे ही तीन नाटके निरनिराळी वाटू लागतात. ह्या तीनही नाटकांत तेजस्वीपणा ओतप्रोत भरलेला आहे.

राजघराण्यात जी व्यक्ती कायदेशीर वारस असेल तिलाच राज्य मिळाले पाहिजे एवढा एकच सिद्धांत ' राक्षसी महत्त्वाकांक्षा ' या नाटकात मांडलेला आहे. पन्नादाईला लाजविणारी देवांगना ह्यात आहे. ती राजपुत्र चंद्रशेखर याचे प्राण वाचावे व राष्ट्रहित साधावे यासाठी स्वतःच्या पुत्राचे बलिदान देण्यास मागेपुढे पाहत नाही. " राजपुत्र चंद्रशेखर कोठे आहे?" असा प्रश्न मदालसेच्या सैनिकांनी विचारल्याबरोबर ती आपल्या पुत्राकडे बोट दाखविते. सैनिक त्याला ठार करतात व त्याचे शिर बरोबर घेऊन जातात. ते शिर चंद्रशेखराचे नसून देवांगनेच्या पुत्राचे आहे, ही गोष्ट दुर्जय ओळखतो. आपल्या हातून चंद्रशेखर निसटला हे पाहून मदालसा अतिशय संतापते व या गोष्टीचा सूड घेण्यासाठी ती देवांगनेचे भयंकर हाल करते. मदालसा चंद्रशेखराचा पत्ता देवांगनेकडून काढण्याचा अतिशय प्रयत्न करते, पण देवांगना तिला दाद देत नाही. म्हणून मदालसा लोखंडाच्या तापलेल्या सळयांनी तिचे डोळे फोडते व हिंस्त्र पशूकडून तिला ठार मारते.

पती कर्तव्यापासून च्युत झाला असता तो आपला पतीच नाही, असे प्रतिपादन करणारी सरोजिनी ह्या नाटकात आहे. ती चंद्रशेखरला आश्रय देते. विक्रांत चंद्रशेखराला नेण्यासाठी तिच्याकडे येतोपण ती चंद्रशेखराला विक्रान्ताच्या ताब्यात न देता त्याचे रक्षण करण्याचे निश्चित ठरविते व आपला निश्चय ती विक्रांताला पुढीलप्रमाणे कळविते. ती विक्रांताला म्हणते की, आपले पाय साक्ष ठेवून मी जाहीर करते की, " दुर्जय हे आजपासून माझे कट्टे दुस्मान झाले आहेत आणि त्याचप्रमाणेच यापुढे माझे त्यांच्याशी वर्तन राहील." "महाराज, दुर्जयाशी असलेले पत्नीचे नाते मी आता झुगारून दिले आहे. दुर्जयांनी ज्या क्षणी आपल्या इमानाचा खून पाडला त्या क्षणीच मी विधवा झाले. तो त्यांच्या सत्त्वाचा खून नव्हे, तर प्रत्यक्ष त्यांचाच मृत्यु मी समजते. मला आता यापुढे कोणी पती नाही आणि मी यापुढे कोणाची पत्नी नाही. हा पहा मी आपला कुंकुमतिलक पुसून टाकला. हें मंगलसूत्र तोडून टाकले. आता तरी मजवर आपला भरवसा बसेल का?" " मान कटेल पण इमान बिघडणार नाही " असे उत्तर ती विक्रांताला देते. पती जिवंत असतांना कपाळाचे कुंकू पुसणारी, गळयातील मंगळसूत्र तोडणारी, दिलेले वचन पाळणारी, क्षत्रिय धर्माला जागणारी व राजपुत्र चंद्रशेखर यांचे संरक्षण करताना प्रत्यक्ष पतीला प्राणदंड देणारी सरोजिनी फार तेजस्वी दाखविली आहे.

राजपुत्राला पळवून आणून त्याला मृणालिनीच्या म्हणजे एका श्रीमंत सावकाराच्या मुलीच्या स्वाधीन करण्यात आल्यानंतर ह्या मृणालिनीने त्याचे काही काळ रक्षण करण्यात जे धैर्य, जो हिंमत, जो चिकाटी आणि कौशल्य दाखविले आहे त्यामुळे ती एक आदर्श स्त्री होऊन राहिली आहे. तिचे विक्रांतावर प्रेम असते, पण विक्रांत तिच्यावर प्रेम करण्यास तयार नाही असे पाहून ती विक्रांताला आपला पिता मानते व विक्रांताला मदत करते.

मदालसा ही राक्षसी महत्त्वाकांक्षा बाळगणारी उद्दाम, क्रूर, कपटी, अन्यायी, पाताळयंत्री, रक्तपाताला चटावलेली एक जहांबाज जिद्दखोर स्त्री आहे. दुर्जय

तिला शरण जातो. तिचे विक्रांतावर प्रेम असते पण तिच्या म्हणण्याप्रमाणे विक्रांत तिला शरण जात नाही. मदालसा त्याला निरनिराळी प्रलोभने देऊ करते पण तो तिचीच खरडपट्टी काढतो. विक्रांत म्हणतो, "पुरे—पुरे कर तुझे हे कवटाळ. हे मूर्ख स्त्रिये, या असल्या क्षुद्र मुगुटाच्या हीन लालसेने मी आपल्या शीलापासून भ्रष्ट होईन अशी का तुझी कल्पना आहे? असल्या मुगुटांनीच हे मस्तक मला भूषवावयाचे असते, तर या कलिंगासारख्या टीचभर देशाच्या कवडीमोल मुगुटाची गोष्ट तर राहूच दे—पण ज्याने आजवर या विश्वात सूर्यवंशातील महाभाग पुण्यश्लोक राजांची शिरे मंडित केली व जो आज कालाच्या वक्रगतीमुळे दुर्दैवाने तुझ्यासारख्या अधम चांडाळणीच्या मस्तकाच्या स्पर्शाने क्लेश पावत आहे, तो हा सूर्य रेखांकित—अमूल्य रत्नांनी जडलेला—दैदिप्यमान साम्राज्यमुगुट या भाग्यशाली मस्तकावर केव्हाच तळपू लागला असता. ज्याच्या अतुल पराक्रमावर लुब्ध होऊन या ब्रह्मावर्ताची साम्राज्यलक्ष्मी ज्याच्या पायाशी तीनवार लोटांगण घालीत आली, परंतु मदालसे, ज्याने आपल्या पूर्वजांच्या निष्कलंक शीलास स्मरून तिचा अव्हेर केला—त्याला—त्या या विक्रांताला—कलिंगाच्या या मातीमोल मुगुटास पाहून सन्मार्गापासून च्युत होण्याचा मोह पडेल, असे तुला वाटले तरी कसे?" मदालसा किती दुष्ट आहे याबद्दल विक्रांत म्हणतो, "दुष्ट कामवासनेला बळी पडून जिने आपल्या देवाप्रमाणे पूज्य असलेल्या पतीचा, आपल्या अंकावर मोठ्या विश्वासाने मस्तक ठेवून निजला असता गाढ झोपेत स्वतःच्या हातांनी खून पाडला, जिने साम्राज्यपदाच्या मृगजलामागे धावत सुटून आपल्या उदार भावास तुजकडून विषप्रयोग करविला, आणि जी आता आपल्या पोरक्या—अल्पवयी, कोमल भाच्याच्या रक्ताने आपले गोंडस दिसणारे चांडाळ हात माखून, पतिहत्येच्या पायावर उभारलेल्या भ्रातृहत्येच्या मंदिरावर बालहत्येचा कळस चढविण्यास सज्ज झाली आहे, अशा एका क्रूर अधमाधम राक्षसिणीपुढे मी बोलत आहे, हे मला पक्के ठाऊक आहे." दुर्जय व कोदंड या दोन पुरुषांचा लढाईच्या कामी उपयोग व्हावा. म्हणून दोघांवर प्रेम करण्याचा बहाणा मदालसा करते. मदालसा दुर्जयावर प्रेम करते हे पाहून कोदंड अतिशय संतापतो व तिला लग्नाचे वचन मागतो. त्याप्रमाणे मदालसा त्याला लग्नाचे वचन देते, परंतु त्यावेळी तिच्या मनात जे विचार येतात ते पुढे दिले आहेत. "पाजी कुत्रा! मारे लाथेच्या ठोकराखाली तुडवून टाकला पाहिजे. माझ्याशी—या मदालसेशीं—लग्न करू पाहतो, लाज वाटत नाही! कोणीकडे ही सूर्यकुलोत्पन्न मदालसा आणि कोठे तू भिकारड्या वंशात जन्माला आलेले पोरके पोर! मेल्याच्या आईबापांचा तरी ठावठिकाणा कोणाला आहे! माकडा, या मदालसेच्या पाणिग्रहणाची तुझी इच्छा सफल होईल का? अरे, जिने तुझ्याकडे नुसते ढुंकून पाहण्याची सुद्धा लायकी तुझ्यात नाही, तिने आपला देह, आपले मन—आपले सर्वस्व, तुला अर्पण करावे हे शक्य कसे होणार? सिंहिणीने कुत्र्याच्या गुणांवर लुब्ध व्हावे कसे? छे—माझ्या महत्वाकांक्षेच्या तृप्तीला जर तुझी जरूर नसती तर तुझ्यासारख्या मुर्दाडाला मी आपल्या जोड्यापाशी सुद्धा उभे केले नसते! पण काय करू? माझा उपाय चालत नाही! त्यामुळे तुला हे प्रेमाच्या मद्याचे घुटके मला वारंवार मनमुराद पाजावे लागतात. पण हे खूप समजून ऐस की, प्रेमाचे झाले तरी मद्य नव्हे—हालाहल आहे आणि सरतेशेवटी ते तुला खड्डयात पाडल्याशिवाय राहणार नाही. हे दुर्जयाचे पिशाच्च जे मी भारून ठेवीत आहे, ते माझे काम संपल्यावर तुझ्या उरावर बसविल्यावाचून मी सोडणार नाही. या हाताला प्रेमभावाने स्पर्श करण्याची जर खरीखरी पात्रता कोणामध्ये असेल, तर ती फक्त त्या एका विक्रान्तात आहे. माझ्या देहाबरोबर माझ्या मनावरही सत्ता चालविण्याचे सामर्थ्य जर या जगात कोणाच्या अंगात असेल, तर ते त्याच बहाद्दराच्या अंगात आहे. त्या प्रतापवान् थोर पुरुषापुढे तुम्ही सारी माकडे आहात. पण विक्रान्त!—विक्रान्त म्हणजे कोण! तर माझा शत्रु! माझ्या महत्वाकांक्षेच्या आड येणार माझा कट्टा दुस्मान! शिवाय त्याने माझ्या प्रेमाचा पूर्वी दोनवार धिःक्कार केलेला! तेव्हा त्याच्याकडे मी माझ्या मनाला काही धावू देईन? आपल्या अत्यंत प्रेमळ पतीचा सुद्धा खून पाडण्यास मी मागेपुढे पाहिले नाही? ती मी आता माझ्या सर्व मनोरथांच्या मूळावर घाव घालण्यास तयार झालेल्या या सैतानावर प्रेम कशी करू? छे—या मदालसेच्या

प्रेमाचा विषय होण्यास या लोकी तरी आता कोणी पुरुष दिसत नाही ! यापुढे प्रेम आणि मदालसा यांचा उभा दावा राहणार ! या अंतःकरणात पेटलेल्या महत्त्वाकांक्षेच्या कुंडात सर्व कोमल विकारांचे अंकुर जळून खाक झाले आहेत." असे जरी मदालसा ठरविते तरी विक्रान्ताबद्दल तिच्या मनात असलेले प्रेम कमी होत नाही. ती स्वतः विक्रान्ताच्या छावणीत जाते व विक्रान्तावर आपल्या सौंदर्याचा प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करते. विक्रान्त तिच्या प्रेमाचा स्वीकार करण्यास तयार होत नाही, तेव्हा मदालसा त्याला म्हणते. "तारुण्याने मुसमुसलेल्या लावण्यलतिकेचा असा अनादर करू नकोस. माझ्या उन्नत उरोजावर मस्तक ठेवून क्षणमात्र विश्रांती आपल्या गोंडस बाहूंचा माझ्या कंठाभोवती विळखा घालून क्षणमात्र प्रेमलोलुप दृष्टीने माझ्याकडे पहा—आणि प्रेमातुर झालेल्या या अमृतमय अधराचे पान करून मधुर अशा शृंगाररसाचा यथेच्छ आस्वाद घे." परंतु विक्रांत तिच्या प्रेमाचा स्वीकार करीत नाही. त्यामुळे ती खूपच चिडते व त्याचा खून करण्याचा प्रयत्न करते. त्यात ती यशस्वी होत नाही. नाटकात रक्ताच्या नद्या वाहून गेल्यानंतर सिंहासनाचा योग्य वारस गादीवर बसतो.

विक्रान्त हा या नाटकाचा नायक असून देवांगना ही त्याची पत्नी आहे. विक्रान्त हा पराक्रमी, राजनिष्ठ, स्वार्थत्यागी व एकपत्नीव्रत पाळणारा असा दाखविला आहे.

या नाटकातील विक्रान्त, सरोजिनी आणि मृणालिनी ह्या तीन व्यक्ती "व्यक्तिविषयक" संकुचित आयुष्याचा त्याग करून भव्य अशा समष्टि–जीवनाचा अंगिकार करतात.

मनुष्यस्वभावातील सत्प्रवृत्ती आणि असत्प्रवृत्ती यांमधील विरोध व त्या विरोधातून निर्माण झालेला संग्राम हा शेवटपर्यंत अखंड ठेवणे, त्यात कोठेही व केव्हाही तडजोड घडून येऊ न देणे हा वामनरावांच्या नाटकाचा स्थायीभाव आहे. त्या दृष्टीने त्यांनी विक्रांत, सरोजिनी, देवांगना, मृणालिनी वगैरे सत्प्रवृत्तीच्या आणि मदालसा, दुर्जय वगैरे असत्प्रवृत्तीच्या व्यक्तिरेखा रेखाटल्या आहेत आणि त्यांच्यांतील झालेला संग्राम म्हणजेच "राक्षसी महत्त्वाकांक्षा" हे नाटक होय. या दोन्ही पक्षांतील लोकांत एक प्रमुख गुण समान होता, तो म्हणजे जिद्दीपणा होय.

अकोला मुक्कामी या नाटकाचा प्रयोग पाहिल्यावर एका वऱ्हाडी खेडुताने 'जिद्दखोर नाटक' म्हणून या नाटकाचे वर्णन केले. तो म्हणतो, "काय इचिमन नाटक हो हे ! समदी जिद्दच जिद्द ! मानुस घ्या — बायकु घ्या–पोर घ्या–जो येते तो जिद्दी. कोणी मी दुसऱ्याचं ऐकायलाच तैयार नाही." वामनरावांच्या "राक्षसी महत्त्वाकांक्षा" या नाटकावर हा अगदी यथार्थ अभिप्राय आहे. दैवी आणि आसुरी या दोन परस्पर विरोधी झगडयांचे निकाल कोणातरी एका शक्तीचा संपूर्ण नाश झाल्यावाचून लागूच शकत नाही. मदालसेच्या रूपाने आसुरी शक्तीने उडविलेला भयंकर कहर आणि विक्रान्ताच्या रूपाने दैवी शक्तीने केलेला प्रतिकार यात शेवटी आसुरी शक्तीचा निःपात होतो आणि या नाटकाचा शेवट होतो.

नाटककाराचा विनय

"राक्षसी महत्त्वाकांक्षा" या नाटकाला लिहिलेल्या प्रस्तावनेत स्वतः नाटककाराने केलेला विनय दिलेला आहे. वामनराव म्हणतात, "माझा नाटककार या नात्याने समाजापुढे येण्याचा पहिलाच प्रसंग असल्यामुळे ग्रंथाच्या लोकप्रियतेसंबंधाने माझे मन नववधूप्रमाणे सलज्ज व साशंक होत आहे. तथापि आपण आपल्याच माणसांत वावरणार आहोत व तो आपणाला आपले सर्व दोष पोटात घालून प्रेमळपणाने वागवून घेतील अशी त्यातून विवाहित बालिकेप्रमाणे माझ्या संकोचित मनाला आतून जाणीव असल्यामुळे मी समाजापुढे येण्याचे धाडस केले आहे. परमेश्वर ही माझी धाडसाची उमेद सफल करो ! "

वामनरावांचे दुसरे नाटक म्हणजे "रणदुंदुभी" हे होय. या नाटकात कंदर्प नावाचा राजा सौदामिनी नावाच्या एका स्त्रीच्या मोहजालात सापडलेला आहे. तिच्या मदतीने शेजारचा मातंग राजा कंदर्पाचे राज्य गिळंकृत करण्याचा प्रयत्न करीत होता, असे दाखविले आहे. कंदर्पाचे लग्न तेजस्विनी नावाच्या स्त्रीशी ठरलेले असते. ती त्याला सावध करते आणि त्याने कपटजालात पडून फसू नये याकरिता ती अतिशय प्रयत्न करते. तरी देखील तो सावध न होता मोहाच्या आधीन होतो. त्यामुळे ती त्याला झिडकारते आणि त्याच्याशी ठरलेले लग्न मोडते. नंतर ती स्वदेशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी स्वतंत्रपणे लढाई

करण्याच्या तयारीला लागते. कंदर्प प्रथम सौदामिनीच्या मोहजालात फसतो पण नंतर सावध होतो आणि आपल्या देशाचे गेलेले स्वातंत्र्य पुन: मिळवावयाच्या कामाला-लागतो. त्यात तो यशस्वी होतो व नंतर शेवटी तो मरतो.

या नाटकात ही उच्च विचारांची खैरात आहे. स्वातंत्र्य, प्रेम, त्याग, धडाडी, धैर्य ह्या गुणांची प्रतीके ह्या नाटकातही सापडतात शृंगाररसाला या नाटकात मानाचे स्थान नसून तिरस्काराचे आहे. "राक्षसी-महत्त्वाकांक्षा नाटकात नवरा जिवंत असून सरोजिनी आपला पती कर्तव्यापासून च्युत झाला हे पाहून वैधव्य पत्करते, तर "रणदुंदुमी" या नाटकात कंदर्प आपल्या देशाचे गेलेले स्वातंत्र्य परत मिळविण्याच्या प्रयत्नात यश मिळवून इहलोकाला रामराम ठोकण्याच्या बेतात असतो. अशा क्षणी त्याच्या गळयात माळ घालून तेजस्विनी जन्माचे वैधव्य पत्करते. त्यावेळी ती म्हणते, "तेव्हा, महाराज, स्वातंत्र्यवीराचे देणे देऊन मला ऋणातून मुक्त झालेच पाहिजे. आपल्या-सारख्या अद्वितीय स्वातंत्र्यवीराच्या नावाने प्राप्त होणारे वैधव्य हे मंगल सौभाग्यच आहे."

'धर्मसिंहासन' हे वामनरावांचे तिसरे नाटक होय. ह्या नाटकात राजकारणाला धार्मिक बैठक दिलेली आहे आणि याशिवाय लोकशाहीचे तत्त्व मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. या नाटकात एक राजा असतो. त्याला दोन मुली असतात. मोठ्या मुलीचे नाव कामलता असून लहान मुलीचे नाव कल्पलता असते. ह्या राजाने आपल्या कारकिर्दीत राजा निवडण्याचा हक्क प्रजेला दिलेला होता. प्रजेने कामलतेऐवजी कल्पलतेला आपली राणी निवडली, त्यामुळे कामलता अतिशय चिडली व ती शेजारच्या बलाढ्य राजाच्या आश्रयास गेली. इतकेच नव्हे तर कल्पलतेचे प्रेम झिडकारून कामलतेचे प्रेम ज्या सुरेंद्राने स्वीकारले त्याच्या प्रेमाचाही कामलतेने धिक्कार केला. कामलता परकीय राजांच्या मदतीने विजय मिळवीत आहे हे पाहून त्या देशातील संन्याशांनी हाती शस्त्रे घेतली. आपल्या देशाचे स्वातंत्र्य रक्षण करणे आणि प्रजेला मिळालेला 'राजा निवडण्याचा हक्क' कायम ठेवणे, हा त्यांनी आपला धर्म ठरविला. राजाच्या सिंहासनाला धर्माची बैठक पाहिजे, ह्या तत्त्वासाठी त्यांनी आपला संन्यास तात्पुरता बाजूस ठेवला व देशासाठी क्षत्रियकर्म देखील केले. कामलते-लाही थोडयाच काळात केलेल्या कर्माचा पश्चात्ताप झाला आणि तिनेच शेवटी आपल्या देशाचे शत्रू असलेले परकीय लोक यांचा नाश केला.

नाटकांचे प्रयोग

वीर वामनराव जोशी यांनी जरी पाच नाटके लिहिली तरी पहिल्या तीन नाटकांचेच प्रयोग रंगभूमी-वर झाले. शेवटच्या दोन म्हणजे "न्यायाचा दरबार" आणि "सूडाचा संदेश" ह्या नाटकांचे प्रयोग कोणी केल्याचे ऐकिवात नाही. "राक्षसी महत्त्वाकांक्षा" या नाटकाचे प्रयोग ललितकलादर्श नाटक कंपनीने केले. "रणदुंदुमी" या नाटकाचे प्रयोग बलवंत नाटकमंडळीने आणि "धर्मसिंहासन" या नाटकाचे प्रयोग नाट्यकलाप्रसारक नाटक कंपनीने केले. "राक्षसी महत्त्वाकांक्षा" या नाटकाचे प्रयोग दुसऱ्या निरनिराळ्या नाटक कंपन्यांकडून झालेले आहेत.

नाटके लोकप्रिय होण्याची कारणे

"राक्षसी महत्त्वाकांक्षा" हे नाटक केशवराव भोसले यांनी रंगभूमीवर आणल्यामुळे त्यांना भरपूर गाण्याची भूमिका देणे भाग होते. मृणालिनीची भूमिका केशवराव स्वत: करीत असत आणि त्यावेळी ज्या चाली लोकप्रिय झालेल्या होत्या त्या सर्व एके ठिकाणी करून त्या चालीवर केलेली पदे केशवरावांच्या तोंडून गायिलेली लोकांना ऐकावयास मिळत असत. नाटक यशस्वी होण्यासाठी जसे नाटकातील नाट्यगुण उपयुक्त ठर-लेले आहेत तसेच योजकाचे कौशल्य आणि केशव-रावांचे गायनातील कौशल्यही नाटकाच्या लोक-प्रियतेला कारणीभूत झाली आहेत.

मराठी रंगभूमी संगीत नाटकांनीच खरी गाजलेली आणि गजबजलेली होती. गद्य नाटकांपेक्षा संगीत नाटकच प्रेक्षकांच्या विशेष कौतुकाचा विषय होता. "राक्षसी महत्त्वाकांक्षा" या संगीत नाटकाच्या प्रयोगाने लोकप्रियतेचा उच्चांक गाठला होता. या नाटकाची यशस्विता त्यातील संगीतामुळे निश्चित होऊन वाढविली होती. गोड चालीची गाणी, हे केवळ नाटकाच्या प्रयोगाच्या यशस्वितेचे एक कारण झाले.

वामनरावांच्या नाटकांच्या लोकप्रियतेचे खरे मर्म त्यांच्या गोड चालींच्या गाण्यात नसून त्यांच्या पात्रप्रसंगांच्या चित्रणातील जाज्वल्यतेत आहे, असे डॉ. अ. ना. देशपांडे म्हणतात.

" राक्षसी महत्त्वाकांक्षा " हे नाटक लोकप्रिय होण्याचे श्रेय त्यांनी केशवराव भोसले यांना व त्यांच्या नाटकमंडळीला दिले आहे. वामनराव त्यासंबंधी म्हणतात, " 'राक्षसी महत्त्वाकांक्षे'चा सर्वत्र आज जो थोडाबहुत बोलबाला होत आहे, त्याचे बहुतेक श्रेय श्रीयुत केशव विठ्ठल भोसले—मालक—ललितकलादर्श नाटकमंडळी—यांचेकडे व त्यांच्या मंडळीकडे आहे. त्यांनी व त्यांच्या नटवर्गाने अत्यंत श्रम करून 'राक्षसी महत्त्वाकांक्षे'चे अवजड धूड मोठ्या नेटाने व धैर्याने लोकांच्या दृष्टीसमोर आणून ठेवले नसते, तर नाट्यकुशल कारागिरांनी आपल्या दैवी सामर्थ्याने शृंगारलेल्या महाराष्ट्र–रंगभूमीच्या प्रेमललित दिव्य आनंदभुवनांचे द्वारही या आसुरी मायेच्या दृष्टीस पडले नसते. तेव्हा या धाडसी मंडळीचे विशेष आभार मानणे मला अवश्य वाटते." असा कबुलीजवाब वामनरावांनी 'राक्षसी महत्त्वाकांक्षा' या नाटकाच्या प्रस्तावनेत दिलेला आहे.

नाट्यगुण

"वीर वामनरावांच्या नाटकात नाट्यगुण उच्च दर्जाचे आढळतात" असा प्रा. श्री. ना. बनहट्टी यांचा अभिप्राय आहे. "राक्षसी महत्त्वाकांक्षा ह्या नाटकातील अनेक संवाद भडक असून खटकेबाज आहेत. उपरोध हा वामनरावांच्या नाटकात दिसून येणारा गुण 'राक्षसी महत्त्वाकांक्षा' या नाटकात देखील दृष्टोत्पत्तीस येतो. वामनरावांच्या नाटकातील दोन महत्त्वाची वैशिष्ट्ये आजच्या काळातील वाचकांच्या डोळ्यात भरतील. ती म्हणजे वामनरावांनी निर्माण केलेला प्रभावी वीररस आणि स्त्री–चारित्र्याचा केलेला तेजस्वी आविष्कार ही होत. या नाटकात वीररसाची परमावधी होताच प्रेक्षकांची हृदये भारून जात. जे प्रेक्षक वामनरावांच्या डोळ्यांसमोर होते, त्यांच्यासंबंधी वामनरावांची एक अपेक्षा होती. नाटक पाहून क्रांती करण्याचे विचार लोकांच्या मनात येत नाहीत, ही गोष्ट वामनरावांना माहीत होती, परंतु पुढेमागे देशात क्रांती जन्मास येणार असेल तर त्या मंगलप्रसंगासाठी जे वातावरण तयार होईल; त्यात नाटकाच्या द्वाराने जे जे क्रांतिकारक विचार समाजात पसरविल्या जातील त्यांचा प्रभाव अत्यंत अल्प प्रमाणात का होईना पडल्याशिवाय राहणार नाही, असा वामनरावांचा अढळ विश्वास होता. यांच्या नाटकांतून जसा वीररस प्रत्येक शब्दाशब्दातून ओथंबून राहिला आहे त्याचप्रमाणे करुणरस, रौद्ररस निर्माण करण्यातही त्यांचा हातखंडा आहे. नाट्यपूर्ण घटना त्यांनी नाटकात निर्माण केलेल्या आहेत. नाटकातील संग्राम अत्यंत प्रभावी व भीषण स्वरूपात रंगविलेले आहेत. प्रेक्षकांची मने शहारून सोडणारे चढत्या उत्कंठेचे निकराचे प्रसंग, त्यांना कारणीभूत होणाऱ्या भडक मनोवृत्तीच्या व्यक्ती आणि त्यांच्या उक्तीतून व कृतींतून घडविलेले उदात्त भावनांचे स्फूर्तिदायक दर्शन या तीन विशेषांत वामनरावांच्या नाटकांचे आकर्षणसामर्थ्य साठविलेले आहे", असे डॉ. अ. ना. देशपांडे म्हणतात.

नाटकांतील दोष

खाडिलकरांसारखी अनेक नाटके वामनरावांनी लिहिलेली नाहीत. वीर वामनराव हे बहुप्रसव नाटककार नाहीत. "राक्षसी महत्त्वाकांक्षा" हे नाटक लिहून झाल्यावर तब्बल एक तपानंतर त्यांनी "रणदुंदुभि" हे नाटक लिहिले. "खाडिलकरांच्या नाटकात सुद्धा तात्त्विक भूमिकेची बैठक असते पण त्यांच्या नाटकात ह्या बैठकीवर जी कलाकृती उभी केलेली असते ती नवविधा असते. वीर वामनरावांच्या कलाकृती एकविधा असतात;" असे पु. रा. लेले यांनी लिहिले आहे. विस्कळीत रचना आणि अवाढव्यपणा हा वामनरावांच्या नाटकातील महत्त्वाचा दोष आहे. विसंगती हाही एक दोष त्यांच्या नाटकात आढळतो. त्यामुळे त्या भरभराटीच्या काळात जरी वामनरावांची नाटके रंगभूमीवर गाजली असली, तरी आजचा नटवर्ग आणि रसिक यांची त्या नाटकांच्या नुसत्या वाचनानेच छाती दडपून जाईल. मग रंगभूमीवर प्रयोग होणे दूरच! त्यांच्या नाटकात विनोदाला मुळीच स्थान नाही.

आपल्या नाटकांच्या द्वारे स्वातंत्र्याचा संदेश देण्याचे ध्येय त्यांनी आपल्या समोर ठेवले असल्यामुळे ते क्वचित्प्रसंगी कलेची गळचेपी करण्यास मागे पुढे पाहत नाहीत. त्यांच्या नाटकात जरी काही दोष आढळले तरी एका काळी त्यांनी महाराष्ट्राची रंगभूमी जिंकली होती, यात शंका नाही

नाटककाराच्या सहवासात

वीर वामनराव जोशी यांचे भाचे श्री. ना रा. अभ्यंकर यांनी वामनरावांच्या काही आठवणी सांगितल्या आहेत. त्यांपैकी एक आठवण पुढे जशीच्या तशी दिलेली आहे. श्री. अभ्यंकर म्हणतात "त्यानंतर लौकरच मेडिकल कॉलेजच्या शिक्षणाला मी रामराम ठोकला. संबंध दिवस पत्ते, संध्याकाळी चौपाटीवर हुतुतू व रात्री ब्राह्मणसभेत वुद्धिबळे असा माझा कार्यक्रम मी आखून टाकला होता. माझा हा धडाडीचा कार्यक्रम वामनरावांच्या कानांवर गेल्यावर त्यांना अतिशय वाईट वाटले. अमरावतीस मी एक महिना राहिलो असताना माझ्यासंबंधाने वामनरावांनी स्वतःशी जी अटकळ बांधली होती तीस जबरदस्त धक्का बसला. ते ताबडतोब मुंबईस आले. आल्याबरोबर जो तो त्यांना 'नान्या' फुकट गेल्याचे सांगू लागला. त्याबरोबर 'फुकट गेलेल्या तुमच्या नान्याला घेऊन जाण्यासाठीच मी मुंबईला आलो आहे'—असे म्हणून त्याच दिवशी संध्याकाळी ते मला पुण्याला घेऊन गेले.

"वामनराव त्यावेळी बलवंत संगीत मंडळीकरिता 'रणदुंदुभि' हे नाटक लिहीत होते वामनरावांनी माझी नेमणूक एकदम त्यांच्या प्रायव्हेट सेक्रेटरीच्या जागेवर केली. त्यांच्या पैशाअडक्यांची व्यवस्था पाहण्याचे कामही त्यांनी माझ्यावरच सोपविले होते. पण या कामी मला कधीच तसदी घ्यावी लागली नाही, कारण वामनरावांच्या हातात पैसा येणार तेव्हा ते माझ्या स्वाधीन करणार व मग मी त्याची व्यवस्था पाहणार !

"लेखनाचे काम मात्र जोरात चालू होते. वामनरावांची जीभ व माझा हात तासन् तास चालू असे. कोणताही प्रवेश लिहून झाला की तो वाचून दाखविण्याचे कामही माझ्याकडेच असे. त्या नाटकातील काही काही प्रवेश निरनिराळ्या पद्धतीने पंधरापंधरांदा लिहिलेले आहेत, हे कोणास सांगितले तर खरे सुद्धा वाटणार नाही. याचे कारण एकच आणि ते म्हणजे नाटकाचे लेखन करताना वामनरावांचा विचारच मुळी कागदावर सुरू होतो."

वीर वामनराव जोशी हे जर नट झाले असते तर त्यांनी चांगले यश मिळविले असते. नटाला लागणाऱ्या गुणांचे मुबलक माप त्यांच्याजवळ होते. याबद्दल श्री. अभ्यंकर यांनी सांगितलेली दुसरी आठवण येथे दिली आहे. श्री. अभ्यंकर म्हणतात, "नटवर्य नानासाहेब चापेकर यांनी ललितकलादर्श मंडळी सोडून किर्लोस्कर मंडळीचे पुनरुज्जीवन केले. मंडळीची सुरुवात अप्पा टिपणीसांच्या "राजरंजन"ने झाली. पण एकाच नाटककारावर नाटक मंडळीचा संसार चालावा कसा ? चापेकर वामनरावांकडे 'राक्षसी महत्वाकांक्षा' नाटकाच्या प्रयोगाचे हक्क मागू लागले. नाही—होय करता करता वामनरावांनी त्यांस त्या नाटकाच्या प्रयोगाचे हक्क दिले व नाटक बसवून घेण्यासाठी मला घेऊन सोलापुरास गेले. प्रारंभीचे नमन वगैरे झाल्यावर मदालसेच्या प्रवेशास सुरुवात झाली. गादीवर बसल्या बसल्या वामनरावांच्या हातांचा तबला डग्ग्याशी चाळा सुरू होता. विक्रान्ताच्या तोंडी असलेले, 'तुझ्यासारख्या बदमाश, बदफैली, खुनी अवदसेचा दास म्हणून......' हे शब्द काहीशा ढिलेपणाने बाहेर पडलेले ऐकल्याबरोबर वामनरावांच्या अंगात अग्निनारायण संचारला. ते एकदम ओरडले, 'कसं म्हणतो आहेस ?तुझ्यासारख्या बदमाश, बदफैली, खुनी अवदसेचा दास' असे म्हणून आपल्या डाव्या तळहाताचा प्रहार त्यांनी डग्ग्यावर केला आणि डग्गा फुटून हात सरळ आत गेला ! विक्रान्ताचे काम करताना किती आवेश पाहिजे हे त्या नटाला आता चांगलेच समजले ! ! " नटाला आवश्यक असणारे सर्व गुण वामनरावांच्या ठिकाणी असल्यामुळे त्यांची सर्व नाटके लोकांना आवडली आणि रंगभूमीवर प्रभावी ठरली

खांडेकरांचा अभिप्राय

"वीर वामनराव जोशी यांची 'राक्षसी महत्वाकांक्षा', 'रणदुंदुभि', व 'धर्मसिंहासन' ही तिन्ही

नाटके कल्पनारम्यच ! मात्र या सर्वांवर कर्त्यांच्या जळजळीत देशाभिमानाची दाट छाया पडलेली असल्यामुळे ती निराळ्या पद्धतीची वाटतात. या तिन्ही नाटकांचे तुलनात्मक दृष्टीने निरीक्षण केल्यास वीर वामनरावांनी एक ठराविक साचा केला आहे असे दिसून येईल. देशभक्त व देशद्रोही स्त्रीपुरुषांच्या जोड्या आणि त्यांच्यामधील झगडा रंगविण्याचा त्यांचा मार्ग चोपट आहे. 'राक्षसी महत्त्वाकांक्षा' नाटक जवळजवळ दोन तपे रंगभूमीवर टिकून राहिले आहे पण त्याचे मुख्य कारण त्यातील राक्षसी कृत्ये व गोड चालीवरील गाणी हेच होय चालू पिढीच्या प्रेक्षकांना तर हे नाटक म्हणजे कलाशून्य नाट्यकृतीचा उत्कृष्ट नमुनाच आहे, असे वाटल्यास त्यात नवल नाही. अंग थरारून सोडणारे प्रसंग, देशाभिमानाच्या भावनेला चेतविणारी भाषा आणि रंगभूमीचे मार्मिक ज्ञान, यामुळे वीर वामनरावांची पहिली दोन नाटके रंगभूमीवर यशस्वी झाली, पण मराठी नाट्यवाङ्मयात त्यांचे स्थान विशेष महत्वाचे नाही." असा अभिप्राय, वीर वामनराव जोशी यांच्या नाटकांबद्दल, श्री. वि. स. खांडेकर यांनी दिलेला आहे.

असे सांगतात की, 'राक्षसी महत्त्वाकांक्षा' हे नाटक पाहिल्यावर कै. गडकऱ्यांची फार विलक्षण मन:स्थिती झाली आणि एवढे राक्षसी अत्याचार आपल्या नाटकात घडविणारा नाटककार फारच भयंकर मनुष्य असला पाहिजे अशा कल्पनेने गडकरी वामनरावांना भेटण्यास धजावेनात ? प्रत्यक्ष वामनरावांची भेट झाल्यावर त्यांच्या विशाल व्यक्तिमत्वाची त्यांना ओळख पटली. ते वामनरावांना विनोदाने 'महत्त्वाकांक्षी राक्षस' असे म्हणत असत.

नाटककाराविषयी आणखी एक आठवण

ही वामनरावांबद्दलची आठवण श्री. ह. वि. दातार यांनी सांगितली आहे ते म्हणतात, "कै. दादांचे 'राक्षसी महत्त्वाकांक्षा हे नाटक प्रत्यक्ष पाहण्याची माझी फार इच्छा होती. सन १९४४ च्या सुमारास मुंबईस असताना संयुक्त नट संघाचे हे नाटक पाहण्याचा मला योग आला. या प्रयोगात नटवर्य नानासाहेब फाटक, मा. दामले आदींनी कामे केलेली असल्यामुळे मी प्रयोग पाहाण्यास मोठ्या उत्सुकतेने गेलो; पण राक्षसी महत्त्वाकांक्षेचे मूत नजरेला पडल्यावर मन विषण्ण झाले. अंकाचा पहिला प्रवेश कसा तरी पार पडला आणि मग रंगारी नाटक सुरू झाले ! कशाम काही ताळमेळ नव्हता. नटवर्यांचा तोल गेला होता आणि बवन पेंढारकरांचा आवाज बसला होता. १० ला सुरू झालेला प्रयोग १॥ वाजता खतम झाला. शेवटचे सारे अंक चटावरच्या श्राद्धाप्रमाणे झाले आणि शेवटच्या अंकात तर नाटकातील सर्व पार्टी मंडळी तोंडाचा रंग पुसून घरी जावयाच्या बेतात रंगभूमीवर आली ! जुन्या नाटकांची अशी विटंबना पाहून मन विषण्ण होते. त्यापेक्षा जुन्या पिढीजवळ बसून मराठी रंगभूमीचा वैभवशाली इतिहास ऐकताना आजच्या तरुणांना आनंद वाटल्यावाचून खास राहणार नाही. या प्रयोगाचे साद्यंत वर्णन कै. दादांजवळ मी केले असता ते खिन्नपणाने हसून म्हणाले, 'तो काळ आता गेला आहे आणि आज मराठी रंगभूमी म्हणून काही वस्तूच अस्तित्वात नाही. एक अंक प्रवेशाचा दरिद्री जमाना आज सुरू झाल्यामुळे, जुनी नाटके आजच्या नटांना पेलत नाहीत आणि नवीन दरिद्री नाटके जनमनाची पकड घेऊ शकत नसल्यामुळे पोटाकरिता जुनीच नाटके करावी लागतात !' तेव्हा जुन्या वैभवशाली रंगभूमीचा अवशेष म्हणजे आज दिसत असलेली फक्त नाटकांची पुस्तके ! मराठी रंगभूमीच्या अभ्यासकांनी हा अमोल ठेवा सतत जतन करून ठेवला पाहिजे."

नाटककाराचा अभिप्राय

कै. वीर वामनराव जोशी यांनी त्यांच्या स्वतःच्या नाटकांबद्दल एके ठिकाणी पुढीलप्रमाणे लिहून ठेवले आहे. ते म्हणतात, "मी माझ्या नाट्यलेखनाचे स्वतःच टीकाकार बनून अनेकवार पृथःकरण केलेले आहे. नाटकाचे विषय शोधून काढताना विविधत्व ठेवावयास हवे होते. माझ्या पूर्वीच्या मराठी नाटककारांनी हा विचार डोळ्यांपुढे ठेवून नाटके लिहिली व त्यामुळे त्यांच्या लिखाणात साहजिकपणे नाना रंग दृष्टीस पडतात व वाचकांचे व प्रेक्षकांचे मन त्यांच्या लिखाणाकडे आकर्षित होते. माझे विषय जवळजवळ एकदेशीयच असल्यामुळे मला काही या बाबतीत वाचकांचे वा प्रेक्षकांचे धन्यवाद मिळविता आले नाहीत.

परंतु हा माझ्या जन्मस्वभावाचाच दोष असल्यामुळे त्याबद्दल मी स्वतःच जबाबदार आहे. दुसरे तो विषय ज्या विपरीत परिस्थतीत मला लोकांच्या समोर मांडावयाचा होता, ती परिस्थिती इतकी बिकट आणि चमत्कारिक होती की, तो विषय शक्य तितक्या परिणामकारक रीतीने लोकांपुढे मांडता यावा म्हणून कथानक व त्यातील अनेक प्रसंग यांची जुळवाजुळव करिताना मला इतक्या लटपटी व लपंडाव करावे लागले की, त्यामुळे कथानकाच्या व प्रसंगाच्या सौंदर्यात अनेक ठिकाणी मला वेडेवाकडेच काही तरी करावे लागले आहे."

(यो) जनतंत्र

—अहेत

स्वराज्य येऊन एकोणवीस वर्षांवर काळ लोटला होता.—म्हणजे, घटना अगदी ताजी होती.

गणांचं–जनांच 'रामराज्य' निर्माण व्हायचं स्वप्न विरल्यासारखं होऊन योजनांची आतषबाजी उठविली जात होती. याच काळातील एक कथा :

'नवरक्त' शासनात आणून जुन्या खोडांना सक्तीच्या निवृत्तीच्या तीर्थस्नानाला पाठविण्याच्या योजनेच्या पूर्तीसाठी शोधदीप घेऊन एक चाचणीमंडळ गावोगावी फिरत होतं. मंडळाचा मुक्काम अकलपूरला असताना मंडळ–प्रमुखाकडे एका तरुणाला घेऊन एक खादीधारी पोक्त गृहस्थ पोचले.

"गरकडी सायब," स्वराज्याचं सुराज्य करण्याची जबाबदारी गेलो एकोणवीस वर्षं–एकट्यानंच पार पाडीत असलेल्या आत्मविश्वासानं ते गृहस्थ मंडळ–प्रमुखावर कडाडले—"कायवी कारन नसतानी आपन ह्या पोऱ्याले एकदम फेल करुनसन्या टाकला. खरं म्हंजे ह्याच्यावानी जवान तुम्हाले घा कोसातवी गावनार न्हाई बघा ! तुमी म्हणाल, मले कसं म्हाईत बा ! सायब, याचा बाप गुदरला तवापासनं याहीचा आन् माहा चांगला घरोबा आहे. माय–लेकरू दोघंच हायती घरात आन् माहा दोघावर तं डोळा असते नव्हं का !

"म्हनून म्हन्तो, बोला आता ! ह्या पोराचं मस कसं नाही समदं मालूम राहनार ?—त्याच्या जल्मापासनं त्याले वळिखतो म्हनानां-कसं ?

"देशामंघी आम्हाले नवं रगत आनाचं आहे... ते साधायले तुम्ही तऽ सायब, गावगाव फिरुन राह्यले, पन हे पोरगं गावूनबी तुम्ही त्याले नापासच केलन्. म्हंजी त्याचं काय आहे......"

"दादासाहेब, अहो, हुशार–चुणचुणीत तरुण शोधायला तर आम्ही पगार खातो...पण"—त्या तरुणाकडे नजर टाकून चाचणी मंडळ–प्रमुख म्हणाले, "याला एकाही प्रश्नाचं उत्तर कालच्या चाचणीत देता आलं नाही. आमचा नाइलाज आहे....."

"असं तऽ व्हावं न्हाई बा !...आता आपन एक करा...माझ्या सामने याले दोन चार सवाल इचारा...चांगला सिक्लासवरला आहे नव्हं...!

"ठीक आहे; विचारतो–तुम्ही म्हणताच आहात तर...पण त्याचा काही उपयोग नाही हे आताच तुम्हाला सांगून ठेवतो वरं...!" दादासाहेबांनी विश्वासदर्शक नुसतं स्मित केलं.

"तुमच्या गावाशेजारच्या जंगलाला गेल्या आठवड्यात जी आग लागली–कशी लागली?" गडकऱ्यांनी गंभीरपणानं त्या तरुणाला विचारलं

"म्··मला ठाऊक नाही···म्··म्··मी नाही ···मी त्यावेळी गावातच नव्हतो· ····" तो तरुण उत्तरला.

गडकऱ्यांनी दादासाहेबाकडे गंभीरपणानं पाहिलं.

"तो तऽ थ्या फंदामंधी पडनारा पोऱ्या न्हाई, सायब...आगबिग न्हाई लावनारा तो. .तो न्हाई म्हनते तऽ मी सांगतो म्हनून इस्वास ठेवा त्याच्यावर. ...."

आता गडकऱ्यांनी स्मित केलं. पण त्या स्मितात दादासाहेबांना अविश्वासाची छटा दिसली.

"न्हाई तुमचा इस्वास बसत पोराच्या आन् माह्या म्हनन्यावर..." दादासाहेब लाघवीपणानं म्हणाले आणि नेहरूशर्टच्या खिशातून त्यांनी नोटांची पिशवी काढली.

"किती नुस्कान झालं असन् म्हन्ता त्या आगीनं –अँ ? आकडा तऽ सांगा राव आन् मिटून टाका की ते पर्करन."

लेनिनचे साहित्यविषयक विचार
एक परामर्ष

—वि. स. जोग

मार्क्सवादी साहित्यदृष्टींचा सखोल अभ्यास करीत असताना वा साम्यवादी विचारसरणीच्या विविध नेत्यांच्या साहित्यविषयक विचारांचा अभ्यास करून घेत असताना कोणत्याही अभ्यासकाला लेनिनच्या साहित्यविषयक विचारांचा परिचय करून घेणे आणि त्यांचा अभ्यासपूर्ण परामर्ष घेणे अतिशय आवश्यक आहे. 'Marxism without Leninism is impossible' (लेनिन ऑन आर्ट ॲंड लिटरेचर, पृष्ठ ७) हे लुनाचारस्की सारख्या विवेकी मार्क्सवाद्याचे उद्गार कला आणि साहित्याच्या संदर्भातही अतिशय महत्त्वाचे आहेत. कारण साम्यवादी समाजरचनेचा आणि संस्कृतीचा आद्य निर्माता व्ही. आय. लेनिन हाच आहे.

साम्यवादी जगाच्या इतिहासात लेनिनचे स्थान वैशिष्टचपूर्ण आहे. मार्क्सप्रमाणे तो केवळ प्रकांड पंडित आणि प्रतिभाशाली विचारवंत नव्हता. त्याचप्रमाणे स्टॅलिनप्रमाणे तो केवळ धूर्त कूटनीतिज्ञ आणि पोलादी शिस्तीचा शासनकर्ता नव्हता. प्रतिभाशाली विचारांची देणगी व ते विचार मूर्त स्वरूपात आणण्यासाठी आवश्यक असलेले धाडस, योजकता आणि व्यवहारचातुर्य यांचा सुरेख संगम लेनिनच्या व्यक्तित्वात झाला होता. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी क्रांतिकारक संप्रदायाबद्दल बोलताना 'आम्ही टिळकांच्या पुढे एक पाऊल होतो' अशा आशयाचे विधान केले आहे. त्याच भाषेत बोलावयाचे झाल्यास लेनिन हा मार्क्सच्या एक पाऊल पुढेच होता. मार्क्सच्या अनेक कल्पना आपल्या राजवटीत त्याने प्रत्यक्षात आणल्या. कारण 'Marxism is not a dogma but guide to action' अशी त्याची धारणा होती. पण लेनिनचे महत्त्व तटस्थ टीकाकारांच्या दृष्टीने यापेक्षा वेगळ्या असलेल्या त्याच्या गुणात आहे. मार्क्सवादाचा तो केवळ पढिक पंडित वा पोथीनिष्ठ अंधानुकरणी नव्हता. मार्क्सच्या अनेक प्रमेयांचा त्याने स्वतंत्र बुद्धीने अर्थ लाविला एवढेच नव्हे तर मार्क्सवादालाच पोषक असे स्वतःचे सर्वस्वी स्वतंत्र असे विचार त्याने मांडले. मार्क्सने ज्या विषयांचा सखोल अभ्यास केला नव्हता किंवा ज्या विषयांचा वा प्रश्नांचा सर्वंकष अभ्यास करण्याची अपरिहार्यता तत्कालीन परिस्थितीमुळे मार्क्सला जाणवली नाही त्या सगळ्या विषयांचा वा प्रश्नांचा विचार लेनिनने केला, आपली मते मांडली, नुसती मांडली नाहीत तर मार्क्सवादाच्या अंधभक्तांच्या कोल्हेकुईकडे लक्ष न देता व्यावहारिकतेचा अवलंब करून, सर्वसामान्य जनतेच्या हिताच्या दृष्टीने कार्यवाहीत आणली.

अर्थातच त्याच्या इतर क्षेत्रांमधील विचारांशी आपल्याला कर्तव्य नाही. प्रस्तुत लेखात विचार करावयाचा आहे तो लेनिनच्या कलाविषयक आणि मुख्यत्वेकरून साहित्यविषयक विचारांचा. साहित्याच्या संदर्भात निर्माण होणाऱ्या विविध प्रश्नांबद्दल लेनिनने प्रतिपादिलेल्या निर्भिड मतांचा. '......without

whose influence the Russian revolution could not take on the form it has now assumed ' हे रशियन क्रांतीच्या वळणाच्या संदर्भात मॅक्झिम गोर्कीने लेनिनचे जे महत्त्व वर्णिले आहे तेच लेनिनचे महत्त्व साम्यवादी क्रांतीनंतर रशियन साहित्याला आणि तदनंतर काही प्रमाणात, साम्यवादाचा परिणाम झालेल्या जागतिक वाङ्मयाला लागलेल्या बऱ्या वाईट वळणाच्या संदर्भात आहे म्हणून लेनिनच्या साहित्यविषयक विचारांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. लेनिनच्या अशा विचारांचा प्रामुख्याने अभ्यास ए. लुनाचारस्कीने केला आहे. गोर्कीनेही लेनिनच्या साहित्यविषयक विचारांच्या अनुषंगाने आपली मते वेळोवेळी मांडली आहेत. साम्यवादी राजवट असलेल्या देशात या विचारांचा अभ्यास होणे स्वाभाविक आहेच आणि त्या अभ्यासाला एक विशिष्ट दृष्टिकोन असणेही अपरिहार्य आहे. पण साम्यवादी राज्यपद्धती नसलेल्या भारतासारख्या देशात मात्र या विचारांचा तटस्थ वस्तुनिष्ठ दृष्टीनें अभ्यास विपुल झाला आहे असे नाही. मराठीपुरते बोलावयाचे झाल्यास या विषयावर (डॉ.) अ. ना. देशपांडे यांनी सुमारे वीस वर्षांपूर्वी मांडलेले काही विचार उल्लेखनीय आहेत. (सत्यकथा, आगस्ट १९४७) परंतु साम्यवादी जगतात स्पष्टपणे पडलेल्या वैचारिक आणि व्यावहारिक फुटीच्या या अतिशय महत्त्वाच्या काळात आणि आज माजलेल्या मार्क्सवादी मतामतांच्या गलबल्यात लेनिनच्या मूळ साहित्यविषयक विचारांचा नव्याने परामर्श घेणे अतिशय आवश्यक आहे.

लेनिनला त्याच्या प्रचंड क्रांतिकार्यापुढे कला आणि साहित्य यांचा रसास्वाद घ्यावयास व त्यावरील आपले विचार प्रकट करावयास खूप वेळ मिळाला असे नाही. पण जेवढा वेळ मिळाला त्यातील क्षण न् क्षण त्यानं कामी लाविला पुष्किन, टॉलस्टॉय, नेक्रासॉव्ह, चेकाव्ह, शेक्सपियर, गटे, बायरन, शीलर, गोर्की, बेलिन्स्की, उस्पेन्स्की आदी अनेक साहित्यिकांच्या साहित्यकृतींचे परिशीलन करून त्यावर समीक्षणात्मक लेख लिहून (उदा. 1 L. Tolstoi, Mirror of the Russian Revolution in 1908, 2 L. N. Tolstoi and the Modern Labour Movement) त्याने आपले साहित्यविषयक विचार मांडले. याशिवाय कम्युनिस्ट लीगच्या निरनिराळ्या भाषणांतून, लुनाचारस्की, क्लारा झेटकीन (zetkin) आदी लेखक-लेखिकांशी झालेल्या निरनिराळ्या संभाषणांतून आणि गोर्कीशी झालेल्या पत्रव्यवहारातून लेनिनची साहित्यविषयक मते प्रकट झाली आहेत या ठिकाणी ध्यानात ठेवण्यालायक गोष्ट म्हणजे वर उल्लेखिलेल्या, लेनिनच्या आवडत्या लेखकांच्या यादीपैकी गोर्की सारख्यांचा अपवाद सोडला तर बाकीचे बहुतेक लेखक वा कवी कट्टर कम्युनिस्ट नव्हते आणि तरी देखील ते लेनीनचे आवडते साहित्यिक होते. प्रवासात देखील या लेखकांच्या साहित्यकृती त्याच्या-बरोबर असत. या उलट मायकोव्हस्कीसारख्या, कम्युनिस्ट क्रांतीनंतर निर्माण झालेल्या कट्टर कम्युनिस्ट 'सरकारी लेखका 'बद्दल "I did try several times to read Maikovsky and could not get beyond three lines, kept falling asleep." असे उद्गार काढण्याची पाळी त्याच्यावर आली होती. या गोष्टीचा या ठिकाणी आवर्जून उल्लेख करण्याचे कारण एवढेच की लेनिनच्या साहित्यविषयक विचारांचे मूल्यमापन जास्तीत जास्त वस्तुनिष्ठ दृष्टीने करण्याकरिता लेनिनची मनोभूमिका लक्षात यावी. आणि "कम्युनिस्ट शासनसंस्थेचा सर्वाधिकारी"—याच एका दृष्टिकोनातून विचार करून त्या दृष्टिकोनाबरोबर त्याच्यावर अपरिहार्यपणे जे दोष चिकटविण्यात येतात ते टाळता यावेत.

याचबरोबर प्रारंभीच, 'कम्युनिस्ट सर्वाधिकारी' या वैशिष्ट्याच्या अंगभूत असणाऱ्या दुसऱ्याही एका दोषाचा आढळ लेनिनच्या ठिकाणी फारसा नव्हता हेही या ठिकाणी स्पष्ट करणे आवश्यक आहे. तो दोष म्हणजे तथाकथित 'सांस्कृतिक क्रांती "च्या नावाखाली जुन्या सरसकट गोष्टींचा विध्वंस करण्याची उतावळी प्रवृत्ती. या उतावळ्या प्रवृत्तीचा लेनिनने वारंवार निषेध केला आहे. "मार्क्सवादाने भांडवलदार युगातील अत्यंत मोलाच्या सिद्धी धिक्कारलेल्या तर नाहीतच पण उलट त्याने मानवजातीच्या दोन

हजार वर्षांच्या वैचारिक आणि सांस्कृतिक विकासामध्ये जे जे म्हणून मोलाचे आहे ते सर्व आत्मसात करून त्याला नवे रूप दिले आहे." हे लेनिनचे उद्गार या गोष्टीचे उदाहरण म्हणून देता येतील. भांडवलशाही किंवा त्या अगोदरच्या युगातीलही चांगल्या चांगल्या गोष्टींचे आवश्यकता भासल्यास साहाय्य घेऊन नवीन 'Proletariat Culture' (कामगारवर्गीय संस्कृती) निर्माण करणे हे त्याचे ध्येय होते. (ट्राटस्कीसारखी 'प्रोलेटरीन कल्चर' चा काळ अद्याप आलाच नाही, अशी मात्र त्याची धारणा नव्हती.) "Proletarian Culture is not something that springs from nowhere, is not invention of people who call themselves specialists in proletarian culture. This is completely nonsense. Proletarian culture must be a logical development of those funds of knowledge which humanity has worked under the yokes of capitalist society. (रशियन कम्युनिस्ट युथ लीग मध्ये २ आक्टोबर १९२० रोजी केलेल्या भाषणातून) लेनिनचे अशा प्रकारचे दृष्टिकोन त्याच्या साहित्यविषयक विचारांचा अभ्यास करिताना, वस्तुनिष्ठ दृष्टीने अभ्यास करिताना लक्षात घेणे अतिशय आवश्यक आहेत.

साहित्याकडे किंवा कलेकडे पाहण्याचा लेनिनचा एक विशिष्ट दृष्टिकोन आहे. पण तो दृष्टिकोन सर्वस्वी स्वतंत्र वा विचित्र मुळीच नाही. साहित्याचा किंवा कलेचा समाजाशी अतिशय जवळचा संबंध आहे. कला ही लोकांची, बहुजन आहे असे लेनिनचे म्हणणे आहे. 'Art belongs to the people. It must let its roots go down deep into very thick of masses. It must unite the feeling, thought and will of these masses, *uplift them.*' (क्लारा झेटकीन Zetkin शी झालेल्या एका संभाषणातून) हे लेनिनचे विधान बहुधा सर्वमान्य असेच आहे. कला ही सर्वसामान्य लोकांकरिता असली पाहिजे. कलेची पाळेमुळे ही बहुजनसमाजात खोलवर रुजली पाहिजेत या गोष्टी रामायण गाणाऱ्या भारतीय समाजाला परक्या मुळीच नाहीत. लेनिनच्या वरील विधानातील Uplift them हे शब्द अतिशय महत्त्वाचे आहेत. कलेचे कार्य काय आहे किंवा काय असावे हे त्या दोन शब्दात यथार्थपणे सांगितले आहे. या दोन शब्दात काय नाही ? कला किंवा साहित्य हे परिणामशून्य आहे वा असले पाहिजे या गोष्टीचा या शब्दात निषेध आढळतो. करमणूक हे कलेचे मुख्य कार्य आहे या अपप्रवृत्तीचा निषेध आढळतो. कलेकरिता कला या आग्रही विचारसरणीचा निषेध आढळतो. कलेमुळे समाजमानसावर परिणाम होतोच हे येथे गृहीत धरलेले आहे. आणि समाजमनाला उन्नत करणे, वरच्या पातळीवर नेणे, समाजमानसाचा विकास करण्याचा आग्रह धरणे हे या दोन महत्त्वाच्या शब्दांचे प्रतिपादन आहे. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे कलेचे (अर्थात साहित्याचेही) समाजातील महत्त्व वा सामर्थ्य लेनिनने मान्य केले आहे.

शिवाय masses या शब्दातील उद्देशही आपण समजावून घेतला पाहिजे. कला व साहित्य हे बहुजन समाजाकरिताही असले पाहिजे असे लेनिनचे म्हणणे होते. अनेक राजकीय वा सामाजिक सुधारणा या बहुजनसमाजाकरिता असल्या पाहिजेत हा विचार पुरोगामी ठरतो. पण साहित्य हे सार्वत्रिक असले पाहिजे किंवा बहुजनसमाजाकरिता असले पाहिजे असे म्हटले म्हणजे त्यावर लगेच रुक्ष, प्रचारकी, उथळ यांत्रिक असल्या शेलक्या विशेषणांचा भडिमार करण्यात येतो. पण लेनिनने 'बहुजनसमाजाकरिता कला' या आपल्या मुद्याच्या संदर्भात एक मोठा मार्मिक प्रश्न विचारला आहे. तो म्हणतो, 'Must we provide fine cakes for a small minority while the masses of workers and peasents still lack black bread?" (क्लारा झेटकीनशी झालेल्या एका संभाषणातून) हजारो लोक शिळ्या भाकरीचे तुकडे मोडत असताना केवळ थोड्या लोकांनी पंचपक्वान्नाचा

भोग घेणे (वा त्यांना तसा भोग घेऊ देणे) माणुसकीला शोभणारे होईल का ? ते जर तसे योग्य नसेल तर केवळ थोड्याच लोकांनी आत्मकेंद्रित कलाविलाविलासात दंग राहून, हजारो कष्टकऱ्यांना कला व साहित्याच्या अध्ययनावाचून, आनंदावाचून ठेवणे योग्य होईल का ? माणुसकीला शोभणारे होईल काय ? तात्पर्य काय की निव्वळ संकुचित, आत्मकेंद्रित साहित्य हे गौरवास पात्र होईल काय ? या ठिकाणी हे ध्यानात ठेवले पाहिजे की बहुजन समाजाच्या नावाखाली हीन दर्जाची कलानिर्मिती लेनिनला मुळीच मान्य नव्हती. नीरस, साचेबंद, बेचव साहित्याबद्दल त्याला सदैव तिटकारा होता. मायकोव्हस्कीसारख्या 'बहुजनसमाजवादी' रशियन लेखकाबद्दलची लेनिनची मते ही पूर्वी दिग्दर्शित केली आहेतच. त्यामुळे या मुद्याच्या संदर्भात लेनिनवर गैरसमजावर आधारलेला एकांगी आरोप (की लेनिन उथळ साहित्यनिर्मितीला प्रोत्साहन देत आहे) केला तर तो टिकणार नाही. त्याचा खरा राग आहे तो समाजापासून कलेची फारकत करण्यात आनंद मानणाऱ्या संकुचित वृत्तीच्या लेखकांवर. विशिष्ट व्यक्तिवर्तुळात रमणाऱ्या कलेला श्रेष्ठ म्हणणाऱ्यांवर ! सधन वर्गातील तरुणतरुणीमध्येच घोटाळणारे साहित्य (मग ते 'तंत्रा'च्या दृष्टीने कितीही 'परफेक्ट' असेना का) लेनिनच्या 'masses'करिता साहित्य या व्याख्येत बसू शकत नाही. उलट तुकारामाच्या अभंगांसारखे साहित्य हे त्यामधील समाजमानसात खोलवर पाळेमुळे धरून राहण्याच्या आणि समाजमनाला एका उन्नत पातळीवर नेण्याच्या शक्तीमुळे खऱ्याखुऱ्या अर्थाने 'masses' करिता, बहुजनसमाजाकरिता साहित्य या व्याख्येत बसू शकेल.

त्याचप्रमाणे समाजाबद्दल तुच्छता दाखवून, अमुकअमुक कविता मला समजते ना ? आवडते ना ? मग बहुजनसमाजाचा विचार करण्याचे कारणच काय ? अशा विचारसरणीच्या, नवसाहित्यात निर्माण झालेल्या आत्यंतिक व्यक्तिवादी संप्रदायाचा निषेधही लेनिनच्या उपरोक्त व्याख्येत अंतर्भूत आहे असा आज निष्कर्ष काढला तर तो अयोग्य होईल असे वाटत नाही.

बहुजनसमाजाकरिता (masses) कला या लेनिनच्या उद्गारांचे (वास्तविक हे 'फक्त' लेनिनचे म्हणणे नाही, तर जगातील अनेक समीक्षकांप्रमाणे लेनिनचे '+ही' म्हणणे आहे.) महत्त्व आणखीही एका दृष्टिकोनातून समजावून घेतले पाहिजे. बहुजन समाजाला साहित्यासारख्या चांगल्या गोष्टींपासून दीर्घकाळपर्यंत वंचित ठेवण्यापासून दुसराही एक वाईट परिणाम होण्याची सदैव शक्यता असते. अस्पृश्यांना हजारो वर्षे डांबून ठेवण्याच्या क्रियेतून त्यांची स्पृश्य समाजासंबंधी जी जालीम प्रतिक्रिया झाली आणि त्यामुळे हिंदुसमाज खिळखिळा होऊन त्याचे कसे अपार नुकसान झाले ही गोष्ट ध्यानात घेणे या ठिकाणी अनौचित्यपूर्ण ठरू नये असे वाटते आणि म्हणूनच कलेला बहुजनसमाजापासून हजारो वर्षे वंचित ठेवले तर एक दिवस त्या बहुजनसमाजाच्या हाती सर्व सत्ता आल्यावर कलाविलासाचा कलीविलास होणारच नाही असे ठामपणे सांगता येणार नाही. कारण ती एक भयंकर प्रतिक्रिया आहे. सोवियत रशियात 'रॅप'सारख्या भयंकर लेखक-संघटनांचे एकेकाळी असलेले अस्तित्व या संदर्भात बोलके आहे. आणि म्हणूनच लेनिनच्या उपरोक्त विधानातील क्रांतदर्शी गूढार्थ सर्व अंगांनी समजावून घेतला पाहिजे.

'Literature must be a part of the general proletarian development' अशी लेनिनची साहित्यविषयक दुसरी एक धारणा होती. लेनिनच्या उपरोक्त विधानावर 'हा रशियन हुकुमशहा साहित्यासारख्या सर्वस्वी स्वतंत्र गोष्टीला एक प्रकारे कम्युनिस्ट राजवटीच्या स्थिरतेच्या आणि प्रगतीच्या कामगाडयाला जुंपतो आहे' अशा प्रकारची टीका करण्यात आली. परंतु लेनिनच्या साहित्य दृष्टीचा तटस्थ वस्तुनिष्ठ वृत्तीने अभ्यास करणाऱ्यांनी या संदर्भात एवढेच लक्षात ठेवावयास हवे की रशियन क्रांतीच्या गर्भावस्थेत आणि नंतर साम्यवादी समाजरचना स्थापन होण्याच्या अतिशय महत्वाच्या काळात साहित्यिकांचे साह्य आपणास मिळावे अशी लेनिनची अपेक्षा होती. साहित्याचे महत्त्व तो ओळखत होता म्हणूनच सोवियत समाजरचनेच्या विकासात साहित्यानेही हातभार लावला पाहिजे असे त्याचे म्हणणे होते. शिवाय समाजाचा अपरिहार्य घटक अशीच साहित्याकडे पाहण्याची सर्व मार्क्सवादी पुढाऱ्यांची

भूमिका असल्यामळे समाजाला प्रगतिप्रद नेणाऱ्या मार्गातच (म्हणजे कम्युनिस्ट विचारसरणीचा मार्ग) साहित्याची प्रगती अंतर्भूत आहे असे त्यांचे म्हणणे होते. शिवाय तत्कालीन परिस्थितीत क्रांति-विरोधी साहित्य लेनिनच्या, साम्यवादी राजवट आणण्याच्या मूळ ध्येयाला घातक झाले असते. म्हणूनच लेनिनने आता काही जणांना आत्यंतिक वाटणारी पण त्यावेळेस त्याला योग्य वाटणारी विधाने केली. अर्थात त्याच्या उपरोक्त विधानाचा गैरफायदा झाडनोव्ह सारख्या ठोकळेबाजांनी आणि 'रॅप' सारख्या अति उत्साही संघटनांनी बराच घेतला आणि काही काळ साहित्यक्षेत्रात धमाल उडवून दिली ही गोष्ट खरी. पण व्यक्तिश: लेनिनच्या मनोभूमिकेचा पडताळा मायकोव्हस्कीबद्दल केलेल्या त्याच्या विधानात आल्यामुळे, त्याच्या विधानांचा गैरफायदा घेऊन करण्यात आलेल्या अतिरेकी घटनांबद्दल लेनिनलाच सर्वस्वी दोष देताना आणि लेखकांच्या स्वातंत्र्यावर आक्रमण करणारा व यंत्रमय साहित्यनिर्मितीला प्रोत्साहन देणारा अशा प्रकारचे आरोप करताना शंभरदा विचार करावा लागेल हे निश्चित.

" Literature must become party literature. As opposed to bourgeois custom, as opposed to the bourgeois commercial venal press, as opposed to bourgeois literary carrerism and individual 'lordly anarchism' and chasing for profits, the socialist proletariat must put forward the Principle of Party Literature, develop this principle and realize it in its fullest form" ('Party organization and party literature' या १९०५ मध्ये प्रसिद्ध झालेल्या निबंधातून) ही चांगल्या साहित्याबद्दलची लेनिनची कल्पना होती. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे 'साहित्य हे ध्येयवादी असावे' असे लेनिनचे म्हणणे होते. आपल्या साधुसंतांनी 'भक्तिहीन जे कवित्व । तेचि जाणावे ठोंबे मत ।' असे स्पष्ट सांगून भक्तिमार्गाचा पुरस्कार करणारे साहित्यच श्रेष्ठ ठरविले आहे. ज्या वेळेस राष्ट्रीय स्वातंत्र्याची चळवळ जोरात होती त्यावेळेस साहित्यात त्या वृत्तीचेच समर्थन झाले आहे. देशाच्या स्वातंत्र्याकरिता जळणाऱ्या अंतःकरणातून निबंधमालेसारखे ओजस्वी साहित्य निर्माण झाले. तद्वतच मांडवलशाहीला विरोध करणाऱ्या आणि समाजसत्तावाद स्थापन करू इच्छिणाऱ्या लेनिन सारख्या ध्येयवादाने तसल्याच प्रकारच्या आशा आकांक्षांचे आविष्करण करणाऱ्या साहित्यनिर्मितीचा आग्रह धरावा यात अस्वाभाविक असे काय आहे ? वैयक्तिक स्वार्थाकरिता, आर्थिक लाभाकरिता वा निव्वळ नफ्याकडे दृष्टी ठेवून लिहिण्यात येणाऱ्या गल्लाभरू साहित्याला, उपरोक्त परिच्छेदात लेनिनने कडवा विरोध केला आहे. आणि पक्ष साहित्याची कल्पना पुढे मांडली आहे. लेनिनच्या 'पक्ष साहित्याच्या' कल्पनेचा गैर फायदा घेण्यात आला नाही असे नाही. आजही साम्यवादी देशात अशा प्रकारच्या 'पक्षसाहित्या' चा सुळसुळाट झालेला कदाचित् आढळेलही. पण या ठिकाणी एक गोष्ट लक्षात घ्यावयास हवी की ध्येयाचा प्रचार करणारे अनेक प्रकारचे साहित्य प्रचारकी थाटाचे झाले आहे. निव्वळ मार्क्सवादीच साहित्य तसे आहे असे नाही. यातील खरी गोष्ट अशी आहे की विशिष्ट ध्येयाचे संपूर्ण आकलन अशा तृतीय श्रेणीच्या लेखकांना होत नाही आणि मग त्यांच्या हातून प्रचारकी थाटाचे उथळ आणि नीरस साहित्य निर्माण होते. विशिष्ट ध्येय संपूर्णतः आत्मसात केलेल्या प्रतिभाशाली लेखकाच्या हातून अशा प्रकारचे नीरस साहित्य निर्माण होण्याचा फारसा संभव नसतो. ज्या रशियात मायकोव्हस्की झाला त्याच रशियात क्रांतिकाळात गोर्कीही झाला. मराठीत अनेक ठोकळेबाज साम्यवाद्यांच्या हातून रुक्ष साहित्य निर्माण झाले. पण मार्क्सवादी विचारधारा अंगी भिनलेल्या मुक्तिबोधांच्या आणि नारायण सुर्वे यांच्या कवितांतून रुक्ष प्रचारकी अतिरेक यत्किंचितही आढळत नाही.

'पक्षसाहित्या'च्या आपल्या कल्पनेच्या संदर्भातच लेनिनने लेखन–स्वातंत्र्याच्या विषयाचा बराच ऊहापोह केला आहे आणि तो आज देखील महत्त्वाचा आहे. वास्तविक लेखनस्वातंत्र्याच्या संदर्भात 'There

is no denying the fact that in this field there must be the widest freedom for individual in initative, individual bents, free swing for thought and imagination, form and content.' हे बाह्यतः लेखनस्वातंत्र्य मान्य असणारे विधान लेनिनने केले असले तरी प्रत्यक्षात रशियन क्रांतीनंतर लेखकांच्या स्वातंत्र्यावर काही बंधने आली होती ही गोष्ट सत्य आहे. खुद्द लेनिनच्या कारकीर्दीत, स्वतःचे विचार स्वतंत्रपणे मांडणाऱ्या काही लेखकांची मुस्कटदाबीच झाली आणि लेनिनच्या मृत्यूनंतर तर अशा कित्येक स्वतंत्र वृत्तीच्या प्रतिभाशाली लेखकांना प्राण गमवावे लागले. आज चीनमध्ये सांस्कृतिक क्रांतीच्या नावाखाली चालू असणाऱ्या हैदोसधुल्ल्यांत ज्याप्रमाणे अनेक प्रतिभाशाली लेखकांना आत्महत्त्या करावी लागत आहे, त्याचप्रमाणे रशियातही लेनिनच्या मृत्यूनंतर असे दुर्दैवी प्रसंग घडले आहेत. लेनिन जिवंत असता तर गोष्टी इतक्या थराला गेल्या नसत्या असे लेनिनची मनोभूमिका लक्षात घेता म्हणण्याला जागा आहे. पण प्रत्यक्षात लेनिनच्या काळातही लेखकांवर बंधने होती ही गोष्ट अमान्य करता येणार नाही. पण तसे होणे अपरिहार्य आहेच असे लेनिनचे म्हणणे होते. साम्यवादी समाजरचना अस्तित्वात आणण्याच्या प्रतिज्ञेला बांधलेला तो एक ध्येयवादी पुढारी होता. आणि आपल्या ध्येयाच्या विरोधी असणाऱ्या सर्व प्रकारच्या गोष्टी मुळापासून नष्ट करण्याचा आपल्याला हक्क आहे अशी त्याची धारणा होती. लोकशाही राष्ट्रातसुद्धा युद्धासारख्या विकट प्रसंगी नागरिकांच्या मूलभूत अधिकारांवरही बंधने असतात. मग सगळ्या बाजूंनी साम्यवादी समाजरचनेच्या अस्तित्वालाच धोका असताना त्या धोक्यास साह्य करून आगीत तेल ओतणारे विघातक साहित्य लेनिनला सहन करणे शक्यच नव्हते. म्हणूनच एकीकडे 'प्रत्येकाला त्याच्या मताप्रमाणे लिहिण्याचे स्वातंत्र्य आहे' असे म्हणत असतानाच 'कम्युनिस्ट पक्षासारख्या विशिष्ट ध्येयपूर्तीकरिता अवतीर्ण झालेल्या संघटनेलाही आपल्या ध्येयाच्या आड येणाऱ्या साहित्याला निपटून काढण्याचे स्वातंत्र्य आहे. आम्ही कम्युनिस्ट अशा प्रकारच्या साहित्याकडे स्वस्थ बसून आणि हात बांधून पाहू शकत नाही' (पार्टी आर्गनायझेशन अँड पार्टी लिटरेचर निबंध) अशा आशयाची ठाम विचारसरणी लेनिनने मांडली आहे. या ठिकाणी कम्युनिस्ट पक्षाच्या किंवा त्याच्या ध्येयाच्या बऱ्यावाईटपणाबद्दलच्या चर्चेत शिरण्याची मुळीच आवश्यकता नाही. फक्त लेनिनची ती एक प्रामाणिक धारणा होती हे दिग्दर्शित करावयाचे आहे. आणि या विचारसरणीच्या मूल तत्त्वाच्या आधाराने मराठी नवसाहित्यात आज माजलेल्या अनिष्ट प्रवृत्तीच्या संदर्भात 'लघ्वी'सारख्या विषयावर कविता करण्याचा, शेळी आणि मनुष्य यांच्यामधील सर्वस्वी अनैसर्गिक संबंधाचे मिटक्या मारीत वर्णन करणाऱ्या कादंबऱ्या लिहिण्याचा लेखकांना जर हक्क आहे तर अशा लेखकांच्या लेखनस्वातंत्र्यावर बंधने आणण्याचा, त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याचा, निदान तसे ठराव तरी करण्याचा हक्क वाङ्मयपरिषदांना आहे.' अशा प्रकारचे विधान केले तर ते हुकुमशाही प्रवृत्तीचे द्योतक असल्याचा आरोप येऊ नये असे वाटते.

लेखकांच्या लेखनस्वातंत्र्याबद्दल लेनिनने त्याला पटलेला आणखीही एक मुद्दा स्वतःच्या भाषेत मांडला आहे. स्वातंत्र्याबद्दलची त्याची कल्पना वेगळीच आहे आणि ती सर्वसामान्य मार्क्सवाद्यांपेक्षा भिन्न नाही. भांडवलशाही समाजातील तथाकथित व्यक्तिस्वातंत्र्य म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्याचे ढोंग आहे अशी त्याची स्पष्ट धारणा होती. भांडवलशाही समाजात खरेखुरे लेखनस्वातंत्र्य आहे असे जे म्हणतात त्यांना लेनिन लगेच उसळून विचारतो. 'Are you free of your bourgeois publisher, Mister Writer? Of your bourgeois public which demands of you pornography in novel and pictures......? (पार्टी आर्गनायझेशन आणि पार्टी लिटरेचर) म्हणजे साम्यवादी समाजात लेखनस्वातंत्र्य नाही असे म्हणणाऱ्या भांडवलशाहीच्या पाठीराख्यांना लेनिनचे उत्तर होते की तुमच्याही समाजात लेखनस्वातंत्र्य नाही. आणि तें काहीसे खरेही आहे. लेखकांच्या स्वातंत्र्यावर प्रकाशकाने आपल्या मताची कात्री

चालविली आहे यांची उदाहरणे मराठी साहित्यातही देता येणारच नाहीत असे नाही.आयुष्यभर एक विशिष्ट विचारधारा मनात बाळगूनही त्या विचारधारेच्या सर्वस्वी विरोधी विचारसरणीच्या पुरस्कर्त्या वृत्तपत्राचे संपादक बनून नाइलाजाने मालकशाहीच्या दडपणाखाली जीवन व्यतीत करणारा संपादकही मराठीत आढळणार नाही असे नाही. म्हणजे भांडवलशाही समाजातही असे लेखनस्वातंत्र्यावर दडपण येऊ शकते. पण त्यामुळे साम्यवादी समाजातही संपूर्ण लेखनस्वातंत्र्य आहे असेही मान्य करता येत नाही. तेथेही एखादी पॉलिटब्यूरो लेखनस्वातंत्र्यावर मर्यादा घालीत असतेच. एखादा 'चाओ' किंवा 'माओ' स्वतःची स्तुतिस्तोत्रे गाण्याव्यतिरिक्त इतर प्रकारच्या साहित्याला प्रकाशनबंदी घालीत असतोच. अर्थात या वादस्थळात प्रस्तुत लेखात लेखकाला शिरावयाचे नाही. लेनिनची प्रामाणिक आग्रही धारणा दाखविणे, वस्तुनिष्ठ दृष्टीने दाखविणे एवढाच या ठिकाणी उद्देश आहे. आणि ती धारणा म्हणजे भांडवलशाही समाजात खरेखुरे लेखनस्वातंत्र्य नसून लेखनस्वातंत्र्याचे ढोंग आहे आणि या ढोंगाचा परदाफाश आम्ही साम्यवादी करतो असे लेनिनचे म्हणणे. ज्या समाजात धंदेवाईक वृत्ती नाही नफ्याची आकांक्षाच नाही, उच्चनीच भावनाच नाही अशा शोषणरहित, वर्गहीन साम्यवादी समाजातच खरेखुरे लेखनस्वातंत्र्य असते अशी लेनिनची आग्रही विचारसरणी होती.

अशा प्रकारे साम्यवादी समाजात निर्माण होणाऱ्या 'स्वतंत्र' साहित्याकडून अनेक प्रकारच्या अपेक्षा लेनिनने व्यक्त केल्या आहेत. आणि त्या अपेक्षा पूर्ण करणारे साहित्य त्याने श्रेष्ठ मानले आहे. साहित्यात ऐतिहासिक सत्याच्या दिग्दर्शनाला लेनिन अतिशय महत्त्व देतो. त्याची ही कृती मार्क्सवादी विचारधारांशी सुसंगत अशीच आहे. साहित्य म्हणजे जरी तंतोतंत इतिहास नसला तरी साहित्यात ऐतिहासिक सत्याचा (युगतत्त्वाचा) खून करावा असे कोणीही म्हणणार नाही. उलट अशा प्रकारचे साहित्य हे धिक्कारास पात्र होईल. या संदर्भात नाथमाधव आणि हरिभाऊ आपटे यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांची तुलना ध्यानात घेणे अयोग्य होणार नाही. शिवाजी महाराजांच्या अंगी नसलेले अनेक इतिहासदुष्ट गुण त्यांच्यावर चिकटवून नाथमाधवांनी ऐतिहासिक सत्यावर अत्याचार केला आहे. उलट हरिभाऊंनी शिवजीवनावरच्या आपल्या ऐतिहासिक कादंबऱ्यांत शिवाजी महाराजांच्या ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वाला उणेपणा आणणारे वर्णन कोठेही केले नाही. त्यांच्या 'सावळ्या'सारख्या काल्पनिक पात्राच्याही व्यक्तिचित्रणातून ऐतिहासिक सत्याला सर्वस्वी विसंगत वर्णन करण्याचे त्यांचे धोरण असल्याचे कुठेच आढळत नाही. त्यांची 'उषःकाल' ही ऐतिहासिक कादंबरी तर केवळ व्यक्तिचित्रणात रंगणारी नसून तत्कालीन सरंजामशाही पद्धतीचे यथार्थ चित्रण करणारी ठरली आहे. ऐतिहासिक सत्याला डावलणे एकप्रकारच्या पलायनवादी मनोवृत्तीचे द्योतक आहे. अशा प्रकारच्या वृत्तीतून भ्रामक निर्मितीचा हव्यास बळावतो आणि साहित्य वास्तवतेपासून दूर जाते. लेनिनने या साहित्याबद्दल सदैव नाराजीच व्यक्त केली आहे.

आपण ज्या वस्तूंचे, घटनांचे वा प्रसंगांचे वर्णन करीत आहोत त्यांचे यथार्थ ज्ञान लेखकाला असले पाहिजे ही साहित्यसमीक्षेच्या क्षेत्रातील सर्वमान्य अपेक्षा लेनिनचीही होती आणि ती सर्वस्वी योग्य अशीच आहे. शुक्रवार तलाव पाहून सिंधुसागराचे वर्णन लेखक करू लागला आणि त्यामध्ये पलाकडच्या तीरावर असलेली माणसे व वृक्ष मला दिसत आहेत (होते) अशा आशयाचे विधान जर त्याने केले तर ते किती हास्यास्पद होईल? सीताबर्डीचा किल्ला पाहून (त्याच्या पटीत सुद्धा) हिमालयाचे वर्णन करणे कितपत शहाणपणाचे ठरणारे आहे? वा. म. जोशी यांच्या 'रागिणी' कादंबरीत 'हिमालयात आमराई' सारखी चुकीची वर्णने आली याचे कारण म्हणजे ज्या स्थळाचे वर्णन करावयाचे त्या स्थळाच्या तंतोतंत माहितीचा अभाव. पुण्यांतल्या बंगल्यात आरामखुर्चीवर बसून, सुभाषबाबूंच्या आझाद हिंद फौजेने केलेल्या रोमहर्षक संघर्षाची संपूर्ण माहिती वाचून, यथार्थ वर्णन करणे सर्वस्वी अशक्य आहे. अशा वर्णनातून कित्येक हास्यास्पद आणि कित्येक संतापदायक प्रसंग निर्माण झाले आहेत. म्हणूनच लेनिनने आपल्या लेखकांकडून लेख्य वस्तूच्या संपूर्ण माहितीची अपेक्षा केली आहे.

यात त्याचा एक उद्देश वास्तवतेपासून साहित्य दूर जाऊ नये असाही आहे.

लेनिनने आत्यंतिक व्यक्तिवादी साहित्यावरही वेळोवेळी कोरडे ओढले आहेत आणि अशा साहित्यावर बंधने अपेक्षिली आहेत. त्याच्या मते सर्जनशील साहित्य हे व्यक्तीची खाजगी मालमत्ता नव्हेच. ज्या वेळेस लेखकाचे लिखाण प्रकाशित होते त्यावेळेस ते खाजगी राहीलच कसे ? असे त्याचे म्हणणे आहे. केवळ स्वतः-लाच समजणाऱ्या (आणि आवडणाऱ्याही) कवितांच्या प्रसिद्धीकरिता हपापणाऱ्या आत्यंतिक व्यक्तिवादी नवकवींना लेनिनच्या उपरोक्त विधानातील गूढार्थ समजेल तो सुदिन.

साहित्य व्यक्तिवादी नसावे तर मग कसे असावे ? या प्रश्नाच्या लेनिनकृत उत्तराचा परिचय प्रस्तुत लेखाच्या प्रारंभीच बराचसा करून घेतला असल्यामुळे येथे त्याची पुनरुक्ती करण्याची काहीच आवश्यकता नाही. थोडक्यात या ठिकाणी एवढेच नमूद करून ठेवावयाचे की आपल्या युगातील सामाजिक धारणा, युगप्रवर्तक सामाजिक आशय, बहुजन समाजाच्या आशा-आकांक्षा, वर्गसंबंध या गोष्टी साहित्यात यशस्वी-पणे रेखाटणाऱ्या साहित्यिकाला श्रेष्ठत्व देण्यास लेनिन तयार आहे आणि याच कारणाकरिता लेनिनने टॉलस्टॉयचा गौरव केला.

लेखकाच्या लिखाणाचे मूल्यमापन करिताना जगाकडे पाहण्याचा लेखकाचा दृष्टिकोन समीक्षकांनी विचारात घ्यावयास हवा अशी लेनिनची अपेक्षा होती. स्वतः लेनिन अशा प्रकारचा दृष्टिकोन विचारात घेत होता व त्याअनुषंगाने साहित्याची प्रतवारी लावीत होता. अर्थात मार्क्सवाद अंगी भिनून जगाकडे पाहण्याची लेनिनची भूमिका शुद्ध ऐतिहासिक भौतिकवादी असल्यामुळे त्याच्या दृष्टीने श्रेष्ठ साहित्य कोणत्या प्रकारचे असले पाहिजे हे उघडच आहे. अर्थात त्यामुळे टॉलस्टॉयच्या लेखनात असलेल्या इतर अनेक गुणांचा उघड उघड गौरव करूनही लेनिनने त्याच्या आदर्श-वादावर वा अतिरेकी अध्यात्मवादावर स्पष्टपणे टीका केली, यात अस्वाभाविक असे काहीच नाही.

लेखकाचा राजकीय कल ध्यानात घेणे हे सुद्धा साहित्यातील श्रेष्ठ कनिष्ठत्व ठरविण्याच्या प्रक्रियेतील एक अंग आहे असे लेनिनचे म्हणणे होते. साहित्य हे बहुजनसमाजाला राजकीय दृष्टचा जागृत करण्याचे एक साधन आहे अशी त्याची स्पष्ट धारणा होती. आणि राजकीय दृष्टचा जागृत होणे म्हणजेच वर्ग-संघर्षाला तयार होणे असे लनिनचे समीकरण होते हे न सांगताही अभ्यासकांना करण्याजोगे आहे. अर्थात अशा वर्गसंघर्षाचा प्रसार करणाऱ्या साहित्याबद्दल लेनिनला आपुलकी असणे साहाजिकच आहे. मात्र या ठिकाणी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की अशा प्रकारच्या साहित्याला श्रेष्ठ मानताना साहित्याच्या 'कलाकृतित्मकते' ला सर्वस्वी गौणपणा आणणारे साहित्य लेनिनला कधीही मान्य नव्हते. (Lenin on art and literature, Page 144)

लेनिनच्या साहित्यविषयक प्रमुख विचारांचा अतिसंक्षिप्त परिचयात्मक परामर्ष आतापर्यंत घेतला. वास्तविक यातील एक एक विचाराच्या स्पष्टीकरणा-करिता, त्यावर अभिप्राय व्यक्त करण्याकरिता एक एक स्वतंत्र लेख उपयोगी पडावा, एवढे त्या विचारांचे महत्त्व आहे. पण प्रस्तुत लेखात केवळ परिचयात्मक परामर्षाची भूमिका घेतली आहे आणि असे करिताना जास्तीत जास्त तटस्थ वस्तुनिष्ठ दृष्टिकोन ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र ही दृष्टी ठेवूनही लेनिनचे साहित्यविषयक विचार हे एका 'व्यावहारिक ध्येय-वादा'चे सखोल अभ्यासावर आधारलेले प्रामाणिक विचार असून, मराठी नवसाहित्याला इष्ट वळण लावण्याच्या दृष्टीने काही अंशी मोलाचे ठरतील' असा ठाम निष्कर्ष प्रस्तुत लेखाच्या शेवटी काढला तर तो अविचारी धाडसाचा ठरेल असे वाटत नाही.

पुस्तक परीक्षण

चिद्घोष

(ले. ज्ञानेश्वर नाडकर्णी, प्रकाशक मौज प्रकाशन, मुंबई; किंमत रु. ८-००)

श्री. ज्ञानेश्वर नाडकर्णी यांच्या कथाविश्वात भावनांची गुंतागुंत आहे. पण या गुंतागुंतीचे धागे स्पष्ट करताना कथा मात्र पसरट होत जातात, कथेतील गाभा हरवतो, जीवनचित्रातील प्रत्येक अंगाचा कथेच्या आशयाशी मेळ घातला जात नाही. कथा त्यामुळे विस्कळीत होते. कथांचा बांधीव एकसंघ असा परिणाम होत नाही. सगळ्याच कथा दुबळ्या वाटतात.

साधारणपणे असे दिसते की सध्या जी लघुकथा निर्माण होत आहे त्यातील कथेत एकमेव निराशेचा सूर आहे. त्यातील जीवन विफल आहे, विकृत आहे. जीवनातील आनंद गेला आहे. सर्व जीवन उद्ध्वस्त झाले आहे. निराशेने दशदिशा व्यापल्या आहेत. कथांतून रंगविलेले जीवन जर खरे असेल, सत्यसृष्टीतील जर हे जीवन असेल तर जग हा एक पागलखाना व्हायला हवा. पण तसे दिसत नाही. मानवाचे रोजचे व्यवहार चालू आहेत. जीवनात विफलता दिसत असली तरी अज्ञात आशेवर मानव जगत आहे. दारुण निराशेतही त्याला आशेचा किरण दिसत आहे. मग लघुकथांच्या जगात हा नैराश्यवाद का ? ही विकृती का ? आत्यंतिक मनोवृत्तीच्या जीवाचे जीवन शब्दमय करण्यात कथाकारांना काय साधावयाचे आहे ? वाचकांना हे सगळे वाचून कोणता आनंद मिळणार आहे ? लेखक हा द्रष्टा असतो असे म्हणतात. त्याची कलानिर्मिती आनंदाकरता असते. पण अशा प्रकारची निर्मिती न करता निव्वळ 'नैतिक भाविकतेला' धक्का देणारी चित्रे रंगविण्यात कोणती कलानिर्मिती आहे ? वाचकाला रोजच्यापेक्षा काहीतरी नवीन काल्पनिक पण सत्यसृष्टीशी एकरूप असलेले काही तरी क्षणभर विरंगुळा देणारे वाचावेसे वाटते.

मानवाच्या जीवनात जर विकृती निर्माण झाली असेल तर ती विकृत चित्रे रंगवून जाणार नाही. आहे या परिस्थितीतूनच लेखकाला वा कलावंताला आपली कला राबवून जीवन सुसह्य होईल असे काही तरी निर्माण करायला हवे.

सध्याच्या एकंदर कथा, काव्य, नाट्य विश्वात असेच काही तरी निर्माण होत आहे व त्यामुळे मानवी जीवनही त्याच प्रकारचे दिसू लागले आहे. आशेला जागा नाही, विचाराला स्थान नाही व पूर्वसंकेताला मान नाही. असेच जर वाङ्मय निर्माण होणार असेल तर......?

—न. दि. घारपुरे

संपादकीय—

'करीन्ती पूर्व', 'प्रयन्त' तोकडा पडला आणि 'पन्ती' ठीक होती हेही आपण ह्यापलीकडे शुद्ध मानावे काय? कारण तसे लिहितात आणि अर्थ लावू म्हटल्यास लावता येईल. कारण मराठी भाषेत फक्त अर्थ लावण्याशी काम? संस्कृताप्रमाणे शुद्ध लिहिणे—लीहिणे, लिहीणे, लीहीणे हे आता सारेच शुद्ध(!) होऊ घातल्यामुळे—आवश्यक कशाला? हा प्रश्न आता साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून विचारला जाऊ लागल्यामुळे विचार करणे जरूर आहे. डॉ. कोलत्यांचे एका बाबतीत अभिनंदन करणे जरूर आहे, ते म्हणजे मराठीचा 'भाषा' म्हणून अभ्यास करण्याच्या दृष्टीने काय करावयास हवे, हा विषय त्यांनी आपल्या भाषणाचा विषय केला. मराठीचा साहित्य, वाङ्मय इत्यादी क्षेत्रांतून प्रवाह कसा चालू आहे—असावा इत्यादी गोष्टींच्या विचारासमवेत भाषेचा भाषा म्हणून जो अभ्यास करायला हवा असतो त्याचा विचार संमेलनाध्यक्ष साधारणतः करीत नाहीत. डॉ. मजकुरांनी तो केला ही गोष्ट वैशिष्टचपूर्ण. पण मराठी भाषाध्ययनाला सुगमता आणण्यासाठी संस्कृत तत्सम शब्दांची शिस्त बदलविण्यासंबंधी किंवा एकच बोली ग्रंथनिविष्ट काय म्हणून, इत्यादी प्रश्न त्यांनी उपस्थित केले ह्याचा विचार केला पाहिजे.

उत्तर भारतातल्या सर्व भाषांत आणि तमिळ वगळल्यास दाक्षिणात्य भाषांत सुद्धा संस्कृत तत्सम शब्दांचा किती तरी भरणा आहे. भाषांच्या वाक्यरचनेचे वळणसुद्धा संस्कृत घाटणीचे आहे. सर्व भाषांतून संस्कृत तत्सम शब्द ऱ्हस्वदीर्घांची ओढाताण करून लिहीत नाहीत. परीणाम, परीचय मध्ये 'परी' आणण्याची काय आवश्यकता आहे? उलट संस्कृत शिस्तीचा 'परिणाम' उच्चारावर तसाच लेखनावर होऊ शकतो. 'हे वाक्य' ह्या ऐवजी आजच मुले परीक्षांतून 'हे वाके' किंवा 'हे वाक्या'—(एक दागिना : बहुवचनाचा उच्चार) असे लिहू लागले आहेत. नागपुरात भवितव्य साप्ताहिक खपत असताना त्याचा 'भवितवे' हा उच्चार सतत कानावर पडत असे. आता हा 'भवितवे' उच्चार भवितव्याशी तोलून पाहावा. आणि उच्चाराचे अराजक चालू ठेवावे. परिणामी भाषेचे भवितव्य धोक्यात येणार. त्या उलट संस्कृतातल्या शिस्तशीर उच्चाराप्रमाणे उच्चार करायला लावून तत्सम शब्द ओढाताण न करता लिहायला लावणे हे योग्य होईल.

ग्रंथनिविष्ट भाषा एकाच शिस्तीत लिहिली पाहिजे. भाषेची जपणूक ग्रंथांतून होते. पुण्याच्या बोलीतून ग्रंथनिविष्ट भाषा लिहिणे आजतागायत चालू आहे. ते चालू ठेवले पाहिजे. दहा पुरमध्ये आणि अकरा चुली हा प्रकार भाषेच्या बाबतीत होऊ देणे अनिष्ट.

इंग्लंडसारख्या टिचभर राष्ट्रात प्रत्येक कौंटीची उच्चाराची धाटणी वेगळी असली तरी B. B. C. वरील इंग्रजी भाषेची घाटणी फक्त दक्षिण-पूर्वेकडील भाषा बोलणाऱ्यांच्याच 'बोली' प्रमाणे असते. मागासलेल्या वर्गाची भाषा शुद्ध करण्याकडे वेगळचा शाळा काढून विशेष लक्ष दिले जाते.

पोषाखावरून माणूस ओळखायला येत नाही. पण भाषेच्या उच्चारावरून लगेच येतो. शुद्ध भाषेचे एक परिमाण मान्य करण्यात आलेच पाहिजे. कसेही लिहावे आणि बोलावे हे रूढ व्हायला लागल्यावर त्यातील दुरवस्था कळू लागेल आणि आज आजारापेक्षा औषध जालीम असे उपचार सुचवणे महागात पडेल.

× × × ×

मराठी महाराष्ट्राची राजभाषा होत असताना तर भाषेची सर्व पथ्ये नीट पाळली गेली पाहिजेत. तत्सम शब्द, देश्य शब्द योग्य आणि नीटपणे लिहिलेच पाहिजेत.

मराठी राजभाषा आहे हे राज्यपत्रातून जाहीर झाले आहे. पण प्रत्यक्ष अनुभव वेगळाच येतो. अजूनही कुठलाही 'फारम' इंग्रजीतूनच भरावा लागतो. एखाद्या संस्थेने आपली घटना मराठीतून केली असेल तर तिचा इंग्रजी तर्जुमा केल्याशिवाय ती 'प्रमाण' समजली जात नाही म्हणे. आणि नोंदणी अधिकारी मराठी 'घटना' प्रमाणित ठरवीत नाहीत. असल्या प्रकारच्या अनेक घटना घडताहेत. भाषाखात्याने आणि संबंधित अधिकाऱ्यांनी याची दखल घ्यावी. मराठीचे राजभाषेपण खऱ्या अर्थाने दप्तरी दाखल व्हावे.

—मा. नी. गलगलीकर

अनुक्रमणिका

संघवार्ता

बाबुराव चिमोटे
सरचिटणीस, वि. सा. संघ

नाट्यसमिती

कै. नाना जोग स्मृतिदिन

सोमवार दि. १ मे १९६७ रोजी सकाळी ९ वा. कै. नाना जोग यांच्या पुतळयाला सरचिटणीस, श्री. बाबुराव चिमोटे यांनी हार अर्पण केला.

रात्री ९ वाजता श्री. ग. त्र्यं. माडखोलकर (संपादक, 'तरुण-भारत') यांच्या अध्यक्षते-खाली प्रा. प्रभाकरराव चांदेकर लिखित-दिग्दर्शित 'भ्रमात पडले जर बन्वमजी' आणि 'आमुचे माहेर खूप दूर दूर' ह्या दोन एकांकिका सादर करण्यात आल्या. यावेळी श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांचे भाषण झाले.

सांस्कृतिक समिती

स्वातंत्र्यवीर बॅ. वि. दा. सावरकर जयंतीनिमित्त रविवार, दि. २८ मे १९६७ रोजी सायं. ६-३० वा. प्रा. द. भि. कुळकर्णी यांचे 'सावरकरांची कविता' या विषयावर उद्बोधक व्याख्यान झाले.

देणगी

माननीय श्री. वसंतरावजी नाईक, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य (मुंबई) यांनी 'मुख्यमंत्र्यांच्या निधी'तून श्रीशिवाजी ग्रंथालयाकरिता रु. २०००-०० ची आणि खामगाव येथील कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर स्मारकाकरिता रु. ५०००-०० ची देणगी देऊन उपकृत केल्याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोत.

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

—वार्षिक साधारण सभेची सूचना—

घटना नियम १० (अ) प्रमाणे विदर्भ साहित्य संघाच्या सर्व सभासदांना सूचना देण्यात येते की, विदर्भ साहित्य संघाची वार्षिक साधारण सभा **रविवार, दि. २३ जुलै १९६७ रोजी दुपारी ४ वाजता** नागपूर येथे केंद्रीय कार्यालयात भरेल.

सभेपुढील विषय

१. मागील सभेचा अहवाल

२. गतवर्षीचे कार्यवृत्त

३. १९६६–६७ सालचे हिशेबतपासनिसांनी तपासलेले हिशेब.

४. १९६७–६८ सालचे अंदाजपत्रक.

५. १९६७–६८ सालाकरिता अधिकृत हिशेबतपासनिसांची नेमणूक.

६. **वि. सा. संघाच्या घटनेत पुढीलप्रमाणे दुरुस्ती करणे—**

(अ) कलम ७ (ऊ) मधील रु. ३ ऐवजी रु. ५ करणे.

(आ) कलम ८, क्र.५––सध्याच्या परिच्छेदाऐवजी पुढील परिच्छेद घालणे––
'कोणत्याही वर्षाची पूर्ण वर्गणी त्या वर्षीच्या ३० एप्रिलपर्यंत न दिली गेल्यास त्या सभासदाचे सभासदत्व स्थगित समजले जाईल व त्याच वर्षीच्या ३१ जुलैपर्यंत ती वर्गणी न आल्यास त्या सभासदाचे सभासदत्व आपोआप रद्द समजले जाईल. अशा सभासदत्व रद्द झालेल्यास घटना कलम ८ (२) प्रमाणे पुन्हा नवीन सभासद होता येईल.'

(इ) कलम ९ (ई)––सध्याच्या परिच्छेदाऐवजी पुढील परिच्छेद घालणे––
'स्थगित सभासदास वर्गणी भरेपर्यंत सदस्यत्वाचे कोणतेही अधिकार राहाणार नाहीत.'

(ई) कलम ११ (आ) मधील (१) 'उपाध्यक्ष....१,' याऐवजी '२'; खाली एकूण ८ ऐवजी 'एकूण ९'.

(उ) कलम १४ (आ) मधील "अध्यक्ष जर बाहेरगावचा असेल तर उपाध्यक्ष नागपूरचा पाहिजे", हे वाक्य गाळणे. नंतरच्या वाक्याच्या सुरुवातीला 'एक उपाध्यक्ष' हे शब्द घालणे.

अनुक्रमणिका

(ऊ) कलम १९ (अ) सध्याच्या मजकुरानंतर पुढील मजकूर जोडणे.
'किमान २५ सदस्य दरवर्षी पाहिजेत, ज्यावर्षी ही संख्या २५ पेक्षा कमी होईल त्या वर्षी शाखा स्थगित समजली जाईल व त्यापुढील वर्षीही ती संख्या २५ पेक्षा कमी राहिल्यास ती शाखा रद्द समजण्यात येईल.'

७. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे इतर विषय.

गणपूर्तीच्या अभावी सभा स्थगित झाल्यास ती सभेच्या वेळेनंतर त्याच दिवशी व त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने भरविण्यात येईल. या स्थगित सभेला गणपूर्तीचे बंधन राहणार नाही. सभासदांना सभेत ठराव किंवा सूचना मांडावयाची असल्यास ती लेखी स्वरूपात सभेपूर्वी ४ दिवस अगोदर केंद्रीय कार्यालयात पोचावयास पाहिजे.

ह्या सभेस सभासदांनी उपस्थित राहावे, ही विनंती.

दि. १ जून १९६७

बाबुराव चिमोटे
सरचिटणीस

अनुक्रमणिका